**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. – तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# आरसा

'अर्थबोधपत्रिके'च्या या जोडअंकाचे स्वरूप अंमळ निराळे आहे. दोन लोकोत्तर महापुरुषांच्या कार्यकर्तृत्वाचे आणि प्रगल्भ विचारविश्वाचे कवडसे उलगडून मांडणारे दोन लेख या अंकात आवर्जून अंतर्भूत केलेले आहेत. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे आणि न्यायमूर्ती रानडे यांच्याबद्दल अतीव आदर असणारे घटनातज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ते दोन लोकाग्रणी. देशाचे माजी राष्ट्रपती आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा ५ सप्टेंबर हा जन्मदिवस आपण दरवर्षी 'शिक्षक दिन' म्हणून साजरा करतो. तर, स्वतंत्र भारताचे पहिलेवहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलम आजाद यांचा ११ नोव्हेंबर हा जन्मदिवस आपण दरवर्षी 'राष्ट्रीय शिक्षण दिन' म्हणून साजरा करतो. या दोहोंचे औचित्य साधून घटनाकार म्हणून ज्यांचा निर्देश परमादराने केला जातो त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण आणि शिक्षणव्यवहार या संदर्भात प्रसंगोपात्त प्रगट केलेल्या विचारांचा परिचय घडविणारा एक विस्तृत लेख या अंकात आवर्जून समाविष्ट केलेला आहे. ज्ञानतपस्वी हे बिरूद ज्यांना सर्वार्थाने शोभून दिसावे अशा बाबासाहेबांच्या शिक्षणविषयक विचारांची प्रस्तुतता आज जवळपास पाऊण शतकानंतरही किती व कशी अम्लान आहे, याची पूर्ण प्रचिती बाबासाहेबांचे विचारवैभव आपल्याला पदोपदी आणून देते. 'प्रबोधनपुरूष' आणि 'भारतीय अर्थशास्त्राचे जनक' अशा सार्थ उभय उपाधींनी गौरविल्या जाणाऱ्या न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे १२५वे स्मृतिवर्ष येत्या १६ जानेवारी २०२५ रोजी सुरू होते आहे. त्या निमित्ताने न्यायमूर्ती रानडे यांच्या बहुआयामी कार्यकर्तृत्वाचा परिचय करून देणारे काही लेखन 'अर्थबोधपत्रिके'च्या येत्या काही अंकांत सादर करण्याचा मानस आहे. न्यायमूर्ती काशीनाथ त्र्यंबक तेलंग, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे व न्यायमूर्ती नारायण गणेश चंदावरकार या तीन महनीयांचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व यांचा आलेख चितारणाऱ्या

'तीन न्यायमूर्ती' या न्यायमूर्ती नरेन्द्र चपळगावकर यांनी लिहिलेल्या ग्रंथाला ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नीळकंठ रथ यांनी विवेचक प्रस्तावना लिहिलेली आहे. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या अर्थचिंतनाचे समृद्ध अंतरंग डॉ. रथ यांनी तिथे विश्लेषक शैलीत विशद केलेले आहे. डॉ. रथ यांची ती प्रस्तावना या अंकात सादर केलेली आहे. आज आपला देश आणि समाज एका मोठ्या संक्रमणपर्वातून वाटचाल करतो आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत आपल्या पुढे आज बिकट आव्हानांची जणू मालिकाच उभी आहे. बहुपक्षीय राजकीय व्यवस्थेतील निरर्गल स्पर्धेपायी शासनसंस्थेवरील दबाव प्रचंड वाढतो आहे. दुसरीकडे, शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाद्वारे उदयाला आलेल्या सुशिक्षितांच्या मोठ्या वर्गाच्या अपेक्षांचा शासनसंस्थेवरील रेटाही तितकाच जबरदस्त आहे. शिक्षणाद्वारे निर्माण होणाऱ्या क्षमतांचा पूर्ण वापर होत नसल्याचे चित्र एकीकडे दिसत असतानाच, दुसरीकडे, शासनसंस्थेच्या सक्षमीकरणाचा प्रश्नही जटिल बनतो आहे. अशा या बहुमिती घुसळणीच्या पर्वातून पुढे सरकत असताना न्यायमूर्ती रानडे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाररूपी आरशात डोकवत स्वत:ला न्याहाळणे उपकारक ठरावे!

## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी– 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

# जिकडे-तिकडे

## ‘व्यावसायिक पालकत्वा’चे ‘चिनी मॉडेल’

काळ वेगाने बदलतो आहे. कुटुंबातील एकाने नोकरी-व्यवसाय करायचा आणि दुसऱ्याने घर-मुले सांभाळायची ही पूर्वीची कामांची विभागणी आज मागे पडत चालली आहे. चांगले शिक्षण घेतल्यानंतर एखाद्या चांगल्या क्षेत्रात काम करून पैसे मिळवावे, नोकरी करावी आणि स्वतःच्या पायावर उभे राहावे ही नवी मानसिकता आता स्त्री-पुरुष दोघांमध्येही जोर धरू लागली आहे. त्याचा परिणाम नकळतपणे कुटुंबव्यवस्थेवर होऊ लागला आहे. पूर्वीची संयुक्त कुटुंबे आता कमी झाली आहेत. वाढत्या नागरीकरणामुळे आता एकत्र कुटुंबपद्धती कमी होऊन आकाराने लहान असणाऱ्या विभक्त कुटुंबांचे प्रमाण वाढलेले आहे. अशा परिस्थितीत, घरात मूल जन्माला आले की एकीकडे ‘करिअर’ घडवण्याची त्याच्या आई-वडिलांची कसरत, त्यातील जीवघेणी स्पर्धा आणि दुसऱ्या बाजूला आता या मुलाला सांभाळणार कोण असा एक मोठाच प्रश्न निर्माण होतो. ही केवळ एखाद-दुसऱ्या शहरातील नव्हे तर झपाट्याने नागरीकरण होणाऱ्या विविध देशांमधील शहरी कुटुंबांची समस्या आहे. त्यावर जसे जमेल तसे पर्याय शोधले जातात आणि काही ना काही उपाययोजना केल्या जातात.

पाळणाघरे हा या समस्येवरील शोधलेला एक उतारा. विशेषत: माहिती-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या जोडप्यांना, उद्योग-व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांना आपल्या मुलांना पाळणाघरातच ठेवून जावे लागते. अशा पाळणाघरांमध्ये मुलांना दिवसभर ठेवण्याची सोय असली तरी ती केवळ एक पर्यायी व्यवस्था आहे. अशा ठिकाणी मुलांची सोय होत असली तरी त्यांना आई-वडिलांचे प्रेम, आश्वासक आधार मिळत नसल्याने ती एकटी, एकाकी आणि अनेकदा एकलकोंडी होऊन जातात. त्यातून मुलांच्या काही मानसिक समस्यांचाही जन्म होतो असे दिसून आले आहे. त्यामुळेच अन्य काही पर्यायांबाबत जगभरात विविध पातळ्यांवर आता शोध सुरू आहे.

'घरात मूल नकोच' इथपासून ते 'घरात किमान एक तरी मूल हवेच' असे स्थित्यंतर घडत गेलेल्या चीनमधील अनेक मोठ्या शहरांतील तरुण जोडप्यांना हीच समस्या सध्या भेडसावते आहे. त्यामुळे त्यावर उपाय काय याचा विचार करताना 'व्यावसायिक पालकत्व' (प्रोफेशनल पेरेंटिंग) अशी नवी संकल्पना पुढे आली आहे आणि चीनमध्ये या संकल्पनेचे स्वागत झाले असून तिचा वेगाने प्रसारही होताना दिसतो आहे. आता 'व्यावसायिक' पालकही उपलब्ध होणार ही कल्पना काहीशी विचित्र वाटली तरी आपल्या मुलांना अजिबात वेळ देऊ न शकणाऱ्या आई-वडिलांसाठी ही एक नक्कीच चांगली सुविधा ठरते आहे आणि म्हणूनच आपल्या मुलांना वेळ देतील, त्यांच्याशी संवाद साधतील, दिवसभर त्यांच्या सहवासात राहून त्यांची संवादाची भूक भागवतील आणि त्यांना मानसिक आधार देतील अशा 'व्यावसायिक पालकां'ना मागणी वाढते आहे.

पूर्वी एकत्रित कुटुंब असताना आजी-आजोबांच्या आणि परिवारातील इतर सदस्यांच्या सान्निध्यात लहान मुले वाढत असत. त्यांच्यावर मोठ्यांचे लक्ष असे आणि त्यांच्याच देखरेख-देखभालीखाली ही मुले लहानाची मोठी होत असत. पण आजचा काळ झपाट्याने बदलतो आहे. कोणावरही विसंबून राहण्याचे शक्यतो टाळणारी अशी नवी पिढी असल्याने मुलांचा सांभाळ करण्यासाठी 'व्यावसायिक तत्त्वांवर पालकत्व' उपलब्ध करून घेण्यात त्यांना काहीही वावगे वाटत नाही. उलट ती आजच्या काळाची गरज असल्याने अशा सुविधा कुटुंबांना मिळायलाच हव्या असे त्यांचे स्पष्ट मत आहे. 'प्रोफेशनल पेरेंट्स' ही संकल्पना चीनमध्ये हळूहळू मूळ धरत असल्याने लवकरच या संकल्पनेचा विस्तार होईल असा दावा समाजशास्त्राचे अभ्यासक करीत आहेत.

या संदर्भात चीनमधील 'साउथ चायना मॉर्निंग पोस्ट' या दैनिकाने सविस्तर माहिती देऊन ही संकल्पना नेमकी काय आहे हे मांडले आहे. त्यानुसार, चीनमधील अनेक उच्चभ्रू लोक त्यांच्या मुलांसाठी 'प्रोफेशनल पेरेंट्स'चा पर्याय निवडत आहेत. कारण या संकल्पनेअंतर्गत 'पालक' म्हणून येणाऱ्या व्यक्ती मुलांची मनापासून काळजी घेतात. इतकेच नव्हे तर, त्यांच्या शैक्षणिक व भावनिक विकासामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. त्यामुळे त्यांची भूमिका ही घरात मुलांना सांभाळणाऱ्या आयांपेक्षा गुणात्मकरीत्या वेगळी आणि शिक्षकांच्या तोडीची आहे असे मानले जाऊ लागले आहे. लहान मुलांच्या सांभाळासाठी अशी सेवा पुरविणाऱ्या अनेक संस्था चीनमध्ये नव्याने उदयाला आलेल्या आहेत आणि लहान मुलांना चांगल्या रीतीने सांभाळू शकणाऱ्या युवक-युवतींनाही त्या माध्यमातून रोजगाराची नवी संधी प्राप्त झालेली आहे. एखाद्या घरातील लहान मुलासाठी असे 'व्यावसायिक' पालक

नियुक्त केल्यानंतर ते आई-वडिलांच्या अनुपस्थितीत आई-वडिलांप्रमाणेच त्या मुलांची देखभाल करतात आणि त्यांची मायेने काळजी घेतात. अनेकदा सकाळ ते संध्याकाळ आणि संध्याकाळ ते रात्र अशा दोन पाळ्यांमध्येही ते काम करतात. मुलांना सोबत बसवून त्यांचा गृहपाठ करून घेतात. त्यांच्याबरोबर बसून दूरचित्रवाणीवरील कार्यक्रम पाहतात, त्यांना फिरायला घेऊन जातात. त्यांच्यासमवेत बाहेर जाऊन वेगवेगळे खेळसुद्धा खेळतात. आई-वडिलांच्या अनुपस्थितीत त्यांना एकटे वाटणार नाही आणि पालकत्वाची जबाबदारी योग्य रीतीने निभावली जाईल याची काळजी अशा प्रकारची सेवा देताना घेतली जाते. मुलांच्या भावनिक गरजाही लक्षात घेतल्या जातात. वैद्यकीय भेटीच्या वेळीदेखील हेच ‘व्यावसायिक’ पालक तिथे उपस्थित राहतात. मुलांना मानसिक आधार देण्याचे कामदेखील करतात. दिवसभरात मुलांच्या शारीरिक-मानसिक बदलांची निरीक्षणे मुलांच्या जन्मदात्या पालकांकडे नोंदवतात.

ही सुविधा आजच्या घडीला उच्चभ्रू कुटुंबांनाच परवडणारी असली तरीदेखील येत्या काळात ती मध्यमवर्गीयांच्यादेखील आवाक्यात येईल, असा अभ्यासकांचा अंदाज आहे. चीनमध्ये समाजमाध्यमांवर या सेवांची जाहिरात जोरात सुरू आहे. गरजू आई-वडील त्यांना योग्य वाटणारे ‘व्यावसायिक पालक’ निर्धारित काळासाठी निवडतात आणि मग ते ‘व्यावसायिक पालक’ आवश्यक असणारी सेवा पुरवित. लक्षावधी डॉलर्सची रक्कम भरून ‘व्यावसायिक पालकांना’ नियुक्त केले जाते. आई-वडील नसताना मुलांना एकटे वाटू नये, त्यांच्या भावनिक गरजा लक्षात घेऊन त्यांच्यासमवेत कुणीतरी असावे, यासाठी व्यावसायिक पातळीवरची ही सेवा स्वीकारून मुलांचा सांभाळ करण्याची जबाबदारी सोपवण्याकडे चीनमधील उच्चभ्रू व संपन्न पालकांचा कल वाढतो आहे.

व्यावसायिक पातळीवर पालकत्वाची भूमिका निभावणाऱ्या व्यक्तीदेखील उच्चशिक्षित आणि बालमानसशास्त्राचा अभ्यास केलेल्या असतात. चीनमध्ये तयार होत असलेले हे ‘व्यावसायिक पालक’ उच्च विद्याविभूषित असून त्यांनी जगभरातील अनेक प्रतिष्ठित विद्यापीठांतून पदव्या संपादन केलेल्या आहेत. विविध भाषांचे त्यांना ज्ञान असते. विविध खेळांचे कौशल्य त्यांनी आत्मसात केलेले असते. ते संवादात कुशल असतात आणि लहान मुलांना योग्य रीतीने सांभाळण्यात वाकबगार असतात. त्यामुळेच अशा पालकांकडे आपल्या मुलांना निर्धास्तपणे सोपवून जाता येऊ शकते हा विश्वास जन्मदात्या पालकांना आलेला आहे. दिवसभर मुलांसमवेत नुसते थांबण्याऐवजी त्यांच्या प्रत्येक गरजा योग्य रीतीने पूर्ण करून त्यांची चांगली

काळजी घेण्याकडे ‘व्यावसायिक पालकां’चा त्यांचा कल असतो. म्हणूनच ही संकल्पना चीनमध्ये सध्या लोकप्रिय होताना दिसते आहे.

Southern Weekly या चिनी साप्ताहिकाने या संदर्भात अभ्यासपूर्ण मांडणी करणारा लेख प्रसिद्ध केला आहे. चीनमध्ये सध्या वाढत असलेल्या या नव्या सेवेविषयी भाष्य करताना ही सेवा पुरवणाऱ्यांत महिला व्यावसायिक सर्वाधिक असल्याचे निरीक्षण तिथे नोंदवले आहे. त्याचप्रमाणे, मुलांचे संगोपन करण्यासाठीदेखील महिलांनाच प्राधान्य दिले जाते असे दिसून येते आहे. मुलांचे संगोपन आईच जास्त चांगले करू शकते, असा आजही समज असल्याने ‘व्यावसायिक पालकत्वा’ची सेवा घेताना महिलांना प्राधान्य दिले जाते. मुलांच्या क्रीडाविकासासाठी मात्र पुरुषांची निवड केली जाते. चीनमधील या संकल्पनेचा वेगाने प्रसार होत असला तरी त्याचा मोठा तोटा सुदूर भविष्यात संभवतो, असे अभ्यासकांचे मत आहे. त्यांच्या मते, मुले जितका अधिक काळ ‘व्यावसायिक पालकां’च्या सहवासात राहतात तेवढा त्यांचा जन्मदात्या आई–वडिलांपेक्षा या ‘व्यावसायिक पालकांवर’ अधिक विश्वास असतो आणि ते त्यांच्याशीच भावनिकरीत्या जोडले जातात. जेव्हा एखादी व्यक्ती मुलाच्या सगळ्या भावनिक गरजांकडे लक्ष देते तेव्हा ते मूल आई–वडिलांपासून कायमचे दुरावू शकते. वर्तमानातील समस्येवर तात्पुरते उत्तर शोधताना एका नव्या भविष्यकालीन संभाव्य समस्येला तर आपण जन्माला घालत नाही ना याचे उत्तर मात्र अद्याप मिळालेले नाही. ■■


मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी
यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत २१ व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणाऱ्या रानडे–तेलंग–चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक : नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/– रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

# पर्यावरण

## वितळणारी बर्फाची चादर

जागतिक तापमानवाढ ही अवघ्या जगाच्या पुढ्यातील एक मोठी गंभीर समस्या आहे. अनेकानेक कारणांमुळे पृथ्वीचे तापमान वाढत चालले असून त्याचे विपरित परिणाम भोगावे लागत आहेत. या बदलांच्या खुणा आणि त्यांची दाहकता आता जाणवू लागलेली आहे. याच परिणामांचा एक भाग म्हणजे उत्तर अटलांटिकमधील वितळत चाललेली बर्फाची चादर हा सगळ्यांसाठी चिंतेचा विषय बनतो आहे. अंटार्क्टिका हा पृथ्वीवरील सात खंडांपैकी एक खंड आहे. हा खंड सर्वांत दक्षिणेस वसला असून पृथ्वीचा दक्षिण ध्रुवही या खंडावर आहे. हा ट्रान्स अंटार्क्टिक पर्वतरांगांनी विभागला गेला आहे. प्रशांत, अटलांटिक आणि हिंदी महासागरांच्या दक्षिण टोकालाच 'दक्षिण महासागर' असे म्हणतात. अशा दक्षिण महासागराने अंटार्क्टिका खंड वेढला गेला आहे. हा खंड इतर सर्व खंडांपेक्षा अधिक थंड, कोरडा, प्रचंड वारे वाहत असणारा व सर्वांत जास्त सरासरी उंची असणारा खंड आहे. अंटार्क्टिका खंड हा ऑस्ट्रेलिया, युरोप या खंडांपाठोपाठ आकारमानाने तिसरा सर्वांत लहान खंड आहे. याचा ९८ टक्के पृष्ठभाग बर्फाच्छादित आहे. जागतिक तापमानवाढीच्या बदलांचा दक्षिण महासागराच्या तापमानावर लक्षणीय परिणाम होत असल्याचे दिसून आले आहे. दक्षिण महासागराचा बर्फ २००७ पासून मोठ्या प्रमाणात वितळू लागला आहे. जगासाठी ही धोक्याची घंटा मानली जाते आहे. भारतीय मॉन्सूनवरही त्याचे परिणाम होऊ लागले आहेत.

दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या घातक वायूंच्या उत्सर्जनामुळे तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ होताना दिसते आहे. दक्षिणेकडील वारे वेगाने दक्षिण महासागरात पोहोचतात आणि त्यामुळे तेथील बर्फ वेगाने वितळतो. २००७ सालामध्ये ४.१३ दशलक्ष चौरस किलोमीटर इतका बर्फ वितळला होता. एका अहवालानुसार, दर १० वर्षांनी अंटार्क्टिकचा १२.६ टक्के बर्फ वितळतो आहे. शास्त्रज्ञांच्या मते,

अंटार्क्टिकामध्ये वाढत चाललेली उष्णता या सगळ्यासाठी प्रामुख्याने जबाबदार आहे. जगाचा 'आइस बॉक्स' मानल्या जाणाऱ्या अंटार्क्टिकातील बर्फाची चादर खूप जाड आहे.

परंतु हवामानबदलाच्या परिणामांमुळे या चादरी वेगाने वितळत असल्याचे दिसून येते आहे. बर्फाच्या कडांचा आकार अगदी पर्वतासारखा असतो. काही काळानंतर या कडा तुटायला लागतात आणि हा सर्व बर्फ महासागरात मिसळला जातो; त्यामुळे समुद्राच्या पातळीत वाढ होते. अंटार्क्टिकातील संपूर्ण बर्फ वितळल्यास संपूर्ण जगभरातील समुद्रपातळी एक फुटापेक्षाही जास्त वाढेल, अशी शक्यता शास्त्रज्ञ वर्तवत आहेत. हे सारे धोके अद्याप शक्यतेच्या कोटीतील असले तरी संभाव्य धोक्याच्या पाऊलखुणा आतापासूनच दिसू लागल्या आहेत. हे बर्फ वितळण्याची कारणेही त्यांनी स्पष्ट केलेली आहेत. मात्र, वितळत चाललेल्या या बर्फाविषयी अधिकाधिक संशोधन होणे गरजेचे आहे, अशी भूमिका शास्त्रज्ञ मांडतात.

पहिले कारण म्हणजे, समुद्राचे पाणी बर्फापेक्षा गडद रंगाचे असते, त्यामुळे ते जास्त उष्णता शोषून घेते आणि कमी उष्णता पर्यावरणात सोडते. यामुळे अधिक बर्फ वितळतो आणि जसजसे पाणी वाढते, जसजशी अधिक उष्णता शोषली जाते, तसतसा अधिक बर्फ वितळतो. हे दुष्टचक्र अलीकडच्या काळात वाढतच चालले आहे. म्हणूनच उर्वरित पृथ्वीच्या तुलनेत अंटार्क्टिक दुप्पट वेगाने गरम होत आहे. दुसरे कारण म्हणजे, अंटार्क्टिकामधील बहुतेक जमीन नेहमी बर्फाच्या चादरीखाली गोठलेली असते. अनेक प्रकारचे सेंद्रिय पदार्थ त्यात आहेत, खूप मोठ्या प्रमाणावर कार्बनदेखील आहे. तो वितळल्याने कार्बन डाय-ऑक्साइड वातावरणात सोडला जातो. त्याचा परिणाम म्हणून बर्फवृष्टीचा काळ कमी होतो आहे. जेव्हा बर्फ वितळतो तेव्हा कार्बन डाय-ऑक्साईड व मिथेन (जो कार्बन डाय-ऑक्साइडपेक्षा अधिक प्रभावी हरितगृह वायू आहे) बाहेर पडतो आणि जागतिक तापमानवाढीसाठी ते एक प्रमुख कारण ठरू शकते, असे संशोधनातून समोर आले आहे.

अंटार्क्टिकामधील बर्फाची चादर वेगाने वितळण्यामुळे सागरी प्रवाहांचा वेग कमी होईल, अशी एक प्रमुख भीती व्यक्त केली जाते आहे. कारण, अंटार्क्टिकामधील बर्फ वितळल्याने उष्ण कटिबंधातून उत्तरेकडे वाहणाऱ्या पाण्यातील क्षार कमी होतील आणि त्यामुळे पाण्याची घनता कमी होईल. परिणामी सागरी प्रवाहाचा वेग कमी होईल. अशी शक्यता वर्तवली जाते. त्यामुळे प्रशांत महासागरातील 'एल निनो पॅटर्न'वर परिणाम होऊ लागला आहे, असा शास्त्रज्ञांचा दावा आहे. भारतीय

उपखंडातील संपूर्ण प्रदेश म्हणजे बांगलादेश ते अफगाणिस्तानमार्गे नेपाळ, दक्षिण चीन आणि भारत या देशांना सातत्याने वादळी पाऊस, पूर आणि ढगफुटी यांसारख्या आपत्तींना त्यांपायी तोंड द्यावे लागणार आहे. त्याची सुरुवात झाली असल्याचीही काही उदाहरणे समोर येत आहेत.

आगामी काळात या घटनांमध्ये आणखी वाढ होणार असल्याचा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. हिमालयाच्या उत्तर आणि दक्षिणेकडे वारे वेगाने वाहत असल्याने आसपासचा परिसरही पाण्याखाली जाऊ लागला आहे. थंड वारे सखल भागातील उष्ण वाऱ्यांना धडकतात तेव्हा वादळ निर्माण होते. त्यामुळे भारतात वादळी पाऊस आणि पूर वाढत असल्याचे जे चित्र दिसते आहे त्यामागचे हेच कारण असू शकते असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. जंगलांचा वेगाने ऱ्हास होत असल्याने पावसामुळे जमीन वाहून जाते आहे. परिणामी नद्या तुडुंब भरत आहेत. त्यामुळे थोडासा पाऊसही पुराची परिस्थिती निर्माण करतो असे चित्र दिसू लागले आहे. या सगळ्या परिणामांमुळे आर्क्टिक प्रदेशातील बर्फाळ पट्टे २०३० सालापर्यंत पूर्णपणे नष्ट होतील, अशी भीती शास्त्रज्ञ व्यक्त करू लागले आहेत. हे असेच होत राहिले तर, दक्षिण महासागरातील हिमनद्या २०३० सालापर्यंत पूर्णपणे नाहीशा होऊ शकतात, असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. जगाच्या तुलनेत अंटार्क्टिकाचे तापमान चारपट वेगाने वाढत असल्याने गेल्या ४० वर्षांत, उन्हाळ्यानंतर शिल्लक राहिलेला बहुस्तरीय बर्फ ७० लाख चौरस किलोमीटरवरून केवळ ४० लाख चौरस किलोमीटर इतका कमी झाला आहे. हिमनद्या किती वेगाने बदलत आहेत आणि तेथील बर्फाची चादर किती वेगाने कमी होत चालली आहे, यावर लक्ष ठेवणे म्हणूनच आवश्यक बनले आहे. विविध देशांनी सोडलेल्या उपग्रहांच्या माध्यमातून यावर लक्ष ठेवण्याचे काम केले जाते.

या संदर्भात संशोधन करणाऱ्या अमेरिकी शास्त्रज्ञांचे नेतृत्व करणारे Dartmouth कॉलेजमधील Earth Sciences विभागाचे प्राध्यापक Mathieu Morlighem यांनी या विषयीचा संशोधन प्रबंध तयार केला आहे आणि या विषयावर विपुल लेखनही केलेले आहे. त्यांच्या मते, एकूण परिस्थिती लक्षात घेता अंटार्क्टिकातील बर्फाची चादर नाहीशी होणार हे नक्की आहे. परंतु, प्रश्न इतकाच आहे की ते किती वेगाने होणार आणि त्याचा वेग आपण काही प्रमाणात थोपवू शकू का? पश्चिम अंटार्क्टिकाचा बर्फ विघटित होत असल्याने त्याचा एकूण पृथ्वीच्या पर्यावरणावर आणि लोकांवर होणारा परिणाम खूप महत्त्वाचा ठरणार आहे. बर्फाची चादर वितळत

जाण्याने समुद्रकिनारी वसलेल्या लोकसंख्येला त्याचा उपसर्ग पोहोचू नये यासाठी प्रतिबंधात्मक व सुरक्षा यंत्रणा सिद्ध करण्यासाठी पुरेसा वेळ मिळणे आवश्यक आहे. बर्फाची चादर वितळल्यानंतर समुद्राची पातळी नेमकी कधीपर्यंत आणि कितपत वाढेल, संरक्षणाच्या उपाययोजना करण्यास लोकांना किती वेळ मिळेल हे अचूकपणे सांगणे कठीण आहे. शास्त्रज्ञांच्या मते या अनिश्चितता कमी करण्यासाठी अधिकाधिक संशोधन आणि अभ्यास होणे गरजेचे आहे.

पश्चिम अंटार्क्टिकमधील बर्फाची चादर ही निसर्गातील अनेक महाकाय प्रणालींपैकी एक मानली जाते. तापमानवाढीने विशिष्ट पातळी ओलांडल्यामुळे या प्रणालीचा समतोल ढासळला जातो आहे. अंटार्क्टिकमधील बर्फाची चादर पूर्णपणे वितळल्यास पृथ्वीसाठी ती मोठी समस्या ठरू शकेल, अशी भीती शास्त्रज्ञ व्यक्त करीत आहेत. Mathieu Morlighem आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या संशोधनात बर्फाचा कडा कसा वेगळा होतो याचा खूप तपशीलवार अभ्यास केलेला आहे. आता त्यांनी Thwaites Glacier चा अभ्यास सुरू केलेला आहे. त्याचा आकार फ्लोरिडा शहराइतका आहे. ही अंटार्क्टिकमधील सर्वांत वेगाने वितळणारी हिमनदी मानली जाते. हिमनदीचा तरंगता कडा वितळल्यास काय होईल याचा अभ्यास केला असता असे लक्षात आले की हा हिमकडा पूर्णपणे वितळल्यास हिमनदीचा बर्फ अधिक वेगाने समुद्राकडे वाहू लागेल. त्यातून भविष्यात काय परिस्थिती निर्माण होऊ शकणार आहे याचा अंदाज शास्त्रज्ञांना आलेला आहे. परंतु, या संदर्भात अधिक सखोल असे संशोधन होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे जागतिक तापमानवाढीचे जे धोकादायक परिणाम होत आहेत ते कमी करण्यासाठी सगळ्यांच पातळ्यांवर कठोर उपाययोजनांची आवश्यकता आहे. अन्यथा वेगाने वितळत चाललेली ही बर्फाची चादर सगळ्यांच्या अस्तित्वाच्याच मुळावर उठणार आहे.

# आंतरराष्ट्रीय

## नव्या शांतीयुद्धाची नांदी?

चीनने कितीही कुरघोड्या करण्याचा प्रयत्न केला तरीदेखील जागतिक पटलावरील महासत्ता म्हणून आपले स्थान आजवर अबाधित राखलेल्या अमेरिकेने आता बदलत्या काळाची पावले ओळखून विचारपूर्वक पावले उचलण्यास सुरुवात केलेली आहे. महासत्तेच्या आजवर अढळ असलेल्या आपल्या स्थानाला आता चीनच्या रूपाने एक प्रबळ आव्हान निर्माण होत असल्याचे अमेरिकेच्याही लक्षात आलेले आहे. विविध क्षेत्रांत चीनने केलेली जबरदस्त प्रगती आणि जागतिक बाजारपेठेमध्ये निर्माण केलेले स्वत:चे दमदार स्थान लक्षात घेता चीनच्या आव्हानाकडे दुर्लक्ष करून या पुढे चालणार नाही याची अमेरिकेला सुस्पष्ट जाणीव झालेली आहे. केवळ औद्योगिक पातळीवरच नव्हे तर स्व-सामर्थ्याचा विस्तार करून चीनने जवळपास सर्वच पातळ्यांवर अमेरिकेच्या पुढ्यात एक मोठे आव्हान निर्माण केले आहे.

आजवर त्यावर उघडपणे भाष्य करणे टाळत आलेल्या अमेरिकेने आता अण्वस्त्रसाठा आणि क्षेपणास्त्रांची संख्या व पल्ला वाढवित नेणाऱ्या चीनचा धोका वाढता असल्याचे अलीकडे प्रथमच अप्रत्यक्षपणे मान्य केले आहे. अमेरिकेची शत्रुराष्ट्रे असणाऱ्यांना जवळ करून, त्यांना लागेल ती मदत पुरवून, त्यांच्याशी मैत्रीपूर्ण नाते प्रस्थापित करून अमेरिकेच्या विरोधात षडयंत्र रचण्याची चिनी कूटनीती अमेरिकेच्या लक्षात येते आहे. त्यामुळे शत्रुराष्ट्रांच्या समन्वयातूनच उद्या हल्ले केले जाऊ शकतात आणि या सगळ्याच्या पाठीशी राहून चीनच सगळी सूत्रे हलवू शकेल ही भीती अमेरिकेला आता वाटू लागली आहे. त्यामुळेच या सगळ्या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी आता अमेरिकेनेही आपल्या आण्विक धोरणामध्ये बदल करण्यास सुरुवात केलेली असून त्यामध्ये चीनसह त्यांच्या मित्रराष्ट्रांच्या संभाव्य कारवायांचा धोका केंद्रस्थानी आहे.

या सगळ्या पार्श्वभूमीवर, अमेरिकेला तिच्या अण्वस्त्रविषयक धोरणात बदल करावे लागावेत, याचे पडसाद जगभरात उमटू लागले आहेत. नव्या शीतयुद्धाची ही

नांदी असल्याचे या क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे. एका बाजूला, अवघ्या काही महिन्यांची कारकीर्द उरलेली असताना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष Joe Biden यांनी असा महत्त्वाचा धोरणात्मक निर्णय जाहीर केलेला असल्याने त्याकडे सगळ्यांचेच लक्ष वेधले गेले आहे. अमेरिकेच्या आण्विक क्षेत्रातील बदलांचा हा निर्णय आगामी काळात जगातील युद्धांचे रंगरूप बदलणारा ठरू शकेल, असे या क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे. अमेरिकेने ऐन मोक्याच्या क्षणी आण्विक धोरणात बदल करणे ही एक मोठी आंतरराष्ट्रीय खेळी असल्याचे जाणकारांचे मत आहे.

अमेरिकेच्या अण्वस्त्रविषयक धोरण संदर्भातील अत्यंत महत्त्वाचा Nuclear Employment Guidance या नावाचा एक दस्तऐवज दर चार वर्षांनी अद्ययावत केला जातो. अमेरिकेला ज्यांच्यापासून धोका वाटतो अशा चीन, रशिया, उत्तर कोरिया या देशांच्या संदर्भातील धोरणनिश्चिती या मसुद्याद्वारे केली जाते. म्हणूनच हे धोरण-विधान महत्त्वाचे मानचे जाते. राष्ट्राध्यक्षांची मंजुरी घेऊन हे धोरण निश्चित केले जाते. ही कागदपत्रे गोपनीय असल्याने त्यांची अंकीय आवृत्ती केली जात नाही. अत्यंत उच्चपदस्थ सरकारी अधिकारी आणि लष्करी अधिकाऱ्यांकडेच त्याची प्रत असते. सध्याच्या काळात ज्या झपाट्याने जागतिक क्षितिजावर बदल घडून येत आहेत आणि राष्ट्रा-राष्ट्रांमधील परस्परसंबंधांमध्ये जे परिवर्तन होते आहे ते लक्षात घेता अण्वस्त्रधोरणांचा अक्षही अमेरिकेने बदललेला असणार कयास असा आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील जाणकार अभ्यासक व्यक्त करीत आहेत.

Chicago Council on Global Affairs आणि Carnegie Corporation of New York यांनी अमेरिकेचे आण्विक धोरण आणि आण्विक सुरक्षेबाबत लोकांचा विश्वास या बाबतीत एक अभ्यास केला आहे. अमेरिकेच्या आण्विक धोरणाबाबत त्यांनी यात भाष्य केले आहे. आतापर्यंतच्या इतिहासात अमेरिकेबरोबर अणुयुद्ध छेडू शकेल, असा अमेरिकेच्या दृष्टीने प्रमुख शत्रू होता रशिया. एकमेकांना कायमच अणुयुद्धाच्या धमक्या हे देश देत आलेले आहेत. शीतयुद्धाच्या काळात तर या दोन्ही देशांची भयानक अण्वस्त्रस्पर्धा संपूर्ण जगाने अनुभवलेली आहे. सोव्हिएत संघराज्याच्या विघटनानंतर मात्र परिस्थितीमध्ये खूप बदल होत गेले. शीतयुद्ध समाप्त झाले आणि स्पर्धेची जागा अण्वस्त्रांबाबत माहितीच्या आदानप्रदानाने घेतली. आता परिस्थिती आणखीनच बदललेली आहे. रशियामध्ये व्लादिमिर पुतीन यांची एकाधिकारशाही आहे. तर दुसरीकडे चीनमध्ये Xi Jinping यांच्या नेतृत्वाखाली अशाच प्रकारची हुकुमशाही व्यवस्था नांदते आहे. चीनने धोरणात्मक नियोजन

करून विविध क्षेत्रांत केलेली प्रगती, वैश्विक महासत्तेच्या स्पर्धेत स्वत:च्या स्थानाबाबत केलेला प्रबळ दावा आणि शस्त्रसज्जतेच्या दृष्टीने टाकलेली आक्रमक पावले लक्षात घेता, अमेरिकेला आता नव्या संदर्भांमध्ये चीनची अधिक भीती वाटू लागली आहे.

अण्वस्त्र शस्त्रागारात चीन सातत्याने वाढ करीत असून येत्या दशकभरात तो रशियालादेखील मागे टाकेल, अशी शक्यता वर्तवली जाते आहे. अशातच उत्तर कोरियामध्ये Kim Jong Un यांच्या रूपाने एक आणखी धोका निर्माण झाल्याची भीती आहे. या देशाची आक्रमकता आणि अण्वस्त्रसज्जता यांचीही धास्ती आहे. त्यामुळे ही सगळी शत्रूराष्ट्रे उद्या एकत्र आली आणि त्यांनी समन्वयाने हल्ला केला तर काय होईल याची भीती अमेरिकेला नक्कीच आहे. त्या पार्श्वभूमीवर अमेरिकेच्या नव्या आण्विक धोरणाचे महत्त्व अधिक ठळकपणे अधोरेखित होते. रशिया आणि चीनची सामरिक भागीदारी ही कोणापासून लपून राहिलेली नाही. उत्तर कोरियाचे हुकुमशहा Kim Jong Un यांची पुतीन आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी असलेली मैत्री सर्वश्रुत आहे. त्यांतच युक्रेनविरोधी युद्धात इराण रशियाला रसद पुरवित आहे. ते लक्षात घेता उद्या आवश्यकता भासल्यास रशिया अण्वस्त्रांची मदत इराणला करणारच नाही हे कुणी सांगू शकणार नाही. त्यामुळे महासत्ता बनण्याची महत्त्वाकांक्षा असणारे चीन व रशिया हे दोन शत्रू देश एकत्र आले तर आपलीची कोंडी होऊ शकते याची जाणीव झाल्यानेच अमेरिकेला आपले अण्वस्त्रविषयक धोरणा बदलावे लागले आहे.

वैश्विक सत्तापटलावरील महासत्ता बनण्याची चिनी महत्त्वाकांक्षा एव्हाना लपून राहिलेली नाही. अमेरिका ज्या ज्या क्षेत्रांत पुढे आहे त्यात घुसून, कुरघोडी करून आपणच पुढे कसे राहू यांबाबत चीनचा सगळ्याच क्षेत्रांत प्रयत्न दिसून येतो आहे. अमेरिकेला खाली खेचून महासत्तेचा मुकूट आपल्या डोक्यावर धारण करण्यास चीन आसुसलेला आहे. त्यासाठी कोणत्याही थराला जायची त्याची तयारी असल्याने या पुढील काळामध्ये अधिक सावध राहून पावले टाकावी लागणार आहेत, याची जाणीव अमेरिकेतील जाणकार धुरीणांना झालेली आहे. त्यामुळे चीनशी असणारे संबंध योग्य राखून कशी वाटचाल करता येईल यावर नूतन आण्विक धोरणात भर दिलेला असेल, असा या विषयातील जाणकारांचा अंदाज आहे. अण्वस्त्रसाठा आणि क्षेपणास्त्रांची संख्या व पल्ला वाढवित नेणाऱ्या चीनचा धोका अमेरिकेसह तिच्याशी चांगले संबंध राखून असलेल्या इतर देशांसाठीही एक इशारा ठरावा अशा पद्धतीने चीनने आपली रणनीती आखलेली आहे.

अमेरिकेचे आण्विक धोरण जागतिक पटलावर मात्र अनेक नवे बदल घडवेल अशी शक्यता आंतरराष्ट्रीय संबंधातील जाणकार व्यक्त करीत आहेत. आगामी काळात अमेरिका आणि चीनमध्ये अण्वस्त्र स्पर्धा आणखी वाढीला लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे ही दुसऱ्या शीतयुद्धाची नांदी ठरू शकेल असा जाणकारांचा अंदाज आहे. हा सत्तासंघर्ष येणाऱ्या काळात आणखी तीव्र होत जाणार असून सगळ्या जगालाच त्याचे परिणाम भोगावे लागणार आहेत. अण्वस्त्रसज्ज राष्ट्रे नेहमीच युद्धात अण्वस्त्रांचा वापर करण्याची धमकी एकमेकांना देत असतात. अमेरिकाही या पुढील काळात अधिक आक्रमक पवित्रा घेऊन अण्वस्त्रशक्तीचा दबदबा निर्माण करेल आणि जगावर प्रभुत्व राखण्याचा प्रयत्न करेल असा अभ्यासकांचा अंदाज आहे.

# जिकडे-तिकडे

## मुलींचा वेगाने वाढणारा मेंदू

'कोविड-१९' चे महासंकट जगावर आले तेव्हा आणि त्या नंतर अनेकानेक गोष्टी बदलत गेल्या. या महासंकटाचा प्रसार ज्या वेगाने जगात होत गेला तो पाहता त्या संकटाचा सामना करण्यासाठी त्याचा पुरता अंदाज येण्याचा अवधीही मिळाला नाही. त्याच्याशी लढण्याची आवश्यक ती सज्जता होईपर्यंत या संकटाने अनेक ठिकाणी होत्याचे नव्हते करून टाकलेले होते. अखेर टाळेबंदी हा एकच पर्याय समोर उरला. अवघे जग थांबले. जीवनव्यवहार ठप्प झाले. प्रवास-पर्यटनाला खीळ बसली. एकीकडे शरीरावर आघात करणाऱ्या 'कोविड-१९'च्या विषाणूंशी लढणे आणि दुसरीकडे आजवर कधीही न अनुभवलेले असे काही तरी बाहेर घडत असल्याने त्या परिस्थितीचा सामना करताना मनावर होणारे परिणाम सहन करत राहणे, अशा दुहेरी कचाट्यात माणसे सापडली. या संकटात जीव गमवावा लागलेल्या व्यक्तींची तर गणनाच नाही. दुसरीकडे या सगळ्या परिस्थितीचे माणसाच्या मानसिकतेवरही मोठे परिणाम होत होते. फक्त ते लगेच दिसून येण्यासारखे नव्हते. 'कोविड-१९'च्या विषाणूंपासून बचाव करू शकेल अशी लस तातडीने संशोधित करून ती लोकांना देण्यात आली. कालांतराने 'कोरोना'चे संकटही विरळ होत गेले आणि हळूहळू जीवनमान पुन्हा एकदा रुळावर आणि पूर्वपदावर आले. ठप्प झालेले पर्यटन सुरू झाले आणि माणसा-माणसांत राखावयाचे अंतरही संपुष्टात आले. सारे काही सुरळीत सुरू झाले आहे असे चित्र दिसू लागले. परंतु, अनेकदा एखादे संकट निवारले गेले असे वरकरणी दिसत असले तरी त्याचे अनेकानेक दूरगामी परिणाम झालेले असतातच. ते त्या क्षणी दिसून येत नाहीत. परंतु कालांतराने ते उघड होतात. अमेरिकेमध्ये मुलींच्या मेंदूसंदर्भात नव्याने संशोधन झालेले असून त्यातून समोर आलेले निष्कर्ष हे धक्कादायक आहेत आणि 'कोविड-१९'च्या काळाशी प्रामुख्याने संबंधित आहेत.

मेंदूच्या विकासाविषयीचा एक अभ्यास अमेरिकेत अलीकडेच करण्यात आला. त्या अभ्यासात मुलींच्या मेंदूची चाचणी करण्यात आली. हा अभ्यास ‘करोना’ काळात आणि त्या आधी केलेल्या मुलींच्या चाचणीवर आधारित होता. या अभ्यासासाठी संशोधकांनी ९ ते १७ वयोगटातील १६० विद्यार्थ्यांची निवड केलेली होती. २०१८ सालापासून या अभ्यासाला सुरुवात करण्यात आली होती.

अभ्यासात असे आढळून आले की, ‘कोविड-१९’च्या काळात झालेल्या टाळेबंदीनंतर मुलींचे मेंदू अपेक्षेपेक्षा खूप वेगाने वाढत आहेत. ‘कोरोना’ काळातील विलगीकरण त्यासाठी कारणीभूत आहे असा दावा संशोधकांनी केलेला आहे. Washington University च्या पुढाकाराने हा अभ्यास करण्यात आला आहे. National Academy of Sciences अंतर्गत ही चाचणी घेण्यात आली. त्या चाचणीद्वारे Cortical Thinning चा अभ्यास करण्यात आला. Cortical Thinning ही अशी प्रक्रिया आहे जी प्रामुख्याने पौगंडावस्थेमध्ये सुरू होते. दोन मज्जातंतूच्या पेशींमध्ये एक लहान जागा असते तिला synapse असे म्हणतात. Cortical Thinning च्या प्रक्रियेमध्ये मेंदू निरर्थक असणाऱ्या synapseची छाटणी करतो आणि त्यांचा बाह्यस्तर काही प्रमाणात पातळ करतो. शास्त्रज्ञांच्या मते, या प्रक्रियेमध्ये मेंदू अधिक परिपक्व होतो आणि मेंदूची कार्यक्षमतादेखील वाढत जाते. त्यामुळे हा स्तर पातळ होण्याचे लाभच आहेत, असे शास्त्रज्ञांचे मत आहे. मेंदूची कार्यक्षमता या योग्य काळात जर वाढली तर आपली समज विकसित होण्यामध्ये, गोष्टींचे आकलन होण्यामध्ये, बुद्धिमत्ता प्रगल्भ होण्यामध्ये चांगले लाभ मिळू शकतात. परंतु, ‘कोविड-१९’सारखे संकट जेव्हा जगावर आले तेव्हा या प्रक्रियेचा वेग अधिक वाढला असल्याचे शास्त्रज्ञांना संशोधनातून दिसून आले आहे. तणावपूर्व परिस्थितीत ही प्रक्रिया अधिक गतिमान होते. नैराश्य आणि चिंता जेव्हा वाढत जाते तेव्हा Cortical Thinningच्या प्रक्रियेची गती वाढते असे अभ्यासातून समोर आले आहे.

जगभरात जेव्हा संचारबंदी होती तेव्हा तो काळ असाच तणावपूर्ण होता. परिस्थिती कधी बदलेल या विषयी अनिश्चितता होती. सगळीकडे चिंता वाढवणारे, निराशा निर्माण करणारे असे वातावरण होते. जेव्हा परिस्थितीत थोडा बदल झाला आणि वातावरण बदलू लागले तेव्हा मानसिक स्थिती थोडीशी सुधारली. संचारबंदी उठू लागल्यानंतर अमेरिकेतील शास्त्रज्ञांनी पौगंडावस्थेतील मुला-मुलींच्या चाचण्या घेतलेल्या होत्या. त्यात असे आढळून आले होते की, ‘कोरोना’च्या काळात मुले

आणि मुली दोघांच्याही मेंदूंची वाढ जलद गतीने होते आहे आणि Cortical पातळ होत चालले आहे. परंतु या चाचणीमध्ये अधिक उल्लेखनीय आणि ठळकपणे लक्षात येणारी आणखी एक बाब होती आणि ती म्हणजे, मुलींमध्ये याचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून आले. मुलींमध्ये Cortical पातळ होण्याचे प्रमाण सरासरी ४.२ वर्षे अशा इतक्या अधिक वेगाने वाढल्याचे दिसून आले. Cortical पातळ होण्याचे प्रमाण मुलांमध्ये त्या तुलनेत सरासरी १.४ वर्षे इतक्या अधिक वेगाने वाढत असल्याचे लक्षात आले.

याचा परिणाम म्हणजे मुलींचा मेंदू 'कोरोना'नंतरच्या काळात वेगाने वाढत असल्याचे लक्षात आले आहे. हा अभ्यास करणाऱ्या संशोधक अभ्यासगटातील Washington University च्या Patricia K. Kuhl यांच्या मते, 'कोरोना' काळातील मानसिक स्थितीचा परिणाम निश्चितपणाने मुलींच्या मेंदूतील प्रक्रियांवर झालेला आहे. त्यामुळे प्रयोगशाळेत ज्या मुलींच्या चाचण्या झाल्या यांनुसार १४ वर्षाच्या मुलीचा मेंदू आता १८ वर्षाच्या मुलीसारखा दिसतो आहे. तसे म्हटले तर हा 'कोरोना'च्या अवघड अशा काळामुळे घडून आलेला एक गंभीर परिणामच म्हटला पाहिजे.

Patricia K. Kuhl यांच्या मते साथीच्या रोगामुळे जी काही सामाजिक परिस्थिती सर्वत्र उद्‌भवलेली होती ती या सगळ्याला जबाबदार आहे. टाळेबंदी करावी लागली तेव्हा प्रदीर्घ काळ आपल्याला सामाजिक संबंधांविना घालवावा लागेल असा विचार कुणीही केला नव्हता. त्यामुळे एक विचित्र अशी सामाजिक वंचितता निर्माण झाली आणि त्याचा फटका सर्वाधिक प्रमाणात किशोरवयीन मुलींना बसला असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळेच त्यांच्या मेंदूमध्ये या प्रक्रिया अधिक वेगाने घडल्याचे दिसते, असे संशोधकांचे तर्काधिष्ठित अनुमान आहे.

मुली किशोरवयात येतात तेव्हा तो काळ असा असतो की त्यांना अधिकाधिक संवाद हवा असतो. परस्परसंवाद त्यांना अधिक मोकळे बनवतो. या वयोगटातील मुलींच्या संवादाची भूक फक्त आई-वडिलांशी संवाद साधून भागत नाही तर त्यांना आपल्या मित्र-मैत्रिणींसमवेत वेळ घालवायला आणि संवाद साधायला आवडत असते. त्यांच्या मेंदूविकासाच्या प्रक्रियेचाच तो एक भाग असतो. त्या वयात निर्माण होणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्याचा आणि स्वत:ला तणावमुक्त करण्याचा त्यांचा तो एक मार्ग असतो. मात्र, 'कोविड-१९'च्या काळात यात अनेक अडथळे आले. परस्परसंवाद आणि भेटीगाठींवर खूप मर्यादा आल्या. त्या सगळ्याचे परिणाम मेंदूतील

आंतरिक प्रक्रियेवरदेखील झाले असणार आणि त्यामुळेच किशोरवयीन मुलींचे मेंदू मुलांच्या तुलनेत 'कोरोना'पश्चात वेगाने वाढले असल्याचे निष्कर्ष प्रयोगाअंती समोर आलेले आहेत, असे Patricia K. Kuhl यांनी स्पष्ट केले आहे. 'कोविड-१९' या साथीच्या आजारादरम्यान किशोरवयीन मुलांचे आरोग्य बिघडल्याचे बरेच पुरावे समोर आले होते. त्याची अनेक उदाहरणेही समोर आलेली होती.

परंतु आता या अभ्यासाने या काळात मुलांच्या आरोग्यावर झालेल्या परिणामांचा आणखी एक पैलू समोर आलेला आहे. अर्थात एका बाजूला या अभ्यासातून समोर आलेले निष्कर्ष खरे असले तरीदेखील ते तितकेसे धोकादायक नाहीत, अशी दुसरी बाजूही अन्य शास्त्रज्ञांनी मांडलेली आहे. Cortical पातळ होणे नुकसानकारकच आहे असे मानण्यास या शास्त्रज्ञांनी नकार दिलेला आहे. त्यांच्या मते, कदाचित त्या काळात जी परिस्थिती उद्भवली होती तिला सामोरे जात असताना मुलींच्या मेंदूमध्ये जे काही तात्कालीक बदल घडून आले त्यांचेही हे लक्षण असू शकते. त्यामुळे त्याकडे नकारात्मकतेनेच पाहण्याचे कारण नाही, अशी भूमिका California University तील Human Development Orgnisation चे Ronald E Dahl यांनी मांडली आहे. या नव्या अभ्यासाच्या निष्कर्षांबाबत मतमतांतरे असली तरी त्या निमित्ताने 'कोविड-१९'च्या कालावधीत झालेल्या परिणामांचा एक नवा पैलू मात्र निश्चितपणाने जगासमोर आला आहे.

## आरोग्य

# अध्ययन अक्षमतेवरचा उतारा

'तारे जमीन पर' हा हिंदी चित्रपट जेव्हा आला तेव्हा अनेकांना Dyslexia अर्थात 'अध्ययन अक्षमता' या समस्येविषयी अनेक गोष्टी समजल्या. तोपर्यंत मुलांच्या संदर्भातील या आजाराविषयी अज्ञानच अधिक होते. या विषयाबाबत शिक्षक आणि पालक अशा दोन्ही आघाड्यांवर पुरेशी जागरुकता नसल्याकारणाने शाळेत शिकणारी मुले जर अभ्यासात मागे पडत असतील तर त्यांची बौद्धिक क्षमता कमी आहे किंवा ती मुळातच 'ढ' आहेत असे शिक्के मारले जात असत. परंतु, अक्षरे ओळखण्यातच त्यांना अडचणी येत असतील आणि त्यामुळे लिहिताना-वाचताना त्यांना खूप समस्या येतात हे फारसे लक्षातच घेतले जात नव्हते. अलीकडच्या काळात मात्र या विषयाबाबतीत जागृती वाढत चालली असल्याचे दिसून येते आहे.

मुलांच्या शिकण्यासंदर्भातील अक्षमतेशी संबंधित असणारा 'अध्ययन अक्षमता' हा विकार आहे. अध्ययन अक्षमता हा जगभरात सर्वत्र आढळणारा विकार असून जगभरातील एकूण लोकसंख्येच्या सुमारे ५ ते १० लोकांमध्ये याचे प्रमाण कमी-अधिक प्रमाणात आढळते. याची लक्षणे अनेकदा बालवयातच दिसतात. परंतु, जिथे या विषयी पुरेशी जागरुकता नसते तिथे अशा मुलांकडे, 'अभ्यासात मागे पडलेली मुले' म्हणूनच पाहिले जाते. मुलींच्या तुलनेत मुलांमध्ये हा विकार दुप्पट किंवा तिपटीने अधिक प्रमाणात आढळतो, असे आजवरच्या जागतिक संशोधनातून समोर आलेले आहे.

अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये त्याची लक्षणे अभ्यासाच्या प्रक्रियेत आणि त्यांच्या दिनचर्येतच दिसून येऊ लागलेली असतात. शाळेत भाषेच्या तासाला वाचन केलेला मजकूर पुन्हा सांगायला सांगितला किंवा त्याचा अर्थ विचारला तर त्यांना ते सांगणे कठीण जाते. वाचन किंवा लिखाण या बाबतीत ही मुले खूपच मागे पडतात. त्यामुळे प्रत्येक विषयाच्या अभ्यासात अशा मुलांची पीछेहाट दिसून येते. त्यामुळे वर्गात इतर मुले ज्या गोष्टी सहजतेने आत्मसात करतात त्या समजावून घेणे अध्ययन अक्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांना अवघड जाते. त्यांच्यासाठी छोट्या छोट्या

बाबीसुद्धा आव्हानात्मक ठरतात. केवळ भाषेचेच विषय नव्हे, तर अंकगणिताच्या बाबतीतही अशा मुलांचा मोठा गोंधळ उडतो आणि साधी साधी आकडेमोडही त्यांना जमत नाही. इतकेच नाही तर, आवाज आणि चिन्हे ओळखताना ही मुले गोंधळून जातात. वाचत असलेले शब्द आणि त्यांचा अर्थ यांचा मेळ त्यांना लागत नाही. त्यांची प्रतिमा मेंदूत तयार होत नाही. त्यामुळे सगळेच क्लिष्ट, न समजणारे असे वाटू लागते. वाचन किंवा लिखाण करताना अक्षरे, शब्द किंवा संपूर्ण वाक्येच गाळली जातात. अनेकदा, आरशातील प्रतिमेप्रमाणे अक्षरेही उलटी लिहिली जातात. एकसारख्या वाटणाऱ्या शब्दांमध्ये गल्लत होते. इंग्रजी शब्दांचे स्पेलिंग लक्षात राहत नाही. अनेकदा त्यात ढोबळ आणि साध्यासुध्या चुका होऊन एकच शब्द ही मुले वेगवेगळ्या प्रकारे लिहितात. या स्वरुपाच्या अगदी ढोबळ वाटणाऱ्या चुका वारंवार होत असल्याने ही मुले वर्गात थट्टेचा विषय बनतात.

अध्ययन अक्षमतेची ही लक्षणे पालक आणि शिक्षकांनी वेळीच लक्षात घेऊन त्यावर प्रयत्न केले नाहीत, तर अशी मुले एककल्ली, हेकेखोर, हट्टी, दुराग्रही होतात. अनेकदा, 'आपण काहीही करू शकत नाही, आपल्याला काहीही येत नाही' असा न्यूनगंड या मुलांमध्ये निर्माण होत जातो. वाचन आणि शब्दलेखनाच्या अडचणी असलेल्या मुलांना या अध्ययन अक्षमतेमुळे आयुष्यभर अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. सुरुवातीला शाळेतच त्याकडे दुर्लक्ष झाले, तर पुढे कामाच्या ठिकाणी, दैनंदिन जीवनावरही त्याचा नकारात्मक परिणाम होतो.

अध्ययन अक्षमतेचा संबंध हा अनेकदा बुद्धिमत्तेशी किंवा सर्जनशीलतेशी जोडला जातो. परंतु अध्ययन अक्षमता असलेली मुले हुशार असतात, त्यांची आकलनक्षमता चांगली असते, फक्त लेखन-वाचनाच्या प्रक्रियेत त्यांना जे अडथळे येत असतात त्यावर त्यांना मात करता येत नसते. ही अडचण वेळीच लक्षात घेऊन त्यावर काम केले तर अध्ययन अक्षमतेच्या समस्येवरही मात करता येऊ शकते आणि त्यांचे व्यक्तिमत्त्वसुद्धा बहरू शकते, असे अभ्यासांती समोर आलेले आहे.

जगविख्यात शास्त्रज्ञ Albert Einstein, संगीतकार Ludwig Van Beethoven, महान शास्त्रज्ञ Charles Darwin, प्रख्यात साहित्यिक Ernest Hemingway आदी महानतम व्यक्तिमत्त्वांनादेखील त्यांच्या बालपणी अध्ययन अक्षमतेला सामोरे जावे लागलेले होते. परंतु बुद्धिमत्ता आणि सर्जनशीलतेशी त्याचा काहीही संबंध नसतो, हेच या उदाहरणांवरून स्पष्ट होते.

अध्ययन अक्षमता हा विकार नेमका कशामुळे होतो आणि त्या मागची कारणे काय याचा उलगडा संशोधकांना अद्याप झालेला नाही. परंतु, अलीकडे झालेल्या

एका संशोधनानुसार, जर्मनीतील Dresdenमधील संशोधकांनी असा दावा केला आहे की, मानवी मेंदूच्या बरोबर मध्यभागी असलेल्या Visual Thalamus नावाच्या विशिष्ट भागाशी हा विकार संबंधित आहे. आपल्या संवेदनांच्या आधारे समोर आलेल्या बाबींचा अर्थ लावण्याचे काम मेंदूमधील Visual Thalamus हा भाग करत असतो. Visual Thalamus हा एका बाजूला आपल्या डोळ्यांशी आणि दुसरीकडे आपल्या मेंदूतील बाह्य थराशी जोडलेला असतो. याची रचना आणि कार्यप्रणालीत झालेला बदलच अध्ययन अक्षमतेला कारणीभूत ठरतो, असे या संशोधनामध्ये लक्षात आले आहे. Visual Thalamus मधील रचना अतिशय गुंतागुंतीची असल्याने आणि तो मेंदूच्या अगदी आतील भागात आणि शिवाय आकाराने अतिशय लहान असल्याने 'एमआरआय'चा (मॅग्नेटिक रेझोनन्स इमेजिंग) वापर करून त्याचा अभ्यास करणे कठीण जाते.

अगदी अलीकडच्या काळामध्ये Leipzig विद्यापीठामधील Max Planck Institute for Human Cognitive and Brain Sciencesमध्ये 'एमआरआय' प्रणालीच्या मदतीने संशोधकांनी Visual Thalamusचा तपशीलवार अभ्यास केला. या संशोधनातून असे समोर आले की, अध्ययन अक्षमता असणाऱ्या व्यक्तींच्या Visual Thalamusच्या कार्य आणि रचनेत लक्षणीय बदल होतात, विशेषत: पुरुषांमध्ये हे बदल अधिक सुस्पष्ट दिसतात. अध्ययन अक्षमता असणाऱ्या काही निवडक व्यक्तींवर हा अभ्यास करण्यात आला आणि त्याचे निष्कर्ष Brain Journal मध्ये प्रकाशित करण्यात आले. Dresden येथील Cognitive and Clinical Nurosciences अध्यासनाच्या Cathrina Kegsten यांच्या मते हे संशोधन महत्त्वपूर्ण ठरणार आहे. कारण या संशोधनामुळे अध्ययन अक्षमता हा विषय मेंदूविषयक संशोधनाच्या केंद्रस्थानी ठेवून मेंदूचा सखोल अभ्यास करता येईल आणि अधिक संशोधनातून अनेक गोष्टी नव्याने उलगडतील. त्यामुळे या विकारावर उपचार करण्यासाठी हे संशोधन उपयुक्त ठरेल.

या नव्या संशोधनामुळे उपचारांच्या नवीन पद्धतीही विकसित होऊ शकतात. तसेच मेंदूच्या क्रियाशीलतेत बदल घडवून अध्ययन अक्षमतेशी संबंधित बाबींवर उपचार करण्यासाठीही प्रयत्न केले जाऊ शकतात. या विषयावर गेली अनेक वर्षे काम करणाऱ्या संशोधक Krista Myuller Akst यांच्या मते, नव्या संशोधनामुळे अध्ययन अक्षमतेची सुरुवात मेंदूत नेमकी कुठे आणि कशी होते हे आता नेमके कळले आहे.

मेंदूतील या भागाला केंद्रस्थानी ठेवून अध्ययन अक्षमतेच्या समस्येवर मात करणे भविष्यात शक्य होऊ शकेल, अशी आशा या नव्या संशोधनामुळे नक्की निर्माण झालेली आहे.

# संशोधन

## सश्रद्ध चिकित्सेची प्रगल्भ परिणती

'धर्म' आणि 'राजकारण' यांचे परस्परनाते हा सदैव एक वादग्रस्त आणि गुंतागुंतीचा विषय राहिलेला आहे. केवळ आपल्या देशातच नव्हे तर जगभरच. या संदर्भातील आजचे चित्र तर कमालीचे विपरित असेच दिसते. स्वत:च्या अथवा/आणि आपल्या पक्षाच्या तात्कालिक भरभराटीसाठी 'धर्म' या संकल्पनेला आणि तिच्याबरोबरच धर्मसंस्थेलाही वेठीला धरण्याची प्रवृत्ती विद्यमान राजकीय व्यवस्थेतील काही घटकांमध्ये प्रचंड प्रमाणात बळावल्याचे आपण पाहतो आहोत. ''मानवी समाजजीवनाची सकारात्मक व निकोप-निरामय अशी धारणा घडवून आणणारी एक पुरातन संस्था आणि विचार'', असे 'धर्म' या संकल्पनेचे अध्याहृत व अभिप्रेत असलेले मर्म मागे पडून, सत्तासंपादनेचे एक हुकुमी हत्यार म्हणून या संस्थेचा वापर करण्याची निरर्गल मानसिकता आज अनेक राजकीय पक्षांमध्ये कमी-अधिक प्रमाणात आढळून येते. गेल्या दोन दशकांदरम्यान जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला जगभरातील विविध देशांमधून जी एक नकारात्मक प्रतिक्रिया उमटताना दिसते आहे तिच्या कुशीतून संकुचित अशा राष्ट्रवादाची निपज क्रमाक्रमाने घडते आहे. उग्र अशा त्या राष्ट्रवादी भूमिकेला एक विलक्षण तलम असा पदर चिकटलेला आहे तो धार्मिक अहंगंडतेचा आणि धार्मिक कडवेपणाचा. परिणामी, राजकीय पक्षांच्या कार्यसंस्कृतीमध्ये धर्मनिगडित बाबींचा समावेश अधिकाधिक प्रमाणात एकीकडे होताना दिसतो तर, समाजजीवनातील नानाविध धर्मसंस्था या ना त्या प्रकारे राजकीय व्यवस्थेमध्ये उत्तरोत्तर सक्रिय बनत असल्याचे वास्तव आपण अनुभवतो आहोत. धर्मसंस्थेचा विध्वंसक विनियोग करण्याकडेच कल असणाया राजकीय व्यवस्थेतील राजकीय धुरिणांचे 'धर्म' या संस्थेबद्दलचे आकलन किती उथळ, बेजबाबदार आणि हिंसक आहे व असते याच्या खुणा अलीकडील काळात पदोपदी आपल्या नजरेस पडतात. धर्माबद्दलच्या ज्ञानाचा सार्वत्रिक अभाव असल्यामुळेच जगभरातील बहुतेक राजकीय

नेतृत्व आताशा 'धर्मशील' असण्याऐवजी कमालीचे 'धार्मिक' बनत चालल्याचे दुर्धर वास्तव अनुभवताना कोणाही सुजाण नागरिकाच्या मनीमानसी प्रगाढ नैराश्य दाटावे हे स्वाभाविकच ठरते. सत्तासंपादनासाठी आणि पदरात पडलेली सत्ता टिकवण्यासाठी धर्माचा वापर सरसहा करणाऱ्या आजकालच्या राजकीय नेतृत्वाला 'धर्म' या संकल्पनेबाबतचे सम्यक्, विशुद्ध आणि मूलभूत असे ज्ञान खरोखरच किती असेल, याचा प्रश्न पडल्याखेरीज राहात नाही. केवळ इतकेच नाही तर, ज्या समाजमनाचे नेतृत्व आपण करतो त्या समाजमानसावर अनादी काळापासून प्रभाव गाजवत आलेल्या 'धर्म' या संकल्पनेचे अंतरंग आपण प्रगल्भपणे समजावून घ्यावे अशी प्रेरणा तरी विद्यमान राजकारण्याच्या पिढीतील कितिकांच्या मनात आज अंकुरित होत असेल, याचीही शंकाच आहे. या अशा सगळ्या पार्श्वभूमीवर, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्यासारख्या धर्मचिंतक राजधुरिणाचे व्यक्तित्व, कर्तृत्व आणि लेखन कमालीचे आगळेवेगळे आणि एकमेवाद्वितीय असेच भासते.

मुदलात, राजकीय नेतृत्वाच्या राज्यातील एकंदरच पटलावर, दुर्दैवाने, पंजाबरावांचे कार्यकर्तृत्व त्या मानाने आजवर अलक्षित असेच राहिलेले आहे. त्यांमुळे, 'धर्मचिंतक' हा पंजाबरावांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक विलक्षण विलोभनीय व असाधारण पैलू विस्मृतीच्या खाईत लोटला जावा, हे स्वाभाविकच ठरते. शिक्षण, सहकार, शेती, ग्रामीण विकास यांसारख्या भारतीम अर्थकारणातील व एकूणच समाजजीवनातील संवेदनशील प्रांतांमध्ये केवळ राष्ट्रीयच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या कार्यकर्तृत्वाची अमिट मोहोर उमटविणाऱ्या पंजाबरावांच्या उभ्या व्यक्तिमत्त्वाची आणि साहजिकच त्यांच्या ठायी स्थिरावलेल्या जीवनविषयक तत्त्वदृष्टीची पायाभरणी नेमक्या कोणत्या संस्कारांद्वारे साकारलेली होती, याबाबत आपण कधीच आजवर विचार केलेला नाही व नव्हता. 'धर्म' या एका प्राचीन, पुरातन व अनादी काळापासून सतत उत्क्रांत होत आलेल्या प्रगमनशील संस्थेचा उगम आणि विकास यांबाबतची निखळ जिज्ञासा अंत:करणात दाटलेल्या पंजाबरावांनी अगदी तरूणपणातच त्या प्रांताचा जो सर्वांगीण आणि प्रगल्भ धांडोळा घेतला त्यांद्वारे व्यक्तिगत जीवन आणि सार्वजनिक जीवनातील सहज नातेसंबंध निकोपपणे जपण्यासाठी कार्यतत्पर होण्याची मनोधारणा त्यांच्या ठायी बलवत्तर बनली असावी, यावर विश्वास ठेवण्याजोगा एक विलक्षण बुलंद दस्तऐवज खुद्द पंजाबरावांनीच निर्माण करून ठेवलेला आहे. ''वैदिक साहित्यात धर्माचा उगम आणि विकास'' हा त्यांच्या धर्मविषयक चिंतनाद्वारे साकारलेला प्रबंध म्हणजे पंजाबरावांच्या जीवनराहाटीचा अविभाज्य भाग बनलेल्या धर्मशीलतेचा

अक्षराविष्कार होय. धर्मासारख्या एका अतिशय व्यापक, प्रसरणशील व तितक्याच गुंतागुंतीच्या चिंतनप्रांतामध्ये कमालीच्या आस्थेवाईकपणे परंतु पराकोटीच्या सश्रद्ध चिकित्सेचा हात न सोडता पंजाबरावांनी केलेल्या मुशाफिरीचा अनमोल, अजोड परिपाक म्हणजे त्यांचा हा ग्रंथ होय. पंजाबरावांच्या व्यक्तिमत्त्वातील संशोधक, चिकित्सक विद्वान आणि स्वयंप्रज्ञ विचारवंत या ग्रंथात त्यांनी मांडलेल्या विवेचनाद्वारे पानोपानी आपल्या पुढ्यात उभरून येतो. विद्यापीठीय स्तरावरील संशोधनासाठी तयार करावयाचा संशोधनपूत दस्तऐवज किती काटेकोरपणे, चिकित्सा आणि श्रद्धा यांचा समतोल जपत–सांभाळत, उपलब्ध अध्ययनसामग्रीचे अनाग्रही विश्लेषण करत सिद्ध करावयाचा असतो, याचा जणू रोकडा वस्तुपाठच ठरावा, असा हा प्रबंधग्रंथ होय. अध्ययन–लेखन–संशोधनातील अशी कडकडीत शिस्त अस्तंगत होण्याच्या पंथाला लागलेल्या आजच्या शैक्षणिक वास्तवात तर पंजाबरावांच्या अध्ययनविषयक या प्रामाणिक बांधिलकीचे मोल अनंत पटींनी अधिकच भरते, ही बाब आवर्जून नमूद करावीच लागेल. प्रस्तुत दस्तऐवजाच्या माध्यमातून आपल्या पुढ्यात उमलणारी पंजाबरावांच्या ठामीची अध्ययनविषयासंदर्भातील इतकी निष्कलंक निष्ठा आणि संशोधनाच्या प्रांतातील निर्मम चिकित्सेचा आदर शिरोधार्य मानण्याची निखळ बांधिलकी आजच्या जमान्यात झपाटाने विरळ होत जाताना दिसते. पंजाबरावांच्या व्यक्तिमत्त्वातील संशोधकाप्रतीचा आपला आदर अनेक पटीने वाढतो तो त्यांमुळेच.

मुळात, वैदिक साहित्याकडे आणि त्यांतल्यात्यांतही धर्मसंस्थेसारख्या केवळ प्राचीनच नव्हे; तर सर्वकाळ संवेदनशील ठरत आलेल्या प्रांताकडे पंजाबराव कसे, केव्हा व कशामुळे आकर्षित झाले, हीच चिंतनीय व तितकीच विस्मयकारक बाब ठरते. संस्कृतज्ज्ञ आणि वैदिक वाङ्मयाचे मर्मज्ञ, व्यासंगी अभ्यासक–संशोधक असा जो असाधारण लौकिक पंजाबरावांनी साध्य केला त्याची पायाभरणी नेमकी केव्हा व कशी झाली, हे कुतूहल शमविणारे कोणतेही माध्यम आज आपल्याला उपलब्ध नाही. संस्कृत भाषेबाबत पंजाबरावांना ओढा का निर्माण झाला, शालेय अथवा महाविद्यालयीन जीवनाच्या कोणत्या टप्प्यावर या अध्ययनप्रांताबाबतच्या जिज्ञासेने त्यांच्या मनोभूमीत मूळ धरले, कोणत्या शिक्षकांचा अथवा अध्यापकांचा प्रभाव या संदर्भात त्यांच्यावर पडला, संस्कृतचे प्राथमिक अध्ययन त्यांनी केव्हा व कोणापाशी केले, पुढे संस्कृत भाषेच्या अध्ययनामध्ये भरीव क्षमता व कौशल्य हस्तगत केल्यानंतर 'डॉक्टर ऑफ फिलॉसफी' (डी. फिल.) या पदवीसाठी वैदिक

साहित्याशी निगडित संशोधनविषय निवडण्याची प्रेरणा त्यांना कशी, केव्हा व कोणामुळे झाली, पुन्हा या पदवीसाठीचा प्रबंध त्यांनी ज्या ऑक्सफर्ड विद्यापीठाला सादर केला त्या ऑक्सफर्डमधील वास्तव्याचा या विषयनिवडीशी नेमका काय संबंध होता... यांसारख्या अनंत प्रश्नांची उत्तरे अतीताच्या पोटात पार गडप झालेली आहेत. संस्कृत साहित्याच्या विश्वात विहरण्याची मनीषा मनीमानसी बाळगणाऱ्या कोणाही अन्य तरूण विद्यार्थ्याला संस्कृत भाषेतील नाटके, काव्य, टीका, महाकाव्ये, कारिका यांचा ओढा वाटणे हे स्वाभाविक ठरले असते. परंतु, पंजाबराव मात्र वैदिक साहित्याकडे आणि त्यांत आढळणाऱ्या धर्मविषयक चिंतन-मननाकडे आकृष्ट होतात, ही वस्तुस्थिती पंजाबरावांच्या आंतरिक जडणघडणीबाबत व तिला आकार देणाऱ्या तत्कालीन घटकांबाबत अधिकच कुतूहल निर्माण करते. मुळातच, धर्मशील असणाऱ्या पंजाबरावांच्या व्यक्तिमत्त्वाला त्यांनी विद्यार्थीदशेत, आणि तेदेखील परदेशात, केलेल्या धर्मसंबंधी चिकित्सक संशोधनाद्वारे नेमके कोणते आगळे आयाम प्राप्त झाले आणि त्यांचे प्रतिबिंब त्यांनी जीवनभर साकारलेल्या कार्यकर्तृत्वामध्ये कशा प्रकारे प्रतिबिंबित होतात, हा खरे म्हणजे एक निराळाच अभ्यासप्रांत ठरेल.

'वैदिक साहित्यात धर्माचा उगम आणि विकास' हा ग्रंथ म्हणजे पंजाबरावांनी डी. फिल.च्या पदवीसाठी ऑक्सफर्ड विद्यापीठाला सादर केलेल्या प्रबंधाचे मराठी रूप होय. डॉ. स. मो. अयाचित यांनी पंजाबरावांच्या मूळ इंग्रजी भाषेतील लेखनाचा मराठीमध्ये केलेला हा अनुवाद प्रथम प्रकाशित झाला तो १९९९ साली. या अनुवादित ग्रंथात पंजाबरावांनी मूळ इंग्रजी प्रबंधाला लिहिलेल्या प्रास्ताविकाचा जो मराठी तर्जुमा दिलेला आहे त्यांखाली पंजाबरावांनी नमूद केलेली तारीख आहे ३० जून १९३३ अशी. पंजाबरावांनी त्यांच्या प्रबंधाचे लेखन व त्याची इंग्रजीमधील मुद्रणप्रत १९३३ साली पूर्ण केली असावी, असा कयास आपण यावरून बांधू शकतो. २७ डिसेंबर १८९८ ही पंजाबरावांची जन्मतारीख. म्हणजे, काळाचा हिशेब केला तर, वयाच्या पस्तिशीच्या टप्प्यावर पंजाबरावांनी त्यांचा हा अजोड प्रबंध सिद्ध केला. संस्कृतचे व वैदिक वाङ्मयाचे एक प्रकांड पंडित गणले जाणारे विख्यात विदेशी अभ्यासक डॉ. ए. ए. मॅक्डोनल यांच्या मार्गदर्शनाखाली पंजाबरावांनी या प्रबंधाचे काम सिद्धीस नेले. तर, याच अध्ययन-संशोधन प्रांतातील अधिकारी म्हणून मान्यता पावलेले त्या काळातील दुसरे दिग्गज डॉ. ए. बी. कीथ यांची प्रशस्ती पंजाबरावांच्या या प्रबंधास लाभलेली होती. संशोधनासाठी निवडलेल्या विषयाचे अंगोपांग किती बारकाईने, तटस्थ वृत्तीने, निर्ममपणे, स्वतंत्र प्रज्ञेने आणि

आस्थेवाईकपणा जपत असतानाच पुरेशा चिकित्सकपणे अभ्यासावयाचे असते याचा जिवंत, रोकडा आणि दीपस्तंभी वस्तुपाठ पंजाबरावांच्या या संशोधनपूत दस्तऐवजामध्ये पानोपानी साकारलेला आपल्याला दिसतो. हा सगळा अभ्यास व संशोधन पंजाबरावांनी जवळपास शंभर वर्षांपूर्वी, ऑक्सफर्डसारख्या त्रिखंडात मान्यता पावलेल्या विद्यापीठात व संशोधकीय शिस्तीबाबत व बांधिलकीसंदर्भात कणभरही तडजोड मान्य न करणाऱ्या अभ्यासकांच्या मार्गदर्शनाखाली सिद्धीस नेले, ही बाब, सर्व प्रकारची शैक्षणिक व संशोधकीय अशी पायाभूत मार्गदर्शक तत्त्वे व संकेत पार दुर्लक्षून टाकण्याच्या आजच्या संशोधकीय पर्यावरणात तर अधिकच देदीप्यमान शाबीत होते. ''सध्या वाढत चाललेल्या गैरशिस्तीचा परिणाम बौद्धिक व सांस्कृतिक पर्यावरण झपाट्याने बिघडण्याकडे होत आहे व त्यामुळे विद्याक्षेत्रही प्रदूषित होऊ लागले आहे. पंजाबरावांनी विद्येच्या परंपरेची शुद्धताच या ग्रंथाने दाखवून दिली आहे,'' हे मूळ प्रबंधाचे अनुवादक डॉ. स. मो. अयाचित यांनी त्यांच्या मनोगतात व्यक्त केलेले निरीक्षण पंजाबरावांच्या निरलस ज्ञाननिष्ठेचा कस अधोरेखित करणारे असेच आहे.

इथेही एक मोठी गंमतच आहे. वैदिक साहित्य आणि धर्म या संदर्भात पंजाबरावांच्या मनात जो अभ्यासविषय होता त्यापेक्षा वेगळाच विषय त्यांना प्रबंधलेखनासाठी प्रत्यक्षात निवडावा लागला. 'भारतातील देशी धर्मांचा उगम, विकास आणि आंतरिक संबंध', हा होता पंजाबरावांच्या मूळ आकर्षणाचा आणि म्हणून चिकित्सेचा प्रांत. तो विषय निश्चित करून त्यांनी प्राथमिक अध्ययन-संशोधनाला सुरुवातही केली असावी, याचा अप्रत्यक्ष दाखला खुद्द पंजाबरावच देतात. आपल्याला आकर्षित केलेल्या विषयाला संशोधनादरम्यान पुरेपूर न्याय द्यायचा तर चिकित्सेचा आणि परिणामी प्रबंधांतर्गत संशोधनाचा विस्तार एकदम अधिकच विस्तारेल याचा अंदाज पंजाबरावांना आला. अंत:मनाच्या चक्षूंना दिसणारा संशोधनाचा तो सगळा अवकाश शब्दबद्ध करायचा तर अपेक्षेपेक्षा किती तरी अधिक वेळ लागेल आणि अध्ययन-संशोधनासाठी आवश्यक ठरणारा तो वेळ ऑक्सफर्डमधील वास्तव्याच्या खर्चाचा भार पेलण्याबाबत आपली कोंडी करेल, हे वास्तव ध्यानात आल्याने पंजाबरावांनी तात्कालिक अशी अनिवार्य तडजोड पत्करली व 'वैदिक साहित्यात धर्माचा उगम आणि विकास', हा विषय डी. फिल.च्या संशोधनाभ्याकरीता निश्चित केला. पंजाबरावांची ज्ञाननिष्ठा इतकी निखळ आणि निरामय की, संशोधनाची व्याप्ती मर्यादित केलेल्या या अभ्यासविषयालादेखील आपण पुरेसा न्याय देऊ शकलो नाही, अशी खंत त्यांनी प्रबंधाच्या मनोगतामध्ये

नोंदवून ठेवली. हाताशी असलेला वेळ आणि वित्तीय साधने यांच्या मर्यादेत 'वैदिक साहित्यात धर्माचा उगम आणि विकास' या निर्धारित अभ्यासविषयाचा जेवढा धांडोळा घेता आला तेवढा घेऊन तिथवर झाले तेवढे काय ऑक्सफर्ड विद्यापीठाला सादर करून पंजाबराव मायदेशी परतले. जेवढे काम पंजाबरावांनी पुरे केलेले होते ते सारे संशोधन-लेखन त्या टप्प्यावर ऑक्सफर्ड विद्यापीठाने कोणतेही बदल अगर सुधारणा न सुचवता ग्राह्य मानले, ही एकच बाब पंजाबरावांच्या निरलस ज्ञानोपासनेची आणि संशोधकीय शिस्तीसंदर्भातील त्यांच्या बिनतोड बांधिलकीची साक्ष पुरविण्यास समर्थ आहे. मायदेशी परतल्यावर अनंत प्रकारच्या सामाजिक, राजकीय तसेच व्यावसायिक कामकाजात बुडून गेलेले असतानाही पंजाबरावांनी नेटाने व निष्ठेने प्रबंधाचे उर्वरित संशोधन-लेखन तडीस नेले व पूर्णावस्थेस नेलेला प्रबंध ऑक्सफर्ड विद्यापीठास सादर केला.

संस्कृत भाषा आणि साहित्य यांत पारंगतता प्राप्त केलेल्या पंजाबरावांना धर्माचा उगम व विकास या पैलूसंदर्भात जिज्ञासा का वाटली असावी, याचा काहीसा अदमास आपल्याला संशोधनासाठी त्यांनी प्रथम निवडलेल्या 'भारतातील देशी धर्मांचा उगम, विकास आणि आंतरिक संबंध' या विषयावरून काहीसा बांधता येतो. हिंदुस्थानासारखा बहुधार्मिक व बहुसांस्कृतिक देश, 'धर्म' या संस्था-संकल्पनेबाबत जनसामान्यांच्या मनात वसणारा आदर व आस्था, धर्माचा गाभा व त्याचे व्यवहारातील रूप यांदरम्यानची सुसंगतता अथवा तिचा अभाव, नाना धर्ममते, त्यांतील पंथोपपंथ, अनुयायी, धर्मांची पीठे व पीठाधीश, लोकव्यवहारावरील धर्माचा प्रभाव, धर्माधर्मांमधील देवाणघेवाण, तिचे प्रगट होणारे कधी सुसंवादी गोमटे रूप तर कधीमधी उफाळणारे रौद्र, हिंसक व विसंवादी कुरूप आविष्करण, धर्मसंस्था आणि एतद्देशीय राजकीय व्यवस्था यांच्यादरम्यानच्या नातेसंबंधांचे अनंत कवडसे... अशांसारख्या विविध अंगांचे ऐन तरूण वयात कमालीच्या संवेदनशीलतेने, आस्थेने व तितक्याच चिकित्सक जिज्ञासेने पंजाबरावांनी जे डोळस अवलोकन केले असावे त्याचा परिपाक म्हणून 'भारतातील देशी धर्मांचा उगम, विकास आणि आंतरिक संबंध' या पैलूचा साद्यंत व सम्यक् अभ्यास व संशोधन करण्याबाबतची ऊर्मी त्यांच्या अंत:करणात उमलली असणे अगदी स्वाभाविक ठरते. ऑक्सफर्डमधील वास्तव्यादरम्यान वेळ-काळ-वित्त यांबाबतच्या मर्यादा उद्‌भवल्या नसत्या तर पंजाबरावांनी या अतिशय मार्मिक व तलम संशोधनप्रांताचे किती पदर-उपपदर हळुवार जिज्ञासेने उलगडून या विलक्षण गुंतागुंतीच्या प्रांताबद्दलचे समाजमनाचे आकलन प्रगल्भ बनवले असते,

याची केवळ कल्पनाच आपण आज करू शकतो. त्याचप्रमाणे, केवळ त्या काळातच नव्हे तर अगदी आजही जिव्हाळ्याच्या ठरणाऱ्या या विषयाच्या एका प्रगल्भ चिकित्सेला आपण मुकलो याची हळहळ वाटल्याखेरीजही राहात नाही.

कोणत्याही प्रांतातील संशोधनाचा आवाका व व्याप-विस्तार एकदा का निश्चित झाला की संबंधित संशोधकाला अभ्यासविषयासंदर्भातील संशोधनपद्धती काटेकोरपणे आखून घ्यावी लागते. कारण, संशोधनाचा कस, खोली आणि घनता संशोधनपद्धती किती उचित व नेमकी आहे यांवरच अवलंबून राहते. संशोधनासाठी निश्चित केलेल्या विषयाच्या अंतरंगात प्रवेश करण्यापूर्वी, आपण हात घालत असलेल्या अभ्यासप्रांतामध्ये पूर्वसुरींनी काय काम पूर्वीच करून ठेवलेले आहे, याचा चिकित्सक व तितकाच विश्लेषक आढावा संशोधकाने घेणे हे प्रबंधसिद्धतेच्यासंदर्भात अगत्याचेच केवळ नव्हे तर अनिवार्य गणले जाते. किंबहुना, कोणत्याही प्रबंधातील पहिले प्रकरण पूर्वोपलब्ध व पूर्वसंशोधित अशा साहित्याच्या विश्लेषक चिकित्सेलाच वाहिलेले असते व ते तसे असणे अपेक्षितही धरले जाते. त्याला कारणही तसेच आहे. निवडलेल्या अभ्यासविषयास प्रवर्तित होण्यापूर्वी त्या संशोधनप्रांताची प्रस्तुतता व आवश्यकता संशोधकाने प्रथम प्रस्थापित करणे अत्यावश्यक गणले जाते. त्याखेरीज तो करत असलेल्या संशोधनाभ्यासाचे वेगळेपण, निकड व उपयुक्तता प्रस्थापित होत नसते. केवळ इतकेच नव्हे तर, पूर्वसंशोधित साहित्याचे अंतरंग तपासल्यानंतरच आपण निवडलेल्या अभ्यासप्रांताच्या सीमा अभ्यासकाला नेमकेपणाने निश्चित करता येतात. ऑक्सफर्डसारख्या अध्ययन-संशोधनाच्या क्षेत्रातील अग्रगण्य केंद्र मानल्या गेलेल्या स्थळी संशोधनपद्धतीचे पाठ गिरवलेल्या पंजाबरावांनी, प्रबंधलेखनाच्या संदर्भातील या पायाभूत अनिवार्यतेची उचित बूज राखावी, हे ओघानेच येते. साहजिकच, 'वैदिक साहित्यात धर्माचा उगम आणि विकास' या प्रबंधात अंतर्भूत असलेल्या एकंदर १४ प्रकरणांमधील पहिले प्रकरण पंजाबरावांनी 'धर्माची व्याख्या' या अतिशय मूलभूत पैलूसंदर्भातील पूर्वसंशोधित अभ्याससाहित्याच्या चिकित्सक आढाव्याला वाहिलेले आहे. हिंदुस्थानातील धार्मिक-सामाजिक-सांस्कृतिक विश्वाचा जणू मध्यप्रवाह असणाऱ्या वैदिक परंपरेमधील 'धर्म' या संकल्पनेचा उगम व विकास शोधावयाचा तर प्रथम 'धर्म' या संकल्पनेची प्रस्थापित व्याख्या नेमकी काय आहे त्याचा आढावा घेणे अनिवार्यच ठरते. पंजाबरावांच्या एकंदरच अध्ययन-संशोधनातील काटेकोरपणा, निर्लेप संशोधक वृत्ती, प्रगल्भता आणि मुख्य म्हणजे स्वतंत्र विचार करण्याची क्षमता व प्रवृत्ती प्रबंधाच्या या पहिल्याच प्रकरणात ठायीठायी दृष्टोत्पत्तीस पडते.

ख्रिस्तपूर्व थेट सहाव्या शतकापासूनचा कालखंड संदर्भासाठी घेत मुख्यत: पाश्चात्त्य विद्याविश्वात 'धर्म' या संस्था-संकल्पनेचा उगम, व्याख्या, कक्षा, विस्तार व वर्गीकरण कसकसे उत्क्रांत होत आलेले आहे, याचा अतिशय उद्‌बोधक, रोचक व तितकाच चिकित्सक असा पंजाबरावांनी घेतलेला धांडोळा त्यांच्यातील संशोधकाचा कस पुरेपूर प्रकाशात आणतो. प्राध्यापक मॅक्सम्यूलर, फायरबाख, लॉर्ड मोर्ले, ॲन्ड्रू लँग, जेम्स फ्रेझर, प्रा. वेब, ल्यूबा, विल्हेल्म वूण्ट, जस्ट्रॉ, सर्गी, हेरॅक्लायटस, ऑगस्टीन, डॉ. मॅरेट, डर्खाइम.. यांच्यासारख्या दिग्गज विचारवंतांच्या धर्मविषयक चिंतनाचे अंतरंग अभ्यासत हिंदुस्थानातील वैदिक तसेच बौद्ध धर्मविचारांच्या गाभातत्वांची चर्चा पंजाबराव सुरुवातीस मांडतात. मानवी शक्तीबुद्धीच्या अतीत असणाऱ्या काही शक्तींचे अस्तित्व प्रथम जाणवणे, ते मानवाने मान्य करणे व अदृश्य, अगम्य अशा त्या शक्तींच्या उपयुक्तता तसेच उपद्रवकारकतेबाबत एक प्रकारचा दरारा मनोबुद्धीमध्ये बाळगणे या दोन मूलभूत प्रेरणा-जाणिवांमध्ये 'धर्म' या संस्था-संकल्पनेचा उगम असल्याचे पूर्वसंशोधनांचे सारभूत प्रतिपादन पंजाबराव नमूद करतात. परंतु त्याच वेळी, अतींद्रिय, अदृश्य अशा अज्ञात शक्तींवरील आपले अवलंबन मानणे व अशा शक्तींबाबतचा दरारा मनीमानसी वागवणे या दोन बाबी 'धर्म' या संकल्पनेची व्याख्या सिद्ध करण्यास 'पुरेशा' (सफिशिएन्ट्) असल्या तरी 'आवश्यक' (नेसेसरी) मात्र ठरत नाहीत, असे विश्लेषण पंजाबराव मांडतात. त्यासाठी ते उदाहरण देतात बौद्ध धर्मविचाराचे. कोणत्याही अतींद्रिय, अदृश्य अशा शक्तींच्या अस्तित्वावर श्रद्धा व त्यांपोटी अशा शक्तींची उपासना यासारख्या बाबी बौद्ध धर्मविचाराच्या कक्षेत येत नाहीत. त्यांमुळे, अज्ञात शक्तींवरील मानवप्राण्यांचे अवलंबन व त्यांतून उद्‌भवणारा अशा शक्तींबाबतचा दरारा या दोन बाबी 'धर्म' या संज्ञा-संकल्पनेच्या व्याख्येसाठी आवश्यक अथवा अनिवार्य मानल्यास बौद्ध धर्मासारख्या काही धर्मपरंपरा त्या व्याख्येमधून वगळल्या जातील अथवा जातात, या वास्तवाकडे पंजाबराव आपले लक्ष वेधतात. तसे होण्याने 'धर्म' या संकल्पनेच्या सार्वत्रिक सर्वसमावेशकतेस बाधा येते हे स्पष्ट करत असतानाच, बौद्ध धर्मप्रणालीचे आगळेपणही पंजाबराव आपल्या मनावर ठसवतात.

मग, 'धर्म' या संकल्पनेची त्यांतल्यात्यांत सर्वमान्य, सार्वकालीक व सार्वत्रिक स्वीकारार्ह ठरेल अशी व्याख्या करायचे झाल्यास कोणत्या तीन अत्यावश्यक घटकांपर्यंत पूर्वसुरींचे धर्मविषयक चिंतन येऊन थांबते, त्यांचा परिचय पंजाबराव घडवतात. आपल्या सामर्थ्यापलीकडे असणाऱ्या, मानवी शक्तीबुद्धीस अनाकलनीय अशा

काही अदृश्य शक्ती या विश्वात आहेत या धारणेची स्वाभाविक स्वीकृती, अशा शक्तींवर मानवमात्रांचे असणारे अवलंबन आणि अशा शक्तींशी नाते प्रस्थापित करण्याची प्रेरणा अथवा भावना या तीन बाबी 'धर्म' नावाची संज्ञा-संकल्पना-संस्था स्पष्ट करण्यास आवश्यक ठरतात, असा धर्मविषयक तिथवरच्या चिंतन-मंथनाचा परिपाक पंजाबराव आपल्या पुढ्यात मांडतात. या तीन अंगांना स्पर्श करणाऱ्या अथवा या तीन पैलूंचा अंतर्भाव असलेल्या 'धर्म' या संकल्पनेच्या पूर्वसुरींनी धर्मविषयक चिंतनाच्या उत्क्रांतीच्या विविध टप्प्यांवर सिद्ध केलेल्या एकंदर आठ व्याख्या पंजाबरावांनी त्यांच्या प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात नमूद केलेल्या आहेत. या तीन पैलूंचा समावेश करणारी जी व्याख्या प्रा. जस्ट्रॉ सिद्ध करतात, ती व्याख्या म्हणजे धर्माच्या व्याख्या करण्यासंदर्भातील बहुतांश चिंतनाचा सारभूत गाभा म्हणता येईल. ''आपल्या आकलनापलीकडील काही शक्तींच्या अस्तित्वावरील विश्वास, अशा शक्तींवरील आपल्या अवलंबनाची स्वीकृती आणि अशा त्या शक्ती व आपण यांच्यादरम्यान अनुकूल असे नातेसंबंध प्रस्थापित करण्याच्या हेतूने मानवमात्रांचे संघटन, क्रिया व वर्तन यांचे नियमन घडवून आणणारी आचार-विचारप्रणाली म्हणजे 'धर्म',' ही 'धर्म' या संकल्पनेची व्याख्या त्या निरनिराळ्या आठ व्याख्यांचा छेदसंच समजता येईल, असे प्रतिपादन मग पंजाबराव करतात.

या टप्प्यावर, मग, 'धर्म' या संकल्पनेमध्ये अंतर्भूत असणारे सार्वत्रिक घटक कोणते याच्या विवेचनास पंजाबराव हात घालतात. पंजाबरावांच्या विवेचनानुसार असे सार्वत्रिक घटक होत एकूण तीन. 'धर्म ही एक सामाजिक संस्था होय', हा झाला त्या तीनपैकी पहिला घटक. प्रत्येक धर्मविचाराबाबत आस्था असणारा असा एक मानवसमूह असतो व त्या समूहातील प्रत्येक व्यक्तीचे समूहाशी असणारे नातेसंबंध धर्मविचाराने निर्देशित झालेले असतात, अशी व्यष्टी व समष्टी यांच्या नातेसंबंधांची उपपत्ती धर्मविचाराच्या चौकटीत पंजाबराव प्रतिपादन करतात. धर्माच्या या सामाजिक स्वरूपामुळेच त्याचा नीतीशी जवळून संबंध प्रस्थापित झालेला असतो, असे पुढील अतिशय महत्त्वाचे प्रमेय पंजाबराव नमूद करतात. भारतीय संदर्भात 'धर्म' या संकल्पनेला 'न्याय', 'नीती', 'कर्तव्य' यांसारख्या ज्या अर्थच्छटा लाभलेल्या दिसतात त्यांचे मूळ, पंजाबरावांच्या विश्लेषणानुसार, धर्माचा जो नातेसंबंध नीतीशी जुळलेला आहे, त्यांत गवसते. प्रत्येक धर्माची काही तत्त्वे व सिद्धान्त असतात आणि धर्माच्या अंगभूत अशा काही श्रद्धाही आज्ञापिलेल्या असतात, हा पंजाबरावांच्या प्रतिपादनानुसार 'धर्म' या संकल्पेनचा दुसरा घटक ठरतो. तर, प्रत्येक

धर्मात आचरावयाचे काही नियम असतात, हा ठरतो धर्माची सार्वत्रिकता प्रस्थापित करण्यास हातभार लावणारा तिसरा घटक. या तीन घटकांद्वारे ‘धर्म’ या संज्ञेची एक सार्वत्रिक अशी संकल्पना वा धारणा अथवा व्याख्या सुविहितपणे सिद्ध होत असली तरी, धर्माच्या व्यावहारिक उपयोगासाठी मात्र ती फारशी अनुकूल शाबीत होत नाही, असे असमाधान पंजाबराव आवर्जून नोंदवून ठेवतात, हे लक्षणीय ठरते. हे काहीही असले तरी, ‘धर्म’ या संकल्पनेचा उगम शोधण्यासाठी त्यांतल्यात्यांत स्वीकारार्ह अशी हीच उपपत्ती होय, असे प्रमेय मनाशी योजत ‘धर्म’ या संज्ञा-संकल्पनेचा उगम शोधण्यास पंजाबराव सिद्ध होतात.

‘धर्म’ या संकल्पनेच्या व्याख्येबाबत समर्पकता व एकवाक्यता प्रस्थापित करणे हे जितके अवघड ठरते तितकेच ‘धर्म’ या संकल्पनेच्या उगमाबाबत मतैक्य निर्माण करणे दुष्कर शाबीत होते, हे पंजाबराव विलक्षण औरसचौरसपणे आपल्या मनावर बिंबवतात. धर्माच्या उपपत्तीबाबत वा उगमाबाबत, सर्वसाधारणत:, जे तीन प्रवाह तिथवरच्या अभ्यासाद्वारे परिपुष्ट झालेले होते, त्यांचा तपशीलवार उहापोह पंजाबरावांनी त्यांच्या प्रबंधात कसोशीने केलेला आहे. मानवी जीवनव्यवहार नियंत्रित अथवा नियमित करणारी काही धारणात्मक अशी जीवनमूल्ये उच्चतम व मानवी आकार धारण करण्याची क्षमता असणारी सर्वश्रेष्ठ शक्ती या ना त्या माध्यमातून प्रगट करते, ही झाली धर्माच्या उगमासंदर्भातील पहिली उपपत्ती. आपल्या परिचयातील ‘साक्षात्कार’ या संकल्पनेच्या निकट जाणारी अशी ही उपपत्ती होय. ‘वेद हे अपौरुषेय होत’, ही भारतीय श्रद्धाविश्वातील धारणा याच कोटीतील म्हणायला हवी. वेदमंत्र हे ऋषीमुनींनी लिहिले नाहीत तर, प्रगाढ ध्यानाच्या अवस्थेत त्यांच्या कानात ते मंत्र उमटले अथवा उच्चारले गेले, अशी वेदवाङ्मयाबाबतची एक उपपत्ती मांडली जाते. ध्यानाच्या प्रशांत स्थितीत वेदमंत्र ऋषींना ‘श्रुत’ झाले म्हणून वेदांना ‘श्रुती’ अशी जी संज्ञा दिली जाते, तिचे मूळ वेदांच्या निर्मितीविषयक याच धारणेमध्ये अंकुरलेले आहे. धर्मविचार हा मनुष्यमात्रांच्या वैचारिक उत्क्रांतीच्या माध्यमातून साकारला, हे होय धर्माच्या उगमासंदर्भातील दुसरे स्पष्टीकरण. भवतालच्या निसर्गात अनुभवास येणाऱ्या वारा, पाऊस, ढग, वणवे यांच्यासारख्या घटितांच्या मुळाशी काही ना काही अगम्य अशा शक्ती होत, अशी भावना उत्क्रांतीच्या अगदी प्राथमिक अवस्थेत असलेल्या मानवजातीला त्या टप्प्यावर झाली. अशा त्या अज्ञात, अमूर्त शक्तींशी काही ना काही प्रतीकांच्या माध्यमातून नातेसंबंध जोडण्याचा जो कार्यकलाप मग पुढे क्रमाने उलगडला तो धर्मविचाराचा अगदी आदिम स्तर उत्क्रांतिक्रमाच्या या उपपत्तीमध्ये

गणला जातो. अशी सर्व इष्टानिष्ट घटिते घडवून आणणारा विलक्षण शक्तिमान असा कोणी तरी जादुगार या विश्वाचा चालक होय, हा पुढे प्रस्थापित झालेला यातुसिद्धान्त म्हणजे धर्मविचाराच्या उत्क्रांतिसंलग्न उपपत्तीचा चरमस्तर गणला जातो. प्राध्यापक जेम्स फ्रेझर हे या यातुसिद्धान्ताचे गाढे पुरस्कर्ते गणले जातात. तर, 'परमेश्वर'नामक शक्तीकडे ध्यान वळविण्याच्या मानवमात्रांच्या सातत्यपूर्ण अशा आंतरिक क्रियेची फलश्रुती म्हणजे 'धर्म', ही गणली जाते धर्माच्या उगमासंदर्भातील तिसरी उपपत्ती.

धर्माच्या उगमासंदर्भातील या तीनही स्पष्टीकरणांमध्ये, सूक्ष्म दृष्टीने न्याहाळल्यास, एक समान धागा असल्याचे आपल्याला स्पष्टपणे जाणवते. आपले सामर्थ्य व आपले आकलन यांच्या पलीकडे असणाऱ्या ज्या काही शक्ती आपण मानतो त्यांच्याशी नाते जोडण्याच्या व जोडले जाणारे नातेसंबंध अनुकूल राहावेत यासाठी करावयाच्या प्रयत्नांचे हे तीन पोत होत. धर्मविचाराचा गाभा काही असेल तर तो नेमका हाच. या नात्याच्या पोतामध्ये, मानवी कल्पनाशक्ती व प्रगल्भता यांच्यातील उत्क्रांतीबरोबर घडून येणारे उन्नयन म्हणजेच धर्म या संकल्पनेच्या उत्क्रांतीचा आलेख होय. उत्क्रांतीच्या या गतिमानतेदरम्यानचा यातुसिद्धान्तनाचा टप्पा, जगभरात सर्वत्रच अतिशय महत्त्वाचा व प्रभावशाली गणला जातो. जगातील बहुतेक सर्वच धर्मविचारांचा उगम व उत्क्रांती याच यातुसिद्धान्ताच्या कुशीतून साकारली हे फ्रेझरप्रणीत प्रमेय धर्मविचाराच्या या प्रगमनशील प्रवासात सर्वाधिक प्रभावशाली गणले गेले व जाते. परंतु, भारतीय श्रद्धाविश्वातील वैदिक धर्मविचाराच्या उगमावर फ्रेझरप्रणीत यातुसिद्धान्ताचा फारसा प्रगाढ पगडा सिद्ध करता येत नाही, हे आग्रहपूर्वक प्रतिपादण्यात पंजाबरावांच्या विश्लेषक चिकित्सेचे अवघे वैभव दडलेले आहे.

'वैदिक धर्म' या शब्दसंहतीने ज्या आचार-विचार-विधीप्रणालीस ओळखले जाते, ती धर्मप्रणाली ज्या वैदिक काळात निपजली तिच्या उगमाची बीजे ज्या शब्दसाहित्यसंभारात आढळतात तिचा शब्दाभ्यास हे पंजाबरावांच्या या अक्षरश्रमांचे मूलद्रव्य होय. भाषाविज्ञान, संस्कृतसह अन्य प्राचीन परदेशी भाषा, त्या भाषाव्यवहारात काळाच्या ओघात साकारलेली स्थित्यंतरे, त्या त्या भाषेतील मूळ संज्ञांना अशा स्थित्यंतरांद्वारे काळाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर लाभलेली अर्थवत्ता, त्या त्या काळातील मानवी संस्कृती व भौतिक प्रगती या दोहोंचा त्या अर्थांतराशी असलेला निकट व जैविक संबंध, मानवसमूहाच्या उत्क्रांतिपटाचे अतिशय प्रगल्भ असे आकलन अशी वैविध्यपूर्ण आणि खऱ्या अर्थाने बहुविद्याशाखीय अभ्यासदृष्टी व संशोधनक्षमता

साध्य केल्यामुळेच पंजाबराव या अभ्यासविषयास हात घालू शकले, ही बाब इथे आवर्जून ध्यानात ठेवावयास हवी. अभ्यासाच्या अथवा संशोधनाच्या कोणत्याही प्रांतातील नवमुशाफिरी ही त्या त्या ज्ञानप्रांतांतील प्रस्थापित प्रमेयांची फेरचिकित्सा करण्यास भाग पाडणारी अशीच असते. प्रत्येक प्रांतातील प्रस्थापित ज्ञानप्रमेयांच्या व्यवस्थेमध्ये त्या त्या ज्ञानशाखेतील प्रस्थापित अभ्यासकांच्या तसेच संशोधकांच्या विश्वात सत्तातोलाची एक व्यवस्था दृढमूल झालेली असते. अशा वेळी, नवसंशोधनाद्वारे मांडले गेलेले एखादे अभ्यासपूत प्रमेय ज्या वेळी प्रस्थापित व प्रतिष्ठित सिद्धान्तनांची फेरचिकित्सा केली जाण्यास भाग पाडते त्या वेळी प्रस्थापित सिद्धान्तांच्या प्रतिष्ठेशी संबंधित अभ्यासकांच्या वैचारिक सत्ताव्यवस्थेचीदेखील फेरमांडणी आपसूकच साकारते. त्यांतून प्रस्थापितांच्या बौद्धिक सत्ताउतरंडीला हादरे बसतात. त्या मंथनातून उद्भवणाऱ्या पुनर्मांडणीद्वारे लोभक्षोभांचे जे काही अमृत अथवा हलाहल उफाळून येते ते तितक्याच धैर्याने गळी उतरवणे नवप्रमेये सादर करणाऱ्या विद्यावंतांना क्रमप्राप्त असते. त्यासाठी गरज असते असीम धैर्याची आणि अभंग ज्ञाननिष्ठेची. ‘वैदिक साहित्यात धर्माचा उगम आणि विकास’, हा पंजाबरावांचा प्रबंध त्याच धैर्याची व ज्ञाननिष्ठेची मागणी करणारा ठरला व ठरतो.

काळाच्या कोणत्या तरी अतिप्राचीन बिंदूवर मानवी विचारविश्वात मुदलात ‘धर्म’ या संकल्पनेचा उगम कसा झाला, या संदर्भात फ्रेझर, श्रोडर प्रभृतींसह बलदंड पाश्चात्त्य अभ्यासकांनी मांडलेल्या प्रमेयांना अक्षरश: शीर्षासन करण्यास लावणारे प्रतिपादन पंजाबराव त्यांच्या प्रबंधात सादर करतात. आदिम काळातील मानवसमूहांना निसर्गातील घडामोडींसंदर्भात जी कोडी सतावत त्यांच्या समाधानासाठी प्रागैतिहासिक मानवी बुद्धीने शोधलेल्या स्पष्टीकरणांमध्ये ‘धर्म’ या संकल्पनेची आदिबीजे गवसतात, असे एक पायाभूत प्रमेय मांडले गेलेले आहे आणि त्यांबाबत सार्वत्रिक सहमतीदेखील आढळून येते. अवर्षण, अतिवृष्टी, पूर, वादळे, भूकंप, वणवे, विजा चमकणे व कोसळणे, ढगांचा गडगडाट... यांसारख्या तत्कालीन मानवी मनबुद्धीला स्तिमित करून सोडणाऱ्या नैसर्गिक घटितांचा उगम प्रागैतिहासिक मानवी मनाने शोधला तो त्याला अदृश्य असणाऱ्या काही अमानवी, सामर्थ्यशाली व मानवी शक्तीबुद्धीच्या अतीत असणाऱ्या काही शक्तींमध्ये. निसर्गामध्ये या प्रत्येक घटिताच्या कारक शक्ती वास करत आहेत व त्यांच्या इच्छेने व प्रेरणेने नैसर्गिक घटना साकारतात, असा कार्यकारणभाव उत्क्रांतीच्या त्या आदिम टप्प्यावर घनीभूत झाला. अदृश्य असणाऱ्या आणि मानवी नियंत्रणाच्या खचितच पलीकडे असणाऱ्या अशा त्या शक्तींबद्दल तत्कालीन

मानवी मनामध्ये भीती अथवा दहशत नांदावी, हे स्वाभाविकच होते. 'देव' अथवा 'धर्म' या दोन संकल्पनांची आदिम बीजे त्या भीतीमुक्त मनोभूमीमध्ये रुजली, असा सिद्धान्त यातून पुढे स्थिरावला. वारा, पाऊस, अग्नी यांसारख्या अगम्य अशा नैसर्गिक बाबींचे अधिष्ठान म्हणजे त्या त्या शक्तीरूपाची दैवते असली पाहिजेत, हा त्याच धारणेचा बराच पुढील पल्ला गणला जातो. अशा त्या अगम्य व अदृश्य शक्तींशी नाते जोडण्याची जी जी म्हणून प्रारूपे प्रागैतिहासिक काळातील मानवी समूहांच्या वैचारिक घुसळणीद्वारे साकारली त्यांत 'धर्म' या विचारचौकटीचा अंतर्भाव होतो.

मानवी मनाच्या उत्क्रांतीचे दोन टप्पे इथे अंतर्भूत आहेत. आपल्या अस्तित्वाला अथवा कल्याणाला क्षती पोहोचविणाऱ्या वणवे, पूर, भूकंप, दुष्काळ, अतिवृष्टी यांसारख्या ज्या घटना आहेत त्यांच्या प्रेरक शक्तींना आपलेसे करून घेणे, ही आदिम मानवी मनाची स्वाभाविक प्रतिक्रिया होती. निसर्गातील बलवत्तर शक्तींशी नाते जोडण्याचे दोन स्तर काळाच्या ओघात प्रवर्तले असे मानवी उत्क्रांतीचा आणि तिच्याबरोबरच 'धर्म' या संकल्पनेच्या प्रवासाचा आलेख चितारणाऱ्या पाश्चात्त्य अभ्यासकांचे प्रतिपादन आहे. निसर्गदत्त घटनांच्या मुळाशी असणाऱ्या शक्तींच्या गुणरूपासंदर्भातील आकलनाचे ते दोन स्तर होत. निसर्गातील घटना प्रवर्तित करणारा कोणी तरी एक जबरदस्त जादुगार अदृश्य स्वरूपात नांदत असला पाहिजे, अशी आद्य धारणा आदिम मानवसमूहांमध्ये प्रथम निपजली. या अभ्यासप्रांतातील परिभाषेत तिला 'यातु' असे संबोधले जाते. ही यातु ज्याला हस्तगत आहे तो 'यातुकार', असे समीकरण या विचारव्यूहाद्वारे मग स्थिरावले. आता, या जादुगाराशी सख्य जोडावे, या ना त्या प्रकारे त्याला संतोषवावे, खूष करावे म्हणजे अपायकारक घटिते तो प्रवर्तित करणार नाही, ही होती पहिली प्रेरणा. शरण जाणे, स्तुती करणे, मनधरणी करणे, प्रार्थना करणे, त्या शक्तीला काही तरी अर्पण करणे... यांसारखी उपचारप्रणाली मग ठरते त्या प्रेरणेची निष्पत्ती. आता, इथे एक प्रश्न उपस्थित होतो. तो असा की, अदृश्म शक्तीला आपलेसे करून घेण्यासाठी, समजा, तिला एखादा जिन्नस अर्पण करायचे ठरले तर मुळात अप्रगट असलेल्या त्या शक्तीपर्यंत तो पोहोचावा कसा! या संदर्भात, पंजाबरावांच्या सादरीकरणानुसार, वैदिक काळातील भारतीय, इराणी इतकेच नव्हे तर अगदी ग्रीक व रोमन लोकसमूहदेखील वेदीवर प्रज्ज्वलित केलेल्या अग्नीमध्ये अर्पण करावयाच्या पदार्थांचे हवन करत असत. वैदिक संस्कृतीमध्ये यालाच 'यज्ञ' अशी संज्ञा आहे. अग्नीमध्ये आहुती दिल्यानंतर उफाळणाऱ्या ज्वाळा व धूर यांच्या माध्यमातून हवन केलेल्या चीजवस्तू निसर्गात अदृश्य स्वरूपात नांदणाऱ्या अतिमानवी,

सामर्थ्यवान शक्तींपर्यंत पोहोचतात ही धारणा यज्ञवेदींमध्ये दिल्या जाणाऱ्या आहुतींच्यामागे असे व होती. वारा, वादळे, पाऊस, विजा यांसारख्या गोष्टी मुख्यत: आकाशातून साकारत असल्याने या घटितांचे अधिष्ठान असणाऱ्या शक्ती आकाशस्थित असल्या पाहिजेत, असा कयास आदिम मानवसमूहांनी बांधावा हे साहजिकच होते. वेदीमधून वर उठणाऱ्या धुरांचे लोट आकाशाकडे जातात आणि जाताना बरोबर यज्ञामध्ये हवन केलेल्या वस्तू घेऊन जातात व त्या मिळाल्याने आकाशस्थ शक्ती संतुष्ट राहून जीविताला अपाय पोहोचविणाऱ्या घटना प्रवर्तित करण्यास सरसावत नाहीत, असा कार्यकारणभाव आदिम मानवी मनाने कल्पिलेला होता.

असे सगळे प्रकार करू नही, आकाशस्थ शक्ती आपल्याला अनुकूल होत नाहीत याचा अनुभव आलेल्या तत्कालीन मानवी मनोभूमीमध्ये, मग, यथावकाश बीजांकुरण घडून आले ते त्या शक्तींना आपले अंकित बनवण्याच्या ऊर्मीचे. यज्ञीय मंत्रांचा उगम त्या ऊर्मींमध्येच आहे, हे पंजाबराव विदित करतात. 'मंत्र शब्दाचा भारतीय भाषांत यातु-मंत्र असा अर्थ झाला आहे', हे पंजाबरावांचे निरीक्षण या संदर्भात मननीय व मार्मिक आहे. 'मंत्र मारणे' ही शब्दसंहती 'जादू करणे' या अर्थाने मोजली जाते, हे उदाहरण या संदर्भात पंजाबराव देतात. परंतु, मूळ संस्कृतात मात्र 'मंत्र' या शब्दाचा अर्थ 'सूक्त' असा होतो, हेही ते लगेच स्पष्ट करतात. आपल्या आवाक्याबाहेर असणाऱ्या शक्तींना प्रार्थनेद्वारा आपलेसे करून घेणे, उपासनेद्वारे प्रेमाचे, सौहार्दाचे नाते त्यांच्याशी प्रस्थापित करणे या भावनेमधून 'धर्म' या संवेदनेचा उगम दिसतो, असे पंजाबरावांचे सांगणे आहे. तर, मंत्रांमध्ये असणाऱ्या अमोघ शक्तीद्वारे यज्ञविधीद्वारे निसर्गातील शक्तींना अंकित बनवून आपले ईप्सित साध्य करण्यास संबंधित देवतांना अगर शक्तींना बाध्य बनवणे या प्रेरणेमध्ये यातुविचार बलवत्तर दिसतो, हे पंजाबराव आपल्या दृष्टोत्पत्तीस आणतात. संशोधनाच्या या प्रांतातील पाश्चात्य संशोधक आणि पंजाबराव या दोघांमध्ये मतवैचित्र्याचा अतिशय मूलभूत असा मुद्दा उपस्थित होतो तो नेमका याच ठिकाणी. त्या मतभिन्नतेचा संबंध आहे तो 'धर्म' आणि 'यातु' या दोहोंच्या उत्पत्तीबाबत कथन केल्या जाणाऱ्या क्रमाशी. निसर्गातील अदृश्य शक्तींशी आदिम मानवसमूहांनी प्रथम अनुबंध प्रस्थापित केला तो त्या शक्तींना यज्ञविधीद्वारे अंकित करण्याच्या ऊर्मीने, अशी भूमिका मांडतात पाश्चात्त्य अभ्यासक. यज्ञाद्वारे निसर्गदत्त शक्ती आवाक्यात येत नाहीत, हे अनुभवांती सिद्ध झाल्यानंतर त्यांना प्रसन्न करून घेण्याची भावना आदिम मानवसमूहांच्या मनोभूमीत अंकुरली, असे प्रमेय फ्रेझरप्रभृती पाश्चात्त्य संशोधक मांडतात. म्हणजेच, 'धर्म' या

संकल्पनेचा वा भावनेचा उगम क्रमाने यातुविचाराच्या नंतर होतो, असे फ्रेझरप्रभृतींचे म्हणणे. तर, यातुविचारामधून धर्मासारख्या उन्नत जाणिवेचा उगम होणे सर्वथैव अशक्य, अशी ठाम भूमिका मांडतात पंजाबराव. आपल्या प्रतिपादनाच्या पुष्ट्यर्थ ते आधार घेतात तो भारतीय-इराणी मानवसमूहाच्या भ्रमणशीलतेचा.

अगम्य व अदृश्य असणाऱ्या शक्तींशी नातेसंबंध प्रस्थापित करण्याच्या या दोन परींचा घनिष्ठ संबंध तत्कालीन भौतिक पर्यावरणाशी आणि पर्यायाने धर्म व यातु या दोन भावना ज्या मानवसमूहांच्या अंतर्मनात उद्‌भवल्या ते मानवसमूह स्थलांतराच्या पर्वामधून प्रवास करणारे होते की स्थिर जीवनराहाटीचा स्वीकार केलेले होते, या उभय बाबींशी आहे, असे पंजाबरावांचे या संदर्भातील विश्लेषण आहे. म्हणजेच, पंजाबरावांच्या चिकित्सेनुसार मानवी उत्क्रांतीच्या दोन भिन्न टप्प्यांचा संबंध 'धर्म' आणि 'यातु' या दोन विचारव्यूहांची निर्मिती व स्वीकृती यांच्या मुळाशी आहे. उत्क्रांतीच्या पर्वादरम्यान बराच काळ धर्म आणि यातु हे दोन्ही विचारव्यूह समांतर नांदत राहिले असले पाहिजेत, असे पंजाबराव मानतात. एवढेच केवळ नाही तर, या दोन भावभावनांची अनेक ठिकाणी बरीच सरमिसळ झालेलीही दिसते. ऋग्वेदातील काही मंत्र आणि मंत्रसमूह तसेच चार वेदांमध्ये आदिवेद गणल्या जाणाऱ्या ऋग्वेदातील मंत्र आणि यजुर्वेद व अथर्ववेदासारखे नंतरचे वेद या दोहोंतील शब्दसंहती, त्यांची रूपे व त्या शब्दांमधून डोकवणारा ऋचाकर्त्यांचा भाव या दोहोंत मूलभूत स्वरूपाचा गुणात्मक फरक दिसतो, हे पंजाबराव आग्रहपूर्वक प्रतिपादन करतात. ऋग्वेदनिर्मितीचे देखील त्यांमुळे एकापेक्षा अधिक टप्पे मानणे भाग पडते. पूर्वकालीन ऋग्वेदातील भाषा आणि शब्दांमधून प्रगटणारा भाव 'धर्म' या संकल्पनेचा वाचक दिसतो, असे पंजाबरावांचे भाषाशास्त्रीय विश्लेषणांती बनलेले मत आहे. तर त्याच ऋग्वेदातील उत्तरकालीन काही ऋचांमधून यातुप्रधान मानसिकता प्रकर्षाने पृष्ठभागावर येते, असे त्यांचे निरीक्षण आहे. यजुर्वेद आणि अथर्ववेदासारख्या नंतर रचलेल्या वेदांमध्ये धर्मभावना तुलनेने निस्तेज झालेली दिसते आणि तिथे यातुविचार प्राधान्याने उभरून येतो, असे त्यांचे प्रमेय आहे. म्हणजे, वेदांमधील मंत्र अगर ऋचा यांचा भाषिक अनुबंध जरी बऱ्यापैकी मिळता-जुळता असला तरी, त्या मंत्रांच्या उपयोजनामागील प्रेरणा अथवा ऊर्मी मात्र गुणात्मकरीत्या प्रचंड भिन्न दिसते, हे पंजाबरावांचे सांगणे आहे. धर्मभावना ही अदृश्म शक्तींना शरण जात त्यांच्या तुष्टीकरणासाठी प्रार्थनात्मक साधनाप्रकार अंगीकारते. तर, यातुविचार व यातुविधान हे अदृश्य शक्तींना आपल्या अंकित करून घेण्याच्या मानसिकतेमधून उमलते, हा तो दोन मानसिकतांमधील

गुणात्मक फरक. त्यांमुळे, धर्मासारखी सात्विक, तुलनेने अधिक प्रगल्भ व उच्च भावना यातुविचारामधून निपजणे हे अशक्य व अतार्किक ठरते, असे पंजाबरावांचे या संदर्भातील विश्लेषण आहे. त्यांमुळे, मानवी उत्क्रांतीच्या प्रवासादरम्यान यातुप्रधान विचारसरणीच्या कुशीतून यथावकाश धर्मविचाराची उत्पत्ती झाली, हे फ्रेझर, श्रोडर प्रभृतींनी आग्रहपूर्वक मांडलेले व स्वीकारलेले प्रमेय पंजाबराव अस्वीकृत ठरवतात. त्याऐवजी, धर्म आणि यातु या दोन्ही भावभावनांचे परस्परांशी प्रदीर्घ काळ साहचर्य होते परंतु, धर्मविचार हा स्वतंत्रपणे त्या काळातील काही मानवसमूहांमध्ये प्रसवला आणि उत्क्रांतीच्या पुढील पर्वांमध्ये धर्मविधींच्या उपयोजनासाठी संबंधित समूहांनी निर्मिलेले मंत्र व ऋचा यांचा अवनत स्वरूपात यातुविधीसाठी वापर केला जाऊ लागला, असे नवप्रमेय पंजाबराव मांडतात. म्हणजेच, पंजाबरावांच्या मते, प्रथम धर्म आणि नंतर यातु असा या दोन विचारव्यूहांच्या उत्पत्तीचा क्रम दिसतो. केवळ इतकेच नाही तर, धर्मसंवेदना स्वतंत्ररीत्या काही मानवसमूहांमध्ये (यातुविचाराचा उद्भव होण्यापूर्वीच अथवा कदाचित त्याला समांतर पद्धतीने) उगम पावलेली होती, असाही पंजाबरावांचा सांगावा आहे. यातुविचारातून धर्मभावनेचा उगम कदापिही संभवत नाही, उलटपक्षी, यातुपूर्वकालीन काही मानवसमूहांच्या प्रगल्भ मानसिकतेमधून निपजलेले धर्मपर मंत्र काळाच्या ओघात अन्य, तुलनेने अ-प्रगत लोकसमूहांकडे संक्रमित झाल्यानंतर त्याच मंत्रांचा विनियोग यातुविधीसाठी अवनत स्वरूपात होऊ लागला, असे सिद्धान्तन पंजाबराव मानतात. फ्रेझर अथवा श्रोडर यांच्यासारख्या अभ्यासकांनी मांडलेल्या प्रमेयाला शीर्षासन करण्यास पंजाबराव भाग पाडतात ते असे.

विचारव्यूहांमध्ये घडून आलेली ही उत्क्रांती एकंदर मानवी उत्क्रांतीचा अविभाज्य घटक होय, हे स्पष्टीकरण तर्कशुद्धपणे अधोरेखित करणे हा ठरतो पंजाबरावांच्या वैचारिक सघनतेचा दुसरा संलग्न पैलू. त्यासाठी पंजाबराव मागोवा घेतात तो भारतीय-इराणी लोकसमूहाच्या भ्रमणशील जीवनराहाटीचा. आर्मेनिया, इराण यांसारखे आशियाई प्रांत आणि स्लावेनिया, लिथुआनिया, ग्रीस, रोम व जर्मनीसारखे युरोपीय प्रांत या भागांतील लोकसमूह ख्रिस्तपूर्व साधारण तीन हजार ते अडीच हजार वर्षे या काळात बऱ्यापैकी समाईक जीवनपद्धती जगणारे, सारखीच भाषा बोलणारे अथवा एकाच भाषेच्या भिन्न बोली बोलणारे होते, असे एक प्रमेय मांडले जाते. या मानवसमूहाच्या विविध शाखा ज्या चार संज्ञांनी निर्देशित केल्या जात त्या चार संज्ञांपैकी एक म्हणजे 'युरोभारतीय' तर दुसरी म्हणजे 'आर्यन्'. त्यापैकी 'आर्यन्' ही संज्ञा 'इंडोइरानियन' या संज्ञेने निर्देशित केल्या जाणाऱ्या लोकसमूहासाठी उपयोजिली जाऊ लागली. तिचे

मराठी रूप 'भारतीय–इराणी' असे पंजाबराव करतात. या भारतीय–इराणी लोकसमूहामध्ये धर्मभावनेचे अंकुरण स्वतंत्रपणे व यातुविचार प्रस्थापित होण्याच्या आधीच घडून आले असले पाहिजे, असे प्रमेय पंजाबराव मांडतात. धर्म आणि यातु या दोन भावना अथवा संवेदना त्यांची जपणूक करणाऱ्या मानवीसमूहांच्या प्रवृत्तींची परिणती होत असे पंजाबरावांचे या संदर्भातील प्रतिपादन आहे. वैदिक काळातील काही भारतीय समूह प्रथम इराणी समूहांसह इराणच्या डोंगराळ परिसरात नांदले व तिथून आजचा अफगाणिस्थान पार करत हिंदुकुशातील खिंडींच्या मार्गाने आजच्या भारतातील पंजाब प्रांतात उतरले अशी जी उपपत्ती मांडली जाते तिच्याशी पंजाबराव धर्मसंवेदनेच्या उगमाचा धागा जोडतात. या भारतीय–इराणी मानवसमूहाने त्याच्याबरोबर आणलेल्या त्यांच्या धर्मकल्पना यथावकाश इथे रुजल्या, असे पंजाबरावांचे निरीक्षण आहे.

सततची भ्रमंती करण्यास संबंधित मानवसमूहांच्या ठायी एक प्रकारचा कणखरपणा, साहस, धाडस व जिज्ञासा यांची भरपूर शिदोरी असणे अगत्याचे ठरते. नित्याचे देशांतर, त्यांद्वारे नवनवीन मानवसमूहांशी संपर्क व प्रसंगोपात्त संघर्ष आणि त्यानुसार बदलणारी जीवनराहाटी यांमुळे भारतीय–इराणी जनसमूहामध्ये यातुविचार आणि त्याच्याशी निगडित असणारे विपरित श्रद्धाविश्व यांचा उगमच झाला नसावा, असे अनुमानवजा प्रमेय पंजाबराव मांडतात. त्या अनुमानाच्या पुष्ट्यर्थ जो कार्यकारणभाव पंजाबराव प्रतिपादन करतात तो विलक्षण वेधक आहे. देशान्तराद्वारे विचारप्रणाली, मनाची क्षितिजे विस्तारतात, सतत नवनवीन लोकसमूहांशी संपर्क प्रस्थापित होण्यातून जुन्या, स्थिर, घनीभूत झालेल्या कल्पना व धारणा यांचा पगडा मनावर बसण्यास तेवढा अवकाश प्राप्तच होत नाही. जे जे जुने, मागे पडलेल्या अथवा टाकलेल्या लोकसमूहांशी निगडित असे विचार व भावनाविश्व असते ते विसर्जन करून नाविन्याला सामोरे जाण्याची प्रवृत्ती भ्रमणशील समाजसमूहांमध्ये प्रकर्षाने नांदत असते. अशा वैचारिक अथवा भावनिकदृष्ट्या प्रगमनशील असणाऱ्या मानवसमूहांमध्ये घनीभूत झालेले, साकळलेले आणि परिणामी कालविसंगत होत जाणारे विचारविश्व नांदणे तर्कदुष्ट ठरते. अशा समूहांमध्ये धर्मविचारासारखा प्रवाही व प्रगल्भ भावविचार अंकुरणे व रुजणे अधिक तर्कशुद्ध व तर्कनिष्ठ ठरते. याच्या बरोबर उलट स्थिती नांदते स्थितीशील समाजांमध्ये. कुंठित, स्थितिशील, बंदिस्त जीवनराहाटी निसर्गसिद्ध शक्तींसंदर्भातील रोगट, अवनत धारणांच्या पोषणास पूरक व उपकारक शाबीत होत असते. अशा स्थानिक लोकसमूहांशी भ्रमणशील असणाऱ्या भारतीय–इराणी लोकसमूहाचा संपर्क कालौघात प्रस्थापित झाल्यानंतर भारतीय–इराणी लोकसमूहाने

जपलेल्या प्रवाही धर्मविचाराचे रूपांतर क्रमाने स्थायी व अवनत यातुविचारामध्ये घडून येत राहिले, असा कार्यकारणभाव पंजाबराव मांडतात.

या प्रक्रियेस हातभार लावणारे विविध घटकदेखील पंजाबराव आस्थेने विशद करतात. भिन्न परंपरा व वैचारिक व्यूह असणाऱ्या स्थानिक व स्थिर जीवनपद्धती जगणाऱ्या लोकसमूहांशी घडून आलेले संघटन, मुळात प्रार्थनाधिष्ठित धर्मविचार आणि यातुविचार यांच्यादरम्यानची कमालीची सूक्ष्म व प्रसंगी अस्फुट अशी सीमारेषा, बदलते भौगोलिक पर्यावरण, त्यांतून निपजणारा निराळ्या प्रकारचा जीवनसंघर्ष, मुळातील विचारव्यूह व धारणा शुद्ध स्वरूपात टिकवून धरणे अवघड ठरवणारी वाढती व संमिश्र लोकसंख्या, विभिन्न विचारपंथांची सरमिसळ व त्यांद्वारे मूळ विशुद्ध धारणांमध्ये प्रवर्तणारे प्रदूषण... अशांसारख्या अनंत प्रवाहांच्या घुसळणीद्वारे धर्मविचाराच्या उन्नत व्यूहाला काळाच्या दबावाखाली यथावकाश यातुविचाराचे अवनत रूप-स्वरूप प्राप्त झाले असावे, असे तर्कसिद्ध सिद्धान्तन पंजाबराव सिद्ध करतात. धर्म आणि यातु या दोन मुळातच गुणात्मकरीत्या परस्परांपेक्षा कशा व किती भिन्न होत आणि त्यांची निपज व वाढ होण्यास किती व कशा प्रकारचे भौतिक तसेच पर्यावरणीय घटक कारणभूत ठरलेले दिसतात यांचा विस्तृत आलेख रेखाटत पंजाबराव फ्रेझरसारख्या प्रस्थापित पंडितांच्या प्रमेयाला छेद देतात. यातुविचार अथवा यातुविधानासारख्या अवनत वैचारिक चौकटीमधून धर्मविचारासारख्या उन्नत जीवनदृष्टीचा उगम होण्यापेक्षा, काळाच्या प्रवाहात, धर्मविचारासारख्या उन्नत विचारव्यूहाचे अध:पतन होऊन त्यांद्वारे यातुविचारासारखी अवनत चौकट निपजणे हे अधिक तर्कशुद्ध व शक्य ठरते, हा पंजाबरावांच्या अवघ्या विश्लेषणाचा सारांश ठरतो.

पंजाबरावांच्या विश्लेषक प्रज्ञेने आरंभलेल्या सश्रद्ध चिकित्सेची ही सुभग व प्रगल्भ परिणती होय! धर्मविचाराच्या भारतीय उत्क्रांतीदरम्यान धर्माच्या उगमाशी यातुसिद्धान्तनाची प्रगाढ बैठक फारशी सुदृढपणे दिसत नाही, हा पंजाबरावांनी उदंड व्यासंगाद्वारे शब्दबद्ध केलेल्या त्यांच्या प्रबंधाचा गाभासिद्धान्त होय. वैदिक साहित्यातील शब्दसंहती, शब्दांची रूपे व शब्दयोजना यांच्या सखोल चिकित्सेद्वारे पंजाबराव या सारभूत गाभ्यापर्यंत येऊन पोहोचतात. 'धर्म' ही संज्ञा-संकल्पना आणि धर्मविचाराची उत्क्रांती भारतीय वास्तवात साकारण्यास यातुविधान सिद्धान्त प्रस्थापित होण्याच्या पूर्वीपासूनच प्रारंभ झालेला होता, असे पंजाबरावांचे संशोधनपूत प्रतिपादन आहे. या वास्तवाचे श्रेय पंजाबराव बहाल करतात दोन बाबींना. भारतीय आर्यांच्या भाषाविषयक प्रतिभेचे योगदान उपासनात्मक मंत्र, प्रार्थना, स्तुतिस्तोत्रे

यांच्या विकासात अतिशय मोठे असल्यामुळेच भारतीय धर्मविचाराचा उगम स्वरूपत: यातुसिद्धान्ताशी आपसूक व अनिवार्यपणे जोडता येत नाही, असे विश्लेषण पंजाबराव मांडतात. तर, भारतीय आर्यांचा साहसी स्वभाव व त्यांतून उमलणारी देशांतर-भ्रमणाची अदम्य ऊर्मी हा, धर्मविचाराचा उगम यातुसिद्धान्ताच्या पर्वापूर्वीपासूनच भारतीय वैदिक परिप्रेक्ष्यात घडून येण्यास कारक ठरणारा दुसरा प्रधान घटक होय, असे पंजाबरावांचे प्रतिपादन आहे. मात्र, या सिद्धान्ताची वस्तुनिष्ठ कारणमीमांसा सिद्ध करून त्याची प्रतिष्ठापना निर्णायक निरपवादपणे करण्यासाठी आवश्यक असणारा निर्विवाद पुरावा मात्र पुरेसा हाती लागत नाही, अशी नितळ कबुली देण्यासही पंजाबराव कचरत नाहीत, हे त्यांच्या निरलस, प्रामाणिक व उत्कट ज्ञाननिष्ठेचे द्योतक होय.

'वैदिक साहित्यात धर्माचा उगम आणि विकास', हा पंजाबरावांनी सिद्ध केलेला प्रबंध विलक्षण आशयसंपन्न ठरतो तो याच सगळ्यांमुळे. प्रबंधांतर्गत विवेचन-विश्लेषण सगळ्यांनाच रुचेल-पचेल असे अजिबातच नाही. परंतु, भारतीय वास्तवात वैदिक धर्माचा उगम व विकास घडून येण्यासंदर्भातील अवघ्या विचारमंथनात पंजाबरावांनी त्यांच्या संशोधनाद्वारे भरीव व घसघशीत अशी भर ऐन तारुण्यातच घातली, हे मात्र नि:संशय. ''पंजाबरावांनी आत्मविश्वासाने संशोधनात घातलेली भर, अभ्यासाचा समंजस दृष्टिकोन, परिश्रम, लेखनातील संयम व प्रगल्भता, सत्यनिष्ठा आणि विचारांचा परखडपणा भारतीय संशोधकाला आदर्श ठरावा'', अशा शब्दांत डॉ. स. मो. अयाचित यांनी केलेला या ग्रंथाचा व ग्रंथकाराचा गौरव सर्वार्थाने सार्थ ठरतो, हे निर्विवाद.

*(सन २०२३ हे वर्ष भारताचे माजी कृषिमंत्री, ज्येष्ठ राजकीय नेते आणि शिक्षणतज्ज्ञ डॉ. पंजाबराव देशमुख यांचे शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती वर्ष होते. डॉ. पंजाबराव देशमुख यांचा प्राचीन कारतविद्या व संस्कृत साहित्याच्या तसेच धर्मेतिहासाचा गाढा व्यासंग होता. ही बाब आत्मज्ञान अशीच राहिली. 'धर्म' या संज्ञा-संकल्पनेचा भारतातील उदय या विषयावर पंजाबरावांनी सिद्ध केलेल्या शोध प्रबंधाचे ग्रंथरूपाने प्रकाशन प्रथम १९९९ साली झाले. त्या ग्रंथात पंजाबरावांनी मांडलेल्या संशोधनभूत अपूर्व प्रमेयांचा परिचय घडवून येणारे हे पूर्वप्रमाणित लेखन इथे सादर केले आहे.)*

## आर्थिक

# ‘पोलिटिकल इकॉनॉमी’ म्हणजे नेमके काय?

‘अर्थशास्त्र’ (इकॉनॉमिक्स) ही ज्ञानशाखा प्रथम ‘राजकीय अर्थकारण’ अथवा ‘राजकीय अर्थव्यवहार’ (पोलिटिकल इकॉनॉमी) या नावाने संबोधली जात असे, याचा आज अगदी ‘अर्थशास्त्र’ हा विषय महाविद्यालयांत अगर विद्यापीठांत शिकणाऱ्यांपैकी कित्येकांना पत्तादेखील नसेल अथवा नसावा. आधुनिक अर्थशास्त्राचा पाया १८व्या शतकात रचणाऱ्या विख्यात अर्थवेत्ते ॲडम स्मिथ यांच्या काळात ‘अर्थशास्त्र’ ही संज्ञा वापरली जात नसे. ‘राजकीय अर्थकारण’ हेच संबोधन त्या काळात सर्वदूर सर्वज्ञात होते. केवळ स्मिथच नव्हे तर, सनातनवादी अर्थशास्त्राच्या (क्लासिकल इकॉनॉमिक्स) ज्ञानशाखेमधील डेव्हिड रिकार्डो, जॉन स्टुअर्ट मिल्, जे. बी. से, कार्ल मार्क्स या सगळ्या विद्यावेत्यांनी ‘राजकीय अर्थकारण’ हेच संबोधन त्यांच्या अर्थशास्त्रविषयक लेखन-चिंतनामध्ये उपयोजलेले आपल्याला सररास दिसते. त्याला कारणही तसेच होते व आहे. मुळात अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र अथवा राजकारण या दोन परस्परांपेक्षा भिन्न बाबी आहेत, ही धारणाच त्या संपूर्ण पर्वादरम्यान नव्हती. किंबहुना, अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र (अथवा राजकारण) ही जुळी भावंडेच असल्याची स्मिथ-रिकार्डो-मिल् यांची एकात्म दृष्टी होती. जॉन स्टुअर्ट मिल यांचा Principles of Political Economy, हा १८४८ साली प्रकाशात झालेला ग्रंथ राजकीय अर्थकारणाचा पायाभूत असा सैद्धान्तिक दस्तऐवज मानला जातो. नवसनातनवादी अर्थशास्त्राची (निओ-क्लासिकल इकॉनॉमिक्स) पायाभरणी पुढे १८ व्या शतकात अल्फ्रेड मार्शल यांच्या माध्यमातून घडून आल्यानंतर, क्रमाने, अर्थशास्त्राचे ‘पोलिटिकल इकॉनॉमी’ हे संबोधन मागे पडून ‘इकॉनॉमिक्स’ हे संबोधन प्रचारात येऊन प्रस्थापित झाले, अशी धारणा आहे.

‘इकॉनॉमिक्स’ या संज्ञेचे ‘अर्थशास्त्र’ हे आज प्रचारात असणारे मराठी रूप होय. तर, ‘अर्थव्यवस्था’ हे ‘इकॉनॉमी’ या इंग्रजी संज्ञेचे मराठी रूप. त्यांमुळे,

अगदी शब्दश: अनुवाद करावयाचा तर, 'राजकीय अर्थव्यवस्था' हे 'पोलिटिकल इकॉनॉमी' या शब्दसंहतीचे मराठी रूप ठरते. इथून पुढे आपण मात्र 'पोलिटिकल इकॉनॉमी' या ज्ञानशाखेचा सर्वत्र निर्देश 'राजकीय अर्थव्यवहार' या संज्ञेने करणार आहोत. इथे आणखी एका बाबीचा खुलासा करणे अगत्याचे ठरते. तो असा की, 'अर्थशास्त्र' या संज्ञेने जी ज्ञानशाखा आज ज्या अर्थाने निर्देशित केली जाते तिचा अंतर्भाव प्राचीन भारतीय परंपरेमधील ज्ञानव्यवस्थेत 'राज्यव्यवहारशास्त्र' या बृहत ज्ञानविभागात केला जात असे. आपल्या प्रबंधाला 'अर्थशास्त्र' हे शीर्षक जरी कौटिल्यांनी योजलेले असले तरी तिथे त्यांना अभिप्रेत आहे ते 'राज्यव्यवहारशास्त्र'च. 'अर्थशास्त्र' या ज्ञानशाखेची जी कक्षा व अंतरंग आज आपल्या पुढ्यात आहे त्याचा आणि कौटिल्यांच्या 'अर्थशास्त्र'नामक प्रबंधात अंतर्भूत असलेल्या विवेचनाचा अर्थाअर्थी अजिबात संबंध नाही.

महाविद्यालयांमधून वर्गामध्ये अर्थशास्त्राचे जे अध्ययन-अध्यापन घडत राहते त्याचा झोत आणि भर मुख्यत: राहतो तो 'अर्थशास्त्र'नामक ज्ञानशाखेच्या पायाभूत सिद्धान्तांचे आणि नियमांचे विवरण-विश्लेषण करण्यावर. परंतु, वर्गाबाहेर, प्रत्यक्ष व्यवहारात आपल्या भवताली जे अर्थवास्तव साकारत असते ते स्वरूपत: असते राजकीय अर्थकारण. सार्वजनिक कल्याण आणि सार्वजनिक कल्याणाचे महत्तमीकरण हे ज्या राज्यसंस्थेचे (स्टेट) प्रधान उद्दिष्ट असते ती राज्यसंस्था सर्वसामान्य नागरिकांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी जे उपक्रम अथवा योजना राबविते त्यांद्वारे आर्थिक वाढविकासाची प्रक्रिया गतिमान बनत राहते. कोणतीही संस्था स्वरूपत:च अरूप, अक्रिय असते. तिला कार्यान्वित करण्यासाठी कोणत्या ना कोणत्या कार्यकारी उपकरणाची गरज अनिवार्य ठरते. 'सरकार' (गव्हर्न्मेन्ट) हे ते उपकरण होय. प्रातिनिधिक लोकशाही राज्यव्यवस्थेमध्ये निवडणुकीच्या प्रक्रियेद्वारे नागरिकांनी निवडलेले प्रतिनिधी सरकार बनवितात. बहुपक्षीय राजकीय स्पर्धेने मंडित असलेल्या राजकीय व्यवस्थेतील राजकीय पक्ष निवडणुकीच्या रिंगणात उडी घेतात ते लोककल्याणविषयक त्यांच्या भूमिका व त्या भूमिकांच्या मुळाशी असणाऱ्या त्यांच्या विचारप्रणाली यांच्यासकट.

साहजिकच, प्रत्येक राजकीय पक्षाची विचारप्रणाली निरनिराळी असते. तिच्यानुसार समाजातील विविध घटकांचे बळ ते ते राजकीय पक्ष आपल्या पाठीशी उभे करण्याच्या खटपटीत असतात. राजकीय पक्षांच्या पाठीराख्या विविध समाजघटकांच्या आशा-अपेक्षा-आकांक्षा एकसारख्या कधीच नसतात. प्रसंगी त्या परस्परविरोधीदेखील संभवतात. अशा संमिश्र आशा-अपेक्षांची मोट बांधत राजकीय पक्षांना निवडणुकांना

सामोरे जात बहुमताचे बळ पाठीशी उभे करून सरकार स्थापन करण्यासाठी आटापिटा करावा लागतो. अखेर, संख्याबळावर जो राजकीय पक्ष अथवा ज्या राजकीय पक्षांच्या आघाड्या सरकार स्थापन करतात ते पक्ष त्यांच्या भूमिका, विचारप्रणाली व पाठिराख्या समाजघटकांच्या अपेक्षा यांचा तोल सांभाळत आर्थिक विकासाचे आणि सामान्यांच्या कल्याणाचे कार्यक्रम व योजना हाती घेतात.

राजकीय व्यवस्थेतील पक्ष, त्यांची विचारसरणी, सार्वजनिक कल्याणविषयक त्यांची भूमिका, सार्वजनिक कल्याण या संकल्पनेची प्रत्येक राजकीय पक्षाची व्याख्या व समज, त्या त्या पक्षाचे पाठिराखे गट व समूह, त्या त्या समूहांच्या राजकीय पक्षांकडून असणाऱ्या अपेक्षा, त्या अपेक्षांना विविध राजकीय पक्षांकडून दिला जाणारा प्रतिसाद... अशा विविधांगी घुसळणीद्वारे बहुपक्षीय स्पर्धात्मक राजकीय व्यवस्थेमधून निवडणुकीच्याद्वारे सत्तेचा सोपान सर केलेल्या पक्षाचे सरकार जेव्हा शासनसंस्थेचा कारभार हाती घेते त्यांवेळी, साहजिकच, निवडणुकीच्या प्रचारादरम्यान पाठिराख्या समाजघटकांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्याचा दबाव सत्तारूढ सरकारवर असतो. अगदी सरकार जरी झाले तरी लोककल्याणकारक योजना व उपक्रम राबविण्यासाठी उपलब्ध असणारी वित्तीय व प्रशासनिक साधनसामग्री केव्हाही मोजक्या मात्रेनेच उपलब्ध असते. त्यांमुळे, उपलब्ध असणाऱ्या सीमित साधनस्रोतांचे कुशलतेने वाटप घडवून आणत सर्वसामान्यांच्या बहुविध अपेक्षाची अंशत: का होईना तड लागावी, अशा प्रकारचे कार्यक्रम व उपक्रम हाती घेऊन राबविणे कोणत्याही सरकारला अनिवार्यच ठरते. राजकीय प्रक्रिया आणि अर्थशास्त्र यांचा सांधा जुळतो तो नेमका इथेच. मर्यादित साधनसामग्री आणि अमर्याद गरजा यांचा निरंतर संघर्ष पेलत उपलब्ध साधनांचे पर्याप्त वितरण-विभाजन घडवून कसे आणावे हा तर 'अर्थशास्त्र' या ज्ञानशाखेच्या गाभाचिकित्सेचा प्रांत. मुदलात साधनसामग्री सीमित मात्रेने उपलब्ध असली तरी तिचा वापर व उपयोजन हे बहुपर्यायी असते. असे असल्यामुळे सतत वाढणाऱ्या आणि बदलणाऱ्या गरजांची पूर्तता करण्यासाठी अगणित वस्तू व सेवांची निर्मिती करतेवेळी साधनसामग्रीच्या वापर-वाटपासंदर्भात काही एक प्राधान्यक्रम ठरविणे क्रमप्राप्त होऊन बसते. सरकारमध्ये बसून सत्तेची सूत्रे पेललेल्या सत्ताधारी राजकीय पक्षाच्या पुढ्यातील तिढाही नेमका असाच असतो. अशा वेळी, बहुविध समाजघटकांच्या अनेकविध आशा-अपेक्षांचा (जमले तर लघुत्तम साधारण विभाजक काढून) मेळ घालत सामाजिक कल्याणाचा आणि आर्थिक विकासाचा काही एक आकृतिबंध निश्चित करणे अनिवार्य ठरते. त्यासाठी

प्राधान्यक्रम ठरविणे क्रमप्राप्त असते. प्राधान्यक्रमातील बाबी व्यवहारात उतरविण्यासाठी अनुरूप असे उपक्रम व योजना आखाव्या लागतात. त्यांच्या कार्यक्षम अंमलबजावणीसाठी आवश्यक ती साधनसामग्री उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांच्या तामिलीसाठी सक्षम अशी अंमलबजावणी यंत्रणा कार्यान्वित करावी लागते. हे सगळे सुबद्धपणे सुविहित चालू लागले की सरकारने प्रवर्तित केलेल्या कल्याणकारी योजना व उपक्रमांचे लाभ नागरिकांना व्यवहारात अनुभवास येऊ लागतात.

कोणत्याही समाजव्यवस्थेमध्ये आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक, वांशिक, शैक्षणिक स्तरीकरण जितके अधिक तितके कल्याणकारी उपक्रमांचे प्रत्येक स्तरातील समाजघटकांवर घडून येणारे परिणाम निरनिराळे शाबीत होतात. त्यानुसार त्या उपक्रमांना त्या त्या स्तरांतून मिळणारा प्रतिसादही निरनिराळा राहतो. लोककल्याणकारक योजनांच्या अंमलबजावणीमध्ये शासनसंस्थेच्या यंत्रणेबरोबरच नानाविध सामाजिक संघटना व अ-शासकीय व्यासपीठांची भूमिकादेखील कळीची राहते. शासनसंस्था, तिचे नागरिकांप्रती असणारे उत्तरदायित्व सक्रिय बनविणारे सरकार, कल्याणकारक धोरणे आखणारी यंत्रणा, प्रशासन, नागरिक आणि नागरिकांच्या संस्था-संघटना यांच्या परस्परसंबंधांमधून अर्थविकासाची प्रक्रिया गतिमान राहत असते. या प्रक्रियेत समाविष्ट असणाऱ्या विविध घटकांचे परस्परांशी असणारे बहुविध अनुबंध, त्यांवर प्रभाव पाडणारे घटक, अशा प्रभावशाली घटकांत स्थल-काल-देशपरत्वे होत जाणारे परिवर्तन, त्यांनुसार संबंधित घटकांच्या परस्परहितसंबंधांचे बदलत जाणारे पोत... अशा अनेकानेक बाबींचा अंतर्भाव 'राजकीय अर्थव्यवहार' अथवा 'राजकीय अर्थकारण' या संज्ञा-संकल्पनेमध्ये होत असतो.

नवसनातनवादी अर्थशास्त्राचा वरचष्मा प्रस्थापित होण्यास प्रारंभ झाल्यापासून, या क्षेत्रातील अभ्यासकांच्या मते, 'राजकीय अर्थव्यवहार' या संज्ञेने सूचित होणाऱ्या संमिश्र ज्ञानशाखेंतर्गत चिकित्सेच्या कक्षा क्रमाक्रमाने आकुंचन पावत राहिल्या व अंतिमत: त्या संज्ञेतील 'राजकीय' हे पूर्वपद निस्तेज पावत अस्तंगतच झाले. वर्गाच्या चार भिंतींमध्ये शिकवल्या जाणाऱ्या 'अर्थशास्त्र' या ज्ञानशाखेचे आजचे रंगरूप कोणते असेल तर ते नेमके हेच.

**एकच एक व्याख्या नाही**

राजकीय अर्थकारण या संकल्पनेची एकच एक सर्वमान्य, सार्वत्रिक अशी व्याख्या दिसत नाही. तशी ती करणे अवघडदेखील आहे. राजकारणाचा अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम आणि अर्थव्यवस्थेतील स्थितीगतींचे राजकारणाच्या क्षेत्रात उमटणारे

पडसाद यांचा अभ्यास, अशी राजकीय अर्थकारणाची एक अतिशय मोकळी–ढाकळी व्याख्या केली जाते. अर्थशास्त्र हे एक सामाजिक शास्त्र होय. त्यांमुळे, एका परीने, समाजव्यवहारातील जवळपास सर्वच घडामोडी अर्थशास्त्रीय विश्लेषणाच्या कक्षेत स्वाभाविकपणेच समाविष्ट होतात. अतिव्याप्तीच्या या आव्हानाचा सामना करण्याचा एक मार्ग अथवा पर्याय म्हणून व्यक्तींच्या तसेच व्यवसायघटकांच्या उपभोग, उत्पादन, बचत, गुंतवणूक, खरेदी–विक्री, मागणी, पुरवठा आदी व्यवहारांचा अभ्यास करण्यावर अर्थशास्त्राची ज्ञानशाखा आपले लक्ष केंद्रीत करते.

परंतु, व्यक्ती काय अथवा उद्योगघटक काय राजकीय घडामोडी, सामाजिक बदल, नैसर्गिक स्थित्यंतरे, वैश्विक घडामोडी यांपासून कधीच अलिप्त राहू शकत नाहीत. या सगळ्या गतिमानतेचे परिणाम व्यक्ती आणि व्यवसायघटकांच्या कार्यप्रणालीवर तसेच निर्णयांवर स्वाभाविकपणेच होत राहतात. या अर्थाने बघायला गेले तर, समकालीन समाजव्यवहारांतील जवळपास सर्वच बाबींचा अंतर्भाव राजकीय अर्थकारणाच्या कक्षेमध्ये होतो अथवा करावा लागतो. अतिव्याप्तीचा धोका इथेही पुढ्यात उभा ठाकतोच. तेव्हा मग, आधुनिक समाजव्यवहारांचे आकलन व विश्लेषण करण्यात राजकीय तसेच अर्थशास्त्रीय घटकांचा समन्वय घडवून आणणे, असाही एक मध्यम मार्ग शोधून ‘राजकीय अर्थकारण’ या संकल्पनेची व्याख्या करण्याचा प्रयत्न झालेला आहे.

मर्यादित मात्रेने उपलब्ध असणाऱ्या साधनसामग्रीचा पर्याप्त वापर कसा करायचा, अमर्याद आणि सतत बदलणाऱ्या गरजांची पूर्तता करण्यासाठी नानाविध वस्तू व सेवांचे उत्पादन करतेवेळी त्यांत प्राधान्यक्रम कसा लावायचा या संदर्भातील वस्तुनिष्ठ व शास्त्रीय अशी मार्गदर्शक तत्वे निर्माण करणे हे अर्थशास्त्राचे मुख्य योगदान ठरते. याच प्रकारचा पेच राजकीय व्यवस्थेतील सत्ताधाऱ्यांच्या पुढ्यातदेखील असतो. परंतु, राजकीय व्यवहारामध्ये विशुद्ध अर्थशास्त्रीय तर्क व संकेत यांचा वस्तुनिष्ठ अंगीकार करता येत नाही कारण, राजकारणाच्या क्षेत्रात एक विलक्षण कळीचा पैलू प्रत्येक बाबीला चिकटलेला असतो आणि तो पैलू म्हणजे सत्तासंबंधांचा. हे सत्तासंबंधदेखील पुन्हा एकरेषीय नसतात तर त्यांची रचना असते उतरंडीप्रमाणे. सत्तासंबंधांची ती उतरंडही पुन्हा स्थितीशील नसते तर ती असते गतिमान आणि नित्य बदलणारी. उतरंडीमध्ये निम्न स्तरांवर असलेल्या घटकांना अथवा समूहांना वरच्या स्तरांवर आरोहण करण्याची चिरंतन असोशी असते. तर, उतरंडीमध्ये उच्च स्तरांवर आधीपासूनच ठिय्या देऊन बसलेल्यांना तिथे स्पर्धा नको असते. परिणामी, राजकीय व्यवस्थेमधीला उतरंडप्रधान सत्तासंबंध हे कायम संघर्षमय स्थितीतच असतात.

शासनसंस्थेपाशी आणि पर्यायाने समाजापाशी उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीचे वाटप-वितरण करतेवेळी मुळातच संघर्षमय असणाऱ्या सत्तासंबंधांमधील घुसळण अधिकच तीव्र बनते. त्यांमुळे, समाजातील साधनसामग्रीचे वाटप-वितरण घडवून आणण्यादरम्यान सामाजिक संबंधांची, आणि त्यांतल्या त्यांतही पुन्हा त्यांत गुंफल्या गेलेल्या सत्तासंबंधांची जी घुसळण व फेरआकारणी होत राहते, त्यांचा अभ्यास म्हणजे 'राजकीय अर्थकारण', अशीही एक व्याख्या निष्पन्न झालेली दिसते. समाजजीवनात नांदणाऱ्या नियंत्रणांचा, ती नियंत्रणे राबविणाऱ्या नियामकांचा आणि त्या प्रक्रियेतून उपजणाऱ्या संघर्षातून तगून जाण्यासाठी विविध घटकांना कराव्या लागणाऱ्या जीवनझगड्यांचा अभ्यास करणे राजकीय अर्थकारणाला क्रमप्राप्त असते, अशी एक अतिशय महत्वाकांक्षी व विलक्षण व्यापक अपेक्षावजा व्याख्याही काही अभ्यासक मांडतात. परंतु, ही व्याख्यादेखील अतिव्याप्तीच्या दोषाने बाधित आहे, हे वेगळे सांगायला नको.

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेदरम्यान अर्थव्यवस्थेमध्ये 'संरचनात्मक बदल' (स्ट्रक्चरल चेन्जेस्) अथवा 'संरचात्मक परिवर्तन' (स्ट्रक्चरल ट्रान्सफॉर्मेशन) घडून येत असते. संरचनात्मक परिवर्तनाची ही प्रक्रिया प्रत्येक देशात निरनिराळ्या पद्धतीने साकारत राहावी, हे स्वाभाविकच ठरते. परंतु, या संदर्भातील आजवरच्या संशोधनपूत व अनुभवाधिष्ठित संकलित ज्ञानाच्या समुच्चयाने परिवर्तनाच्या वाटचालीचा एक ढोबळ व प्रातिनिधिक क्रम निर्देशित केलेला आहे. त्या क्रमानुसार, कोणत्याही अर्थव्यवस्थेच्या उत्क्रांतीदरम्यान अगदी पहिल्या पर्वात सुधारणा वा बदल घडून येण्यास प्रारंभ होतो तो शेती व अर्थव्यवस्थेतील एकंदरच भू-संलग्न उद्योगव्यवसायांच्या प्रांतांत. शेतीसुधारणांद्वारे चालना मिळते ती अन्नधान्ये आणि प्रक्रियायोग्य शेतमालाच्या उत्पादनास. उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून असणाऱ्या समाजघटकांच्या उत्पन्नवाढीस त्यांद्वारे चालना मिळते. यांतूनच पुढे मग अन्नधान्येतर जिनसा व सेवांच्या मागणीस बहर येतो व क्रमाक्रमाने वस्तुनिर्माण उद्योगांचा उगम व विस्तार गतिमान बनतो. इथे अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक परिवर्तनाचा दुसरा अध्याय उगम पावतो. शेती आणि वस्तुनिर्माण उद्योग या अर्थव्यवस्थेतील संयुक्त उत्पादनक्षेत्राचा पाया हळूहळू चांगला सशक्त बनला की यथावकाश बँकिंग, वाहतूक, दळणवळण, व्यापार, आरोग्य, शिक्षण, विमा, करमणूक, बांधकाम... यांसारख्या सेवांना असणारी मागणी जोर धरू लागते. अर्थव्यवस्थेच्या विकासाचा हा सर्वाधिक परिपक्व टप्पा गणला जातो.

**परिवर्तनाद्वारे पालटणारे सत्तासंबंध**

अर्थव्यवस्थेमध्ये घडून येणारे असे संरचनात्मक परिवर्तन, अतिशय स्वाभाविकपणे, त्या त्या उद्योग-व्यवसायांच्या क्षेत्रांशी उत्पादक, वितरक, पुरवठादार, गुंतवणुकदार, विक्रेते, ग्राहक अशा नानाविध नात्यांनी गुंफल्या गेलेल्या समाजघटकांच्या आर्थिक-भौतिक परिस्थितीमध्ये बदल घडवून आणत राहते. संबंधित समाजघटकांच्या आर्थिक-व्यावसायिक-सांपत्तिक परिस्थितीमध्ये साकारणारे बदल त्या समाजव्यवस्थेत विद्यमान असणाऱ्या सत्तासंबंधांच्या रचनेतदेखील प्रतिबिंबित व्हावेत, हे ओघानेच येते. हे एवढ्यावरच संपत अथवा थांबत नाही. अर्थव्यवस्थेतील परिवर्तनादरम्यान ज्या ज्या समाजघटकांचे आर्थिक-भौतिक स्थान बदलते ते ते समाजघटक कितपत संघटित आहेत त्यांवर परिवर्तनोत्तर सत्तासंबंधांचा जो बदललेला नकाशा साकारतो त्यांत प्रत्येक समाजघटकाचे स्थान नेमके कोठे व कसे असेल, ते अवलंबून राहते. त्यांमुळे, राजकीय अर्थकारणाला अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक परिवर्तनाच्या प्रक्रियेचाही इतिहासदृष्टीने मागोवा घेणे क्रमप्राप्त ठरते, असेही काही अभ्यासकांचे प्रतिपादन दिसते.

अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक परिवर्तन सामाजिक सत्तासंबंधांच्या फेररचनेमध्ये परिवर्तित होत असताना नेमक्या कोणकोणत्या प्रक्रिया त्या दरम्यान साकारतात, त्या प्रक्रियांचे शिल्पकार व वाहक कोण असतात, स्थित्यंतराद्वारे साकारणाऱ्या नवव्यवस्थेचे लाभार्थी व बळी नेमके कोणते घटक ठरतात... अशांसारख्या पैलूंचा अभ्यास, मग, राजकीय अर्थकारणाच्या चिकित्सेचा प्रांत बनतो. परिवर्तनाद्वारे जी बदललेली व्यवस्था अस्तित्वात येते तिच्यातील नवीन संस्थात्मक जीवन नेमके कसे असते, त्या नवव्यवस्थेतील व्यक्ती आणि व्यक्तिसमूहांचे नूतन संस्थात्मक रचनेशी कशा प्रकारचे नाते जुळते हेदेखील मग राजकीय अर्थकारणाच्या कुतूहलाचे प्रांत ठरतात.

**अभ्यास, नातेसंबंधांच्या जाळ्याचा**

या अर्थाने बघायला गेले तर, 'राजकीय अर्थकारण' ही एका बाजूने व्यक्ती आणि समाज यांच्यादरम्यानच्या तर दुसऱ्या बाजूने बाजारपेठा आणि शासनसंस्था यांच्यादरम्यान नांदणाऱ्या बहस्तरीय नातेसंबंधांच्या गोफाचा अभ्यास करणारी ज्ञानशाखा ठरते. नातेसंबंधांचे हे जाळे बहुआयामी असल्यामुळे कोणत्याही एखाद्या ज्ञानशाखेतील अभ्यासाची साधने इथे उपयुक्त व पुरेशी ठरू नयेत, हे ओघानेच आले अथवा येते. त्यांमुळे, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र अशा विविध परंतु परस्परांशी संलग्न ज्ञानशाखांमधील अभ्याससाधने राजकीय अर्थकारणात उपयोजिली जातात. व्यक्तीचे

समाजाशी निर्माण होणारे नाते आणि/अथवा बाजारपेठांचे शासनसंस्थेबरोबरील नाते, त्या नात्याचा पोत आणि त्या नातेसंबंधांचे व्यवस्थापन करणारे संकेत अथवा नियम संबंधित घटकांच्या वर्तनाद्वारे उत्क्रांत होत राहतात. हे प्रतिपादन अथवा ही तर्कदिशा, एक प्रकारे, शासनसंस्थेसारख्या कोणत्याही बाह्य नियामकाच्या ढवळाढवळीखेरीज खुल्या बाजारपेठीय व्यवहारांच्या माध्यमातून साध्य होणाऱ्या सार्वजनिक कल्याणाची पाठराखण करणाऱ्या अर्थशास्त्रीय सिद्धान्तनाशी सुसंवादी अशा प्रकारची आहे. कुटुंबसंस्था, उद्योग-व्यवसायसंस्था, शासनसंस्था अशा अर्थव्यवस्थेतील विविध घटकसंस्था त्यांच्या त्यांच्या कल्याणाचे व हिताचे महत्तमीकरण साध्य करण्यासाठी आपापल्या परीने धडपडत राहतात आणि त्या धडपडीद्वारे साकारणारी व्यवस्था एकंदरीनेच सामूहिक हिताचे वा कल्याणाचे महत्तमीकरण साधणारी ठरते, हे अर्थशास्त्रातील एक मूलभूत प्रतिपादन होय. अशा परिस्थितीत, ''व्यक्ती व समाज आणि बाजारपेठा व शासनसंस्था यांच्यादरम्यानच्या नातेसंबंधांचे नियमन करणाऱ्या संकेतांचा अभ्यास करणारी ज्ञानशाखा म्हणजे राजकीय अर्थकारण'', ही व्याख्या स्वीकारल्यास, सर्वच सामाजिक संबंधांचे विश्लेषण व अभ्यास राजकीय अर्थकारणाच्या कक्षेत अंतर्भूत होतो.

विचारांच्या या दिशेची एक अतिशय महत्त्वाची परिणती साकारली ती १९७०च्या तसेच १९८०च्या दशकात. समाजव्यवहारांचे नियंत्रण व नियमन करण्यासंदर्भात शासनसंस्थेची असणारी स्वायत्तता व त्या स्वायत्ततेचा विस्तारणारा पैस समाजमानसाकडून स्वीकारला जाणे, ही होय ती परिणती.

शासनसंस्थेचा विस्तारणारा आवाका आणि तिची प्रसरणशील कार्यकक्षा, सामाजिक संबंधांची वीण आणि अर्थकारण यांच्या नियमनात वाढणारा शासनसंस्थेचा सहभाग आणि त्यांद्वारे समाजव्यवहारातील नानाविध वर्गघटकांशी तिचे प्रस्थापित होणारे संबंध यांसंदर्भातील चर्चाविश्व या साऱ्या प्रक्रियेद्वारे एकदम विस्तारले. समाजव्यवहारांच्या राजकीय आणि आर्थिक अंग-प्रत्यंगांच्या परस्परांशी असलेल्या गतिमान नात्यांचे विश्लेषण या साऱ्याद्वारे राजकीय अर्थकारणाच्या प्रांगणात प्रवेशले. त्याची परिणती घडून आली ती आणखी एका चर्चाविश्वाच्या उगमामध्ये. एकंदर सामाजिक व्यवहारांचे एक अंग असलेल्या आर्थिक व्यवहारांचे आणि ते व्यवहार अर्थविश्वात ज्यांच्या माध्यमातून साकारतात त्या आर्थिक घटकांचे व्यावसायिक चलनवलन शासनसंस्थेच्या वाढत्या विस्तारापायी तिच्यापासून अ-स्पर्शित राहणे अशक्य आहे हे स्पष्ट झाल्यामुळे समाजव्यवहारांच्या आर्थिक अंगाची स्वायत्तता

आता कशी निगुतीने जपायची, या संदर्भातील विचारविमर्शाला जोरदार चालना मिळाली.

शासनसंस्था ज्या 'सरकार'नामक उपकरणाद्वारे अर्थव्यवस्थेमध्ये सक्रिय राहते ते 'सरकार' नावाचे उपकरण राजकीय पक्षांच्या माध्यमातून शक्य बनत असते. राजकीय पक्षांचे नेते त्यांच्या त्यांच्या हितसंपादनाच्या प्रेरणेने झपाटलेले असतात. सरकारचे कार्यक्रम राबविण्यासाठी त्यांना प्रशासकीय यंत्रणेचे साहाय्य अनिवार्य असते. प्रशासनातील नोकरशहा आणि सत्तारूढ सरकारमधील राजकीय नेतृत्व यांच्या संगनमताद्वारे धोरणांची आखणी व अंमलबजावणी होत राहते. राजकीय क्षेत्रातील धुरिणांप्रमाणेच प्रशासनातील नोकरशाहीलाही तिची म्हणून काही उद्दिष्टे असतातच. म्हणजेच, सत्तारूढ राजकीय पक्षांचे धुरीण आणि नोकरशाह यांच्या उद्दिष्टांचे साहचर्य शासनसंस्थेच्या क्रियाशीलतेसाठी अनिवार्य ठरते. लोककल्याणाची धोरणे निश्चित होतात ती राजकीय नेते आणि प्रशासनातील नोकरशहा यांच्या उद्दिष्टांच्या त्याच साहचर्याद्वारे. परिणामी, अशी धोरणे व्यापक सामाजिक कल्याणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी पूरक व पर्याप्त असतीलच याची हमी देता येत नाही. त्यांमुळे, सरकारच्या कल्याणकारी धोरणांची चिकित्सल छाननी हा राजकीय अर्थकारणाचा निरंतरचा गाभा ठरतो.

# पुरवणी

## पुनरुत्थान पर्वातील 'एव्हरेस्ट'

■ नीळकंठ रथ

गोंडवन प्रदेश म्हणून एके काळी ओळखल्या जाणाऱ्या भूभागाचे काळाच्या ओघात विभाजन झाले आणि त्यातलाच एक भाग आशिया खंडाकडे सरकला. भारतीय द्वीपकल्प म्हणून आज ओळखला जाणारा भाग तो हाच. आशिया खंडाशी या भागाचा प्रस्थापित झालेला संपर्क आणि आशियाई भूप्रदेशावर त्याचा निर्माण झालेला दाब यांतूनच उत्तुंग पर्वतरांगांनी सजलेल्या हिमालयाची उत्पत्ती झाली. हिमालयाच्या अनेकानेक गगनचुंबी शिखरांपैकी सर्वोच्च शिखर म्हणजे माउंट एव्हरेस्ट. १८व्या शतकाच्या उत्तरार्धापासून भारताचा युरोपशी – विशेषत: ब्रिटनशी – जो संपर्क आला त्यातून नेमके अशाच प्रकारचे स्थित्यंतर इथे घडून आले. त्यातल्या त्यातही पुन्हा, ही प्रक्रिया पश्चिम भारतात अधिक सघनपणे साकारली ती १८१८ साली मराठा साम्राज्य लयास गेल्यानंतर. ब्रिटनसह एकंदरच युरोप त्या वेळी औद्योगिक क्रांती आणि प्रबोधनाच्या पर्वातून मार्गक्रमण करत होता. युरोपशी प्रस्थापित झालेल्या निकट साहचर्याद्वारे बाहेरच्या विश्वाचे जे दर्शन एतद्देशीयांना घडले त्यातून सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, बौद्धिक आणि आर्थिक असे विविधांगी मंथन इथल्या समाजजीवनात सुरू झाले. उत्तुंग व्यक्तिमत्त्वाच्या लोकाग्रणींची जणू मांदियाळीच त्यातून निपजली. बंगाल प्रांतावर नजर फिरवली तर (राजा) राममोहन राय, ईश्वरचंद्र विद्यासागर, देबेन्द्रनाथ ठाकुर, केशबचंद्र सेन, मायकेल मधुसूदन दत्त, बंकिमचंद्र चट्टोपाध्याय, शरदचंद्र चट्टोपाध्याय, स्वामी विवेकानंद, रमेशचंद्र दत्त, रबींद्रनाथ ठाकुर यांच्यासह अनेक गगनचुंबी शिखरे डोळ्यासमोर उभी ठाकतात. पश्चिम भारताचा विचार केला तर, जगन्नाथ शंकरशेट, बाळशास्त्री गंगाधर जांभेकर, दादोबा पांडुरंग तर्खडकर, (डॉ) नारायण (भाऊ) दाजी, विष्णुबुवा ब्रह्मचारी, दादाभाई नवरोजी, (महात्मा) जोतीबा फुले, गोपाळ हरी देशमुख (लोकहितवादी), कृष्णशास्त्री चिपळूणकर, महादेव गोविंद रानडे, रामकृष्ण गोपाळ भांडारकर, काशिनाथ त्र्यंबक

तेलंग, बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर, पंडिता रमाबाई, कृष्णाजी केशव दामले (केशवसुत), गणेश व्यंकटेश जोशी, गोपाळ कृष्ण गोखले, विश्वनाथ काशिनाथ राजवाडे, विठ्ठल रामजी शिंदे, नारायण गणेश चंदावरकर, हरी नारायण आपटे, (महर्षी) धोंडो केशव कर्वे यांच्यासह अनेक अलौकिक व्यक्तिमत्त्वांचा निर्देश प्रस्तुत ग्रंथात केलेला आहे. या लोकाग्रणींनी मराठी आणि इंग्रजी या उभय भाषांमधून केलेले लेखन, त्यांची जाहीर व्याख्याने, चर्चा-परिसंवाद, निषेध मोर्चासह सामाजिक तसेच राजकीय क्षेत्रांत त्यांनी प्रवर्तित केलेल्या अन्य चळवळी यांचा प्रभाव या भूमीतील वाढत्या शहरी नागरिकांपुरताच केवळ सीमित नव्हता. ग्रामीण जनमानसापर्यंतही त्याचे आवाहन पोहोचलेले होते. शतकानुशतके स्थितिशील बनलेल्या भारताच्या पुनरुत्थानाची पायाभरणी या लोकोत्तरांच्या वाणी-करणी लेखणीने केली.

लोकाग्रणींच्या या मालिकेतील तीन न्यायमूर्तींबद्दल न्या. चपळगावकर यांनी लिहिले आहे. मुंबई उच्च न्यायालयात न्यायमूर्तीपदावर नियुक्ती झाल्यानंतर ज्या दालनात न्यायमूर्ती चपळगावकर बसत असत त्या दालनात चपळगावकर यांच्या आसनामागे न्यायमूर्ती तेलंग यांची प्रतिमा होती. चपळगावकरांचे मन भूतकाळात एक शतकभर मागे गेले. त्या काळात याच न्यायालयात न्यायदान केलेल्या न्या. तेलंग, न्या. रानडे व न्या. चंदावरकर या लोकोत्तर पूर्वसुरींच्या स्मरणाने ते भारावून गेले अशी आठवण त्यांनी सांगितली आहे.

न्यायाधीशपदावर मुंबई उच्च न्यायालयात प्रथम नियुक्त झाले ते न्यायमूर्ती तेलंग. त्यांच्या देहावसानानंतर न्यायमूर्ती रानडे आणि मग न्यायमूर्ती चंदावरकर असा तो क्रम होता. हे तिघेही न्यायाधीश होते एवढा एकच काय तो त्यांच्यातील समान दुवा नव्हता. न्यायसंलग्न वा विधिसंबद्ध अशा प्रत्येकच बाबीसंदर्भात त्यांच्यात मतैक्य होते. अशातलाही भाग नाही; परंतु घटनात्मक आणि राजकीय उत्क्रांतीच्या व्यापक क्षेत्रातील त्याचप्रमाणे सामाजिक-धार्मिक विचार आणि न्यायक्षेत्रातील त्यांच्या कार्यकर्तृत्वामागील प्रेरणा, विचारप्रणाली व भूमिकांमध्ये मात्र साधर्म्य व एकसूत्रीपणा होता. किंबहुना, १९०१ साली न्यायमूर्ती रानडे निधन पावल्यानंतर त्यांच्यापेक्षा वयाने तब्बल १३ वर्षांनी लहान असणाऱ्या न्यायमूर्ती चंदावरकरांनी रानड्यांच्याच कार्याची दिशा उचलली.

पुनरुत्थानाने रसरसलेल्या भारतातील या शिखरांच्या मालिकेत, माझ्या मते एव्हरेस्टचा मान जातो तो महादेव गोविंद रानडे यांच्याकडे. त्यांचे केवळ विचार आणि लेखनच नव्हे तर, त्यांनी प्रवर्तित केलेल्या सामाजिक चळवळी आणि त्यांनी

पुकारलेल्या सामाजिक बाबी समाजजीवनाच्या जवळपास प्रत्येक अंगाला स्पर्शणाऱ्या होत्या. ''राष्ट्रीय स्तरावर नवचिंतनाचे, पुनरुत्थानाचे जे जे म्हणून प्रयत्न विविध आघाड्यांवर झाले त्या त्या साऱ्या उपक्रमांचे आद्य स्फूर्तिदाते रानडे हेच होते. आधुनिक भारताच्या शिल्पकारांमध्येही सर्वाधिक प्रभावशाली, सर्वांत अधिक दखलपात्र असे व्यक्तिमत्त्व म्हणूनही त्यांचाच निर्देश केला जाणे अनाठायी ठरणार नाही'', असे रानड्यांच्या जन्मशताब्दीप्रसंगी पुण्यात केलेल्या एका भाषणात श्रीनिवास शास्त्री यांनी काढलेले उद्‌गार पूर्णत: सार्थ ठरतात.

एकोणिसाव्या शतकातील नवशिक्षित भारतीयांचे लक्ष प्रथमत: वेधले गेले ते तत्कालीन समाजव्यवस्थेत प्रचलित असणाऱ्या सामाजिक तसेच धार्मिक बाबींकडे. जातिव्यवस्था, कर्मकांडे, सामाजिक रूढी व परंपरा म्हणजेच धर्म, अशी सर्वसामान्यांची शतकानुशतकांची धारणा होती. नानाविध देवदेवतांची उपासना हा धर्मकृत्यांमधील सर्वांत बलिष्ठ भाग होता. या देवदेवतांमध्येही पुन्हा जातवार, गाववार, विभागनिहाय प्रचंड वैविध्य. युरोपीय व्यापाऱ्यांबरोबरच भारतात आलेल्या ख्रिस्ती मिशनऱ्यांनी धर्मप्रसार आणि धर्मांतराच्या मोहिमेदरम्यान नेमक्या या धार्मिक कर्मकांडांवरच हला चढविला. यातूनच, हिंदुधर्मीयांची धर्मकल्पना, कर्मकांडे, परंपरा, जातिव्यवस्था आणि जातिव्यवहार यांबाबत नवशिक्षित भारतीय बुद्धिवंतांच्या वर्गात सखोल नवचिंतन, लेखन आणि त्याच्या जोडीनेच सुधारणांचा पुरस्कार गांभीर्यपूर्वक सुरू झाला. ३३ कोटी देवदेवतांचे पूजन-अर्चन करण्याच्या प्रचलित पद्धतीऐवजी एकाच सगुण निराकार ब्रह्मतत्त्वाची उपासना करण्याबाबतचे विचारमंथनही याच नवचिंतनाचा एक भाग होता.

बालविवाहाच्या प्रथेविरुद्ध चळवळ उभारून रानडे आणि तेलंग यांनी आपल्या सामाजिक कार्याचा श्रीगणेशा केला. विवाहासाठीच केवळ नाही तर लग्नविधीनंतरच्या गर्भाधानासाठीही किमान वयाची अट कायद्याने घातली जावी, या मुद्द्यांचाही अंतर्भाव त्यांच्या प्रतिपादनात होता. विधवाविवाहाचाही प्रश्न त्यांनी आणि काही इतरांनी हाती घेतला. ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी बंगालमध्ये घडवून आणलेल्या जागरणाची प्रेरणा त्यामागे होती. विधवाविवाहासंदर्भातील कायद्यास कलकत्त्याच्या गव्हर्नर जनरलांनी १८५६ साली दिलेली अनुमती हे ईश्वरचंद्रांनी चळवळीच्या माध्यमातून त्यासाठी केलेल्या पाठपुराव्याचेच फलित होते. या प्रश्नाबद्दल घेतलेल्या भूमिकेची झळ रानडे आणि तेलंग यांच्या व्यक्तिगत आयुष्यालाही लागली; परंतु तरीही आपापल्या निष्ठांबाबत ते ठाम राहिले. अर्थात, या संदर्भात रानडे आणि

तेलंग यांच्या भूमिकांत फरक दिसतो. तेलंग सामाजिक बाबतींतील सुधारणांचे खंदे पुरस्कर्ते असले तरी कायदे करून सुधारणांची अंमलबजावणी करण्याबाबत ते व्यक्तिश: अनुकूल नव्हते. सामाजिक प्रबोधन आणि सुधारणांबाबतच्या चळवळींच्या माध्यमातून मन:परिवर्तन घडून येऊन समाजाने आपण होऊनच त्यांचा अंगीकार करणे श्रेयस्कर, असे तेलंग मानत असत. रानड्यांची या संदर्भातील धारणा मात्र भिन्न होती. सामाजिक प्रतिगामित्वाचे चटके सहन कराव्या लागणाऱ्या समाजाच्या ठिकाणी त्याविरुद्ध लढण्याचे बळ मुळातच तुटपुंजे असल्याने कायद्याचे अस्त्र परजून अशा समाजसमूहांच्या मदतीस धावून जाणे हे शासनसंस्थेचे उत्तरदायित्वच ठरते, अशी रानडे यांची धारणा होती. दुसरे म्हणजे, रानड्यांच्या मते या साऱ्या बाबींचा समावेश निव्वळ धार्मिक बाबीच्याच गटात करणे अयोग्य होते. मानवी मूल्यविचारांचेही अस्तर त्यांना लाभलेले असल्याने अशा बाबींसंदर्भात उचित असे कायदेकानून तयार करून त्यांची अंमलबजावणी करणे हा शासनसंस्थेचा केवळ हक्कच नव्हे तर ती तिची जबाबदारी ठरते, अशी रानड्यांची भूमिका होती. जातिभेदाच्या प्रथेस रानड्यांचा विरोध याच दृष्टिकोनातून होता.

'धर्म' आणि जातिप्रथेसारख्या 'सामाजिक' म्हणून गणल्या जाणाऱ्या धारणा, परंपरा, कर्मकांडे हे परस्परांपेक्षा भिन्न आहेत हे नेमकेपणाने हेरणे, हे रानडे यांच्या एकंदरच विचारविश्वाचे मोठे महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. भारतीय सामाजिक परिषदेची अधिवेशने रानड्यांनी दरवर्षी देशाच्या निरनिराळ्या भागांत भरविली. भारताच्या विविध भाषिक- सांस्कृतिक विभागांत नांदणाऱ्या प्रथा-परंपरांमध्ये फरक असणे स्वाभाविक आहे, याची जाण रानडे यांना होती; परंतु पारंपरिक धारणा - विश्वासांच्या जोखडाखालून एकंदरच भारतीय समाजाची मुक्तता घडून येण्यासाठी नानाविध सुधारणांबाबत सक्रिय असणाऱ्या ठिकठिकाणच्या संस्था-संघटनांना एका व्यासपीठावर आणण्याखेरीज पर्याय नाही, हेही त्यांना उमगलेले होते. प्रादेशिक वैविध्याबद्दलची अशी पर्याप्त संवेदनशीलता आणि जाण, रानड्यांनी त्या काळी केलेल्या प्रयत्नांना पुरेपूर शंभर वर्षे उलटून गेल्यावर आज कोठेही प्रतीत होत नाही, ही खरोखरच खेदाची बाब होय. साहजिकच, अनिष्ट अशा सामाजिक रूढी-संकेतांचे निराकरण घडवून आणण्याच्या दिशेने प्रयत्नशील होण्यासाठी, त्या संदर्भातील अनुभवांची देवाणघेवाण करण्यासाठी अखिल भारतीय स्वरूपाची व्यासपीठे निर्माण करण्याबाबतचे प्रयत्नही आज होताना दिसत नाहीत.

धार्मिक बाबींपासून सामाजिक सुधारणांचा सांधा वेगळा करताना भारतातील बुद्धिवादी अभिजनांनी हिंदू धर्माची बीजे वेदोपनिषदांमध्ये शोधण्याचा प्रयत्न केला.

ब्राह्मसभा–जिचेच रूपांतर पुढे ब्राह्मसमाजात झाले – स्थापन करणारे (राजा) राममोहन राय हे अशा बुद्धिवाद्यांचे अध्वर्यू. निराकार ब्रह्म ही ब्राह्मसमाजाच्या धार्मिक विचारव्यूहाची गाभा – संकल्पना. अशा निराकार ब्रह्माच्या उपासनेसाठी, साहजिकच, देवळाची गरजच नव्हती. केवळ प्रार्थनाही त्यासाठी पुरेशी होती. या संकल्पनेचा तत्कालीन बंगाली समाजात उपहासच झाला. घोड्याचे अंडे कधी कोणी पाहिले आहे का... 'निराकार ब्रह्म' ही तशीच अस्तित्वात नसलेली, अशक्य, निव्वळ कल्पनेच्या साम्राज्यातील चीज आहे म्हणून तिची खिल्ली उडविली गेली. ब्राह्मसमाजाचे विख्यात अनुयायी आणि वक्ते केशबचंद्र सेन यांची भाषणे रानडे आणि तेलंगांनी मुंबईत ऐकली. राममोहन राय तसेच अन्य लेखक–विचारवंतांचे लेखनही त्यांनी वाचलेले होतेच. ब्राह्मसमाजाच्या धर्तीवरच, प्रथम मुंबईत आणि मग अन्य शहरांत प्रार्थनासमाजाची जी स्थापना झाली तिची थोडीशी पार्श्वभूमी न्यायमूर्ती चपळगावकरांनी प्रस्तुत ग्रंथात दिलेली आहे. प्रार्थनासमाजाचे तत्त्वज्ञान तसेच विचारांबाबत लेखन–प्रबोधन करण्याबरोबरच वेदीवरून उपासना चालविणाऱ्यांमध्ये रानडे, भांडारकर आणि तेलंगच मुख्य होते. परंतु ब्राह्मसमाज आणि प्रार्थनासमाज या दोहोंत एक महत्त्वाचा फरक होता. ज्ञानेश्वरादी संतकवींनी महाराष्ट्रात प्रवर्तित केलेल्या भक्तिविचाराशी प्रार्थनासमाजाच्या तत्त्वदर्शनाचा सांधा जोडून घेतला तो रानडे आणि भांडारकरांनी. याचा परिणाम असा झाला की, प्रार्थनासमाजाच्या विचारप्रणालीबाबतचे गैरसमज ज्याप्रमाणे हिंदूधर्मीयांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रसृत झाले नाहीत, त्याचप्रमाणे, सर्वसामान्य हिंदू माणूस प्रार्थनासमाजापासून मोठ्या प्रमाणावर दुरावलाही नाही. बंगालमध्ये मात्र असे घडलेले दिसत नाही. महाराष्ट्राप्रमाणे समृद्ध आणि व्यापक प्रकारची भक्ती परंपरा आणि साहित्याचा तेथे अभाव असल्यामुळेच असेल कदाचित, परंतु केवळ प्रार्थनागृहातच स्तवन करावयाच्या निराकार ब्रह्माच्या संकल्पनेपायी ब्राह्मसमाज हा ख्रिश्चन धर्माचेच जणू भावंड असल्याची धारणा बहुसंख्य हिंदुधर्मीयांमध्ये तिथे हळूहळू रुजली. रानडे आणि भांडारकरांच्या भाषण–प्रवचनांमुळे अनेक मध्यमवर्गीय हिंदुधर्मीयांचे आकलन, धीमेपणाने का होईना, व्यापक बनू लागले. विठ्ठल रामजी शिंदे यांनी स्थापन केलेल्या डिप्रेस्ड क्लासेस मिशनसारख्या अन्य चळवळी – उपक्रमांचा उगम त्यातूनच घडून आला. न्यायमूर्ती चंदावरकर हे डिप्रेस्ड क्लासेस मिशनचे कित्येक वर्षे अध्यक्ष होते.

अशा प्रकारच्या विविध सुधारणा चळवळींबाबतच केवळ नव्हे तर, अगदी व्यक्तिगत स्वरूपाच्या धार्मिक निष्ठांबद्दलही रानड्यांचा दृष्टिकोन आणि भूमिका

कमालीची उदार होती. (महात्मा) जोतीबा फुले यांनी महाराष्ट्रात स्थापन केलेला सत्यशोधक समाज तसेच (महर्षी) दयानंद सरस्वती यांनी पंजाबमध्ये स्थापन केलेला आर्यसमाज यांना रानडे यांचा पाठिंबा होता. या दोहोंप्रमाणेच ज्या अन्य संस्था उपक्रमांच्या पाठीशी रानडे उभे होते अशांचा निर्देश प्रस्तुत ग्रंथात आलेला आहे. धर्मविचार आणि धर्मकृत्यांकडे बघण्याच्या रानडे यांच्या उदार दृष्टिकोनाला अधिष्ठान लाभले होते ते त्यांच्या ठायी वसणारी भक्तिभावना आणि एकंदरच समग्र मानवी मूल्यांबद्दल त्यांनी जपलेल्या प्रतिष्ठेचे. १९व्या शतकात भारतात साकारलेल्या बौद्धिक घुसळणीमधील एक उत्तुंग शिखर म्हणून ज्यांचा निर्देश करता येईल अशा पंडिता रमाबाईंच्या कार्याकडे बघण्याच्या रानडे यांच्या भूमिकेत ते अधिष्ठान अधोरेखित होते. रमाबाईंसारख्या पारंपरिक विद्याशाखांत पारंगत गतधवा तरुण विदुषीने प्रथम मुंबईस आणि नंतर पुण्यास येऊन स्थायिक व्हावे यांसाठी खटपट करणाऱ्या पश्चिम भारतातील तत्कालीन अनेक लोकाग्रणींमध्ये रानडे यांचाही समावेश होता. रमाबाईंची विद्वत्ता आणि त्यांचे वक्तृत्व यांबाबत रानडे यांना मोठाच आदर वाटत असे. हिंदू समाजातील तरुण विधवांसाठी रमाबाईंनी हाती घेतलेल्या सामाजिक कार्याचे ते मोठेच पाठीराखे होते. वैद्यकाचे शिक्षण इंग्लंडमध्ये घेऊन डॉक्टर बनण्याच्या रमाबाईंच्या इच्छेचीही त्यांनी पाठराखण केली. इंग्लंडमध्ये दाखल झाल्यापासून सहा महिन्यांच्या आतच रमाबाईंनी ख्रिस्ती धर्माचा अंगीकार केला. ''स्खलित स्त्रियांची सेवा हीच सर्वांत मोठी ईशसेवा अशी येशूची शिकवण असल्याचे, अडचणीत सापडलेल्या अशा महिलांच्या साहाय्यार्थ दर रविवारी लंडनला धाव घेणाऱ्या ख्रिस्तसेविकांकडून (नन्स) इंग्लंडमधील मुक्कामात मला सांगण्यात आले होते. सेविकांकडून कळलेल्या त्या ख्रिस्तवचनाची सत्यासत्यता पडताळण्यासाठी बायबलचे पुनर्वाचन केले असता त्याची यथार्थता प्रत्ययास आली. स्मृतिग्रंथ आणि धर्मशास्त्रांमध्ये या प्रकारचे एकही वचन आपणांस कोठेही आढळून आले नाही. हिंदू धर्मातच राहून येशूच्या शिकवणीबरहुकूम चालणे हा अप्रामाणिकपणा ठरेल, अशी आपली धारणा झाल्याने ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करून येशूचे अनुयायित्व पत्करण्याचा निर्णय आपण घेतला'', असे इंग्लंडहून परत आल्यानंतर धर्मांतराबाबत पृच्छा करणाऱ्यांना रमाबाई सांगत असत. कोणत्याही एका पंथाला रमाबाईंनी स्वत:ला वाहून घेतले नव्हते. त्यांनी गळ्याभोवती धारण केलेल्या क्रॉसवर येशूची वचने संस्कृतात कोरलेली होती. त्यांनी कधीही धर्मांतरे घडवून आणली नाहीत. रमाबाईंनी स्थापन केलेल्या शारदासदनातील एका मुलीच्या धर्मांतरास त्या कारणीभूत असल्याचा आरोप रमाबाईंवर

केला जात असल्याचे कळेपर्यंत न्यायमूर्ती रानडे हे रमाबाईंच्या कार्याचे पुरस्कर्ते आणि त्यांचे हितचिंतक राहिले. धर्मांतरासंदर्भातील तो साराच भाग चुकीचा असल्याचे पुढील काळात प्रकाशित झालेल्या लेखन-संशोधनांत नमूद करण्यात आले. ते काहीही असले तरी, रमाबाईंनी केलेल्या धर्मांतरामुळे रानडे कधीही विचलित झाले नाहीत वा त्यांना त्याबाबत विषादही वाटला नाही. रमाबाईंच्या धर्मांतरामुळे त्यांच्यावर अनेकांचा रोष झाला; त्यांत लोकमान्य टिळकही होते.

भारतीय अर्थव्यवस्थेसंदर्भात रानडे यांनी केलेले चिंतन आणि मंथन हे खरोखरच असाधारण आणि पूर्णत: मौलिक म्हणूनच गणावे लागले. मुंबई इलाख्यातील जमीन महसुलाच्या सारा निर्धारणासंदर्भात रानडे यांनी केलेल्या लेखनाचा निर्देश, अर्थशास्त्राच्या प्रांतातील त्यांचे महत्त्वाचे असे पहिले लेखन म्हणून करता येईल. अमेरिकी यादवी युद्धाच्या समाप्तीनंतर कापसाच्या बाजारभावांत घडून आलेल्या तीव्र घसरणीपायी आधीच भारतीय अर्थव्यवस्था अडचणीत आली होती. त्यातच, हाती घेण्यात आलेल्या पहिल्या भूसर्वेक्षणानंतर करण्यात आलेल्या जमीन महसुलाच्या फेरआकारणीत शेतसाऱ्याच्या रकमेत जबदरस्त वाढ झाल्याने मुळातील आपत्तीत भरच पडली. या फेरआकारणीची झळ पोहोचलेल्या दख्खन प्रांतातील काही जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांच्या असंतोषाने दंग्यांचे रूप धारण केले. सर्वेक्षणांती शेतसाऱ्यांची नवीन दराने फेरआकारणी करण्याबाबत शिफारस करणाऱ्या संबंधित महसूल आयुक्तावर रानडे यांनी पूरक आकडेवारीनिशी टीकास्त्र सोडले. शेतसाऱ्याचे दर लक्षणीयरीत्या वाढविल्याने शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर घाला येऊन त्याची परिणती प्रांतातील शेतीचा ऱ्हास घडून येण्यात होईल, हे त्यांनी निदर्शनास आणून दिले. जमीनधारकांनी शासनाला द्यावयाचा शेतसारा शेतकऱ्याच्या एकंदर शेतीउत्पादनाचा काही एक ठरावीक हिस्सा असावा आणि तो हिस्साही वस्तुरूपाने जमा करण्याची तरतूद असावी, या वेडरबर्न यांनी मांडलेल्या प्रस्तावास रानडे यांचा पाठिंबा होता. शेतकऱ्यांनी वस्तुरूपाने जमा करावयाच्या साऱ्याचे रोख रकमेत रूपांतर प्रचलित बाजारभावाने केले जावे, असे या प्रस्तावात अनुस्यूत होते. अंतिमत:, बंगाल इलाख्यातील जमीनदार ज्याप्रमाणे कायमस्वरूपी एक ठरावीक रक्कम शेतसाऱ्यापोटी सरकारी तिजोरीत जमा करीत असत त्याच धर्तीवर, मुंबई इलाख्यात प्रचलित असणाऱ्या रयतवारी व्यवस्थेतही रोखीच्या स्वरूपातील एक ठरावीक रक्कमच रयतेने सरकारला साऱ्यापोटी दरवर्षी द्यावी, या मताचे रानडे हे पुरस्कर्ते होते. या व्यवस्थेमुळे, शेतीमधील गुंतवणूक वाढण्यास चालना मिळेल, असे त्यांचे प्रतिपादन होते. शेतीमधील

ही गुंतवणूक केवळ रयत शेतकरीच करतील असे नाही, तर वकील, डॉक्टर, व्यापारी यांसारख्या बिगर शेती व्यवसायांतील धनिकांनाही शेतजमीन खरेदी करण्याबाबत प्रोत्साहन मिळून त्या माध्यमातूनही शेतीमधील गुंतवणुकीचे प्रमाण उंचावेल, असे रानडे यांचे या संदर्भातील विश्लेषण होते.

रानडे यांच्या प्रतिपादनानुसार, ''काटकसरीने जगणारी रयत शेतीमधील आपले स्थान कायम राखील. केवळ इतकेच नाही तर, हळूहळू आपल्या शेतीचा विस्तार घडवून आणत आपल्या राहणीमानाचे मानही ती उंचावेल. उलटपक्षी, सुस्त आणि शेतीधंद्याबाबत फारशी आस्था नसलेल्या शेतकऱ्यांची जागा या व्यवसायात रस असणारे लोक घेतील. यांमुळे सर्वसाधारण कल्याणात भरच पडेल... साहजिकच कालांतराने, शेतीची मालकी त्यांतील मितव्ययी आणि दूरदृष्टी असणाऱ्यांकडे जाऊन त्यांतूनच जमीनदारांचा एक वर्ग उभ्या देशात सर्वत्रच उदयास येईल. जमिनीच्या ठायी वसणारी उत्पादनक्षमता आणि सरकारने केलेली मोठी सार्वजनिक बांधकामे यांच्या माध्यमातून स्वत:चा उत्कर्ष साधणे हेच या वर्गाचे ईप्सित असेल. पैसाअडका पदरी बाळगून असणाऱ्या धनिकवर्गास आजमितीस शेतीमध्ये काहीच रस नसल्याने जमीनदार बनून जमीनदारांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या निभावण्याबाबत हा वर्ग सध्या उदासीनच दिसतो. मुळात असा वर्गच अस्तित्वात नसल्याने प्रगतीस सर्वच दिशांनी लगाम बसतो आहे. या बाबतीत बंगाल इलाखा मात्र उर्वरित भारताच्या तुलनेत उजवा दिसतो. देशातील अन्य प्रांतांपेक्षा बंगाल प्रांतातील चित्र अधिक समृद्ध आणि प्रागतिक दिसण्यामागेही हेच एकमात्र कारण आहे.'' जमीनदारांकडील जमिनीचा जो हिस्सा कसण्यासाठी कुळांकडे वर्षानुवर्षे सुपूर्त केलेला होता त्यापैकी जेवढ्या क्षेत्रावर विधेयकातील संबंधित तरतुदींनुसार त्या कुळांना संरक्षित कुळांचा दर्जा प्रदान करावयाचा त्या व तेवढ्याच जमिनीवर भारताच्या पश्चिम भागांत तेव्हा प्रचलित असलेल्या रयतवारी पद्धतीबरहुकूम रयती कुळांची पद्धत लागू करावी आणि जमिनीचा उर्वरित भाग जमीनदारांना परत केला जावा, असा प्रस्ताव रानडे यांनी पुढे, जमीनदारांकडील जमिनींवर संरक्षित कुळांचा वर्ग निर्माण व्हावा यासाठी बंगाल कूळ कायद्यात सुधारणा करण्यासंदर्भातील विधेयकातील तरतुदींवर टिप्पणी करताना मांडला. रयतवारी व्यवस्था प्रचलित असणाऱ्या प्रांतांत अस्तित्वात असलेला शेतमालक शेतकऱ्यांचा वर्ग जमीनदारी प्रांतातही उदयास यावा, ही भूमिका मांडताना रानडे यांच्या मनात उपरोक्त कार्यकारणभाव होता.

रानडेच काय वेडरबर्न यांचेही प्रस्ताव सरकारने स्वीकारले नाहीतच. मात्र त्याचा एक परिणाम घडून आला. दर ३० वर्षांनी धाराबंदी करताना जमीन महसुलाच्या

स्तरांची फेरआकारणी करतेवेळी उच्चतम दरांची पातळी अंमळ कमी ठेवण्याचा सल्ला गव्हर्नर- जनरलांच्या मंत्रिपरिषदेने तत्कालीन मुंबई सरकारला दिला. ज्या ज्या सूचनांचा पुरस्कार रानड्यांनी केला होता त्यांच्या तुलनेत या सुधारणा तुटपुंज्याच होत्या. त्यातल्या त्यात समाधान इतकेच की निदान निम्मे अंतर तरी कापले गेले होते. जमीन महसुलाबाबतच्या या निवाड्याचे मुंबई तसेच बंगाल प्रांतातील शेतीवर घडून आलेले परिणाम बघण्यासाठी रानडे हयात नव्हते. बंगाल कूळ कायद्यातील संरक्षक तरतुदी अथवा जमीनदारांपाशी असलेल्या पैशाची परिणती शेतीमधील गुंतवणूक वाढण्यात घडून आली नाहीच. उलट, शेतमालाच्या बाजारभावांमध्ये वाढ घडून आल्याने किरकोळ खंडावर जगणाऱ्यांचा एक वर्गच पुढील अर्ध शतकात बंगालमध्ये उदयास आला. त्याचा परिणाम असा झाला की, कसण्यासाठी जमीन खंडाने घेतलेल्या मूळ खंडकऱ्याने पुन्हा त्या जमिनीतील एक तुकडा पोटखंडाने दुसऱ्या खंडकऱ्यास देण्यासारख्या प्रथेचा सुकाळ झाला. बंगाल जमीन महसूल आयोगाने १९४० च्या दशकात नोंदविल्याप्रमाणे, जमिनीचा मूळ मालक आणि मूळ खंडकरी कूळ यांच्यादरम्यान तब्बल ४० जमीन हक्कदार मध्यस्थ निर्माण झाल्याचे चित्रही काही प्रकरणांमध्ये दिसून येत होते. ग्रामीण भागांतील वाढती लोकसंख्या आणि शेतमालाच्या बाजारभावांची चढती कमान यांच्या बरोबरीने कुळांचा एक मोठाच वर्ग निर्माण होत होता. जमीनमालक आणि कुळांदरम्यानच्या अटी-शर्ती या पूर्णपणे जमीनमालकांच्या मर्जीवर अवलंबून असत. ही कुळे मूळ मालकास नियमाने खंड अदा करीत असत. जमीनमालक मात्र, हळूहळू कमी कमीच जमीन महसूल वास्तव रूपाने सरकारी तिजोरीत जमा करीत होता. सुबत्तेचे लेणे ल्यालेल्या उच्चवर्गीयांकडून शेतीमध्ये मात्र कोणत्याही स्वरूपाची गुंतवणूक घडून आली नाही. देशातील अन्य प्रांतांप्रमाणेच मुंबई आणि बंगाल या दोन इलाख्यांतील शेतीही खुरटलेली- खुंटलेलीच राहिली. परिणामी, शेतीमधून मिळणाऱ्या दरडोई उत्पन्नात घसरण चालूच राहिली. बंगाल प्रांतातील जमीनदारी व्यवस्थेतील सारापद्धती आणि मुंबई इलाख्यातील रयतवारी पद्धतीतील सारापद्धती यांच्यातील फरक काय तो इतकाच की, बंगालमधील मोठ्या जमीनदारांच्या गाठीशी असलेल्या महसूल वाढाव्यातून ज्येष्ठ-श्रेष्ठ तत्त्वचिंतक आणि कवी निपजले (रबींद्रनाथ ठाकूर हे त्याचे एक उदाहरण). तर शेती आणि उद्योगांच्या क्षेत्रांत सुधारणांचा आग्रह धरणाऱ्या महादेव गोविंद रानडे यांच्यासारख्या विचारवंताचा उदय होण्यास मुंबई इलाख्यातील सारापद्धती हा घटक पूरक ठरला.

जमीन महसुलाबाबत रानडे यांनी केलेले प्रतिपादन म्हणजे एकंदरच भारतीय आर्थिक विकासासंदर्भातील त्यांच्या विचारव्यूहाचा एक भाग होता, या वास्तवाचे विस्मरण आपण होऊ देता कामा नये. उद्योग तसेच शेतीसाठी पतपुरवठा, भागभांडवलाची उभारणी, औद्योगिक धोरणाबाबतची उचित भूमिका, रोजगारनिर्मिती तसेच शिक्षणासंदर्भातील धोरण अशा अनेकानेक पैलूंचा रानड्यांच्या आर्थिक विचारविश्वात समावेश होता. परंतु, रानड्यांनी पुरस्कृत केलेल्या यांपैकी एकाही गोष्टीची अंमलबजावणी मात्र झाली नाही, यांकडे चपळगावकरांनी प्रस्तुत ग्रंथात लक्ष वेधले आहे. शेतीविकासासंदर्भातील रानडे यांच्या भूमिकेचा वास्तवात काहीच परिणाम दिसून का आला नाही, याचा उलगडा यावरून होऊ शकेल.

औद्योगिक विकासासंदर्भातील रानडे यांची विचासरणी दूरगामी आणि त्यांच्या स्वयंप्रज्ञेची निदर्शक म्हटली पाहिजे. भारतीय शेतीमध्ये निर्माण होणाऱ्या कच्च्या मालावर इंग्लंडमध्ये प्रक्रिया करून तो तयार माल भारतीय बाजारपेठांत विकावयाचा, हे ब्रिटिशांचे प्रथमपासूनचे धोरण होते. त्याऐवजी, भारतात तयार होणाऱ्या कच्च्या मालावर इथेच प्रक्रिया करण्यास प्रोत्साहन देण्याचे धोरण अवलंबिले जावे, असा रानडे यांचा आग्रह होता. इंडोनेशियामध्ये डचांनी नेमक्या याच धोरणाचा अवलंब केला होता. यामुळे देशाच्या उत्पन्नात भर पडण्याबरोबरच अशा प्रक्रिया उद्योगांमध्ये रोजगार मिळालेल्या कामगारांची मिळकतही उंचावेल, हा रानडे यांचा या प्रतिपादनामागील दृष्टिकोन होता. रानड्यांच्या म्हणण्यानुसार, ''कर्जाऊ घेतलेल्या निधीतून, समजा, सरकारने रेल्वेमार्ग उभारणी वा पाटबंधाऱ्यांसारखी कामे हाती घेतली, अथवा अशा कामांना अनुदाने दिली, युरोपीय वसाहतवाल्यांना नाममात्र खंडाने डोगरउतारांवरील पडीक जमिनी हस्तांतरित करण्याचा निर्णय घेतला तर औद्योगिक विकास अन्य क्षेत्रांतही साकारण्याचा मार्ग प्रशस्त बनू शकेल. याबाबतचे पथदर्शी काम डच सरकारने जावामध्ये करून दाखविलेले आहे. अति स्वार्थ न जोपासता त्याच दिशेने सरकारने प्रयत्न केल्यास शेती, साखरप्रक्रिया, खाद्यतेलाच्या घाण्या, तंबाखूप्रक्रिया, रेशीमकिडेपालन यांसारख्या उद्योगक्षेत्रांमध्ये बरेच काही करता येण्याजोगे आहे. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली भारतासारख्या उष्णकटिबंधीय प्रदेशात यांसारखे उद्योग उभे राहणे अवघड ठरू नये.''

रेल्वेमार्गांच्या उभारणीत रस असलेल्या खासगी उद्योजकांनी केलेल्या गुंतवणुकीवर काही किमान परतावा देण्याची हमी पुरवून रेल्वेमार्गांच्या उभारणीतील गुंतवणुकीस प्रोत्साहन देण्याच्या सरकारच्या धोरणाचे रानडे यांनी स्वागतच केले. परंतु, त्याच

वेळी, खनिज संपत्तीने समृद्ध असलेल्या भागांमध्ये रेल्वेमार्गांची उभारणी होणे अगत्याचे आहे, यांकडेही त्यांनी आवर्जून लक्ष वेधले. लोखंड व पोलादनिर्मितीसारख्या उद्योगांच्या विकासास त्यामुळे चालना मिळू शकेल, अशी रानडे यांची भूमिका होती. किंबहुना, रेल्वेमार्गांचा विस्तार आणि लोखंड व पोलादासारख्या खनिज उद्योगांची उभारणी हातात हात घालून होणे हे भारतातील औद्योगिक विकासाच्या दृष्टीने सर्वाधिक उचित ठरेल, असे त्यांचे या संदर्भातील प्रतिपादन होते. लोखंड व पोलाद निर्मितीचे कारखाने हे काही किमान क्षमतेचे, आकारमानाचे असले पाहिजेत यांबाबत रानडे यांचा कटाक्ष होता. मद्रास येथे स्थापन होऊन अल्पावधीतच अयशस्वी ठरलेल्या लहान आकाराच्या, कमी उत्पादन क्षमतेच्या पोलादनिर्मिती कारखान्याचे उदाहरण ते आपल्या भूमिकेच्या पुष्ट्यर्थ देत असत. लोखंडे व पोलादनिर्मितीचे कारखाने काही किमान उत्पादन क्षमतेचे, अत्याधुनिक यंत्रतंत्रांनी युक्त असे असतील तरच रेल्वे तसेच अन्य उद्योगांना वाढत्या प्रमाणात आवश्यकता भासणाऱ्या नानाविध जिनसांचा पुरवठा करणे त्यांना शक्य बनेल ही भूमिका रानडे प्रकर्षाने मांडत राहिले. दक्षिण भारतातील लहानशा कारखान्याच्या अपयशाबाबत कॅप्टन टाउन्सेन्ड यांनी केलेल्या विश्लेषणाबाबत सहमती दर्शविताना रानडे म्हणतात, ‘‘केवळ अशुद्ध लोखंड तयार करण्याचे मर्यादित उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवणाऱ्या कोणत्याही नवीन उद्योगास ते (टाउन्सेन्ड) सावधगिरीचा इशारा देतात. लोखंड निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व प्रकारच्या यंत्रोपकरणांनी सुसज्ज अशा मोठ्या आकाराच्या व क्षमतेच्या काखान्याची उभारणी केली जावी, यांबाबत ते आग्रही असतात. पोलाद अथवा लोखंडाचे, लोखंडी गजांचे उत्पादन करणाऱ्या कोणत्याही प्रथम दर्जाच्या कारखान्यात अथवा फौड्रीमध्ये असल्याच पाहिजेत अशा लोखंड गाळण्यासाठी लागणाऱ्या नाना प्रकारच्या भट्ट्या, रोलिंग मिल्स, वाफेवर चालणारे हातोडे यांसारखी यंत्रसामग्री या कारखान्यांत असलीच पाहिजे, असा त्यांचा कटाक्ष असतो. अशा प्रकारचे लोखंडनिर्मितीचे कारखाने हे चांगलेच मोठे, अवाढव्य असणार, हाच याचा अर्थ. कारखाना स्थापन झाल्यानंतर प्रारंभीच्या प्रयोगांमध्ये जो कालावधी जाईल त्या पहिल्या काही वर्षांत कारखान्याच्या उभारणीसाठी गुंतविलेल्या भांडवलावर कोणत्याही प्रकारचा परतावा मिळण्याची अपेक्षाच धरता येत नसल्याने कोणताही भांडवलदार या उपक्रमात पाऊल घालण्यास धजावणार नाही. भांडवल गुंतविण्याबाबत इच्छुक गुंतवणुकदारास प्रेरणा देण्यासाठी एकतर सवलती तरी चांगल्या घसघशीत असावयास हव्यात किंवा रेल्वे कंपन्यांना ज्याप्रमाणे सरकारने अनुदानाची हमी दिली तशी हमी

तरी लोखंड कंपन्यांना दिली गेली पाहिजे. अनुदानाबाबतची अशी हमी मिळाल्यामुळेच तर रेल्वेमार्गांसाठी भांडवल उभारणी करणे संबंधित कंपन्यांना शक्य बनले होते.'' ब्लॅनफर्ड यांनी बीरभूम आयर्न वर्क्स या कारखान्याबाबत १८६० साली तयार केलेल्या अहवालाचा संदर्भ आपल्या या मुद्याच्या स्पष्टीकरणार्थ रानडे देतात. रानडे लिहितात, ''आजमितीस हा कारखाना अमळ तोट्यात चाललेला असला तरी, आहे त्याच्यापेक्षा अधिक भांडवल त्यात गुंतविले जाऊन उत्पादनाची मात्रा वाढविली तर उत्पादन खर्चात लक्षणीय कपात घडवून आणता येईल, हे ब्लॅनफर्ड यांच्या अहवालाने स्पष्ट केलेले आहे. तसेच, आयात करण्यात आलेल्या पोलादाच्या किंमतींपेक्षा या कारखान्यात तयार करण्यात आलेल्या पोलादाचा अंदाजित बाजारभाव कमी असेल; इतकेच केवळ नव्हे तर, ब्रिटनमध्ये उत्पादन करण्यात आलेल्या सर्वसाधारण पिग् आयर्नच्या तुलनेत या कारखान्यात तयार करण्यात आलेल्या लोखंडाचा दर्जाही वरचढ आहे, हेही त्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.''

भारताच्या औद्योगिक विकासाबाबतच्या धोरणात ब्रिटिश सरकारने या धर्तीवर बदल घडवून आणायला हवेत, असे रानडे यांचे मत होते. भारतासारख्या शेतीप्रधान, गरीब आणि मागास देशाला औद्योगिक विकास साध्य करून ब्रिटनशी बरोबरी करण्यासाठी खुल्या व्यापाराचे धोरण अवलंबणे परवडणार नाही, याकडे त्यांनी लक्ष वेधले. ब्रिटनमध्ये शतकभरापूर्वीच औद्योगिक क्रांती साकारली होती, हे वास्तव ते या संदर्भात अधोरेखित करतात. भारतासारख्या देशाच्या औद्योगिक विकासासाठी वेगळ्या प्रकारचेच धोरण असावयास हवे, हा रानडे यांच्या 'इंडियन पोलिटिकल इकॉनॉमी' नामक विख्यात प्रबंधातील प्रतिपादनाचा गाभा होता. स्मिथ, रिकार्डो आणि मिल यांनी केलेल्या विवेचनापेक्षा रानडे निराळेच आर्थिक विश्लेषण मांडू पाहत आहेत, अशी, त्यामुळे, अर्थशास्त्राच्या अनेक विद्यार्थ्यांची दिशाभूल झाली. ब्रिटनसारख्या आधुनिक व्यापारउद्योगांनी समृद्ध अर्थव्यवस्थेच्या स्पर्धेत बाजी मारून औद्योगिकदृष्ट्या विकसित समाजांच्या मांदियाळीत प्रवेश मिळवणे हे भारतासारख्या अविकसित आणि भिन्न सामाजिक संरचना असणाऱ्या देशास शक्य नाही, एवढेच रानडे यांचे प्रतिपादन होते. विकसित देशांबरोबर खुल्या स्पर्धेत उतरण्याच्या परिस्थितीत भारतासारख्या अर्थव्यवस्थेस आणून ठेवण्यासाठी अतिशय वेगळ्या धोरणदृष्टीची निकड आहे, हे रानडे यांच्या विवेचनाचे मध्यवर्ती सूत्र होते. रानड्यांच्या भूमिकेनुसार ''राष्ट्रीय गरजांच्या पूर्तीसाठी जेथे जेथे म्हणून व्यक्तिगत अथवा सहकारी तत्त्वावरील प्रयत्न प्रभावशाली ठरण्याची शक्यता कमी असते तेथे तेथे त्यासाठी राज्यसंस्था हा

एक महत्त्वाचा राष्ट्रीय घटकावयव ठरतो, हे वास्तव आताशा मान्य होऊ लागलेले आहे. केवळ शांतता आणि सुव्यवस्था निर्माण करण्याचेच तेवढे काम राज्यसंस्थेकडे सोपविण्याने व्यापक स्तरावरील सामाजिक ऐक्याद्वारे मिळू शकणाऱ्या अनेकानेक लाभांना समाज मुकतो. उदारमतवादी तसेच तांत्रिक शिक्षण, टपाल व तारखाते, रेल्वे तसेच कालव्यांच्या माध्यमातून होणारे दळणवळण, नवनवीन उद्योगव्यवहारांची पायाभरणी, जोखमीच्या उपक्रमांना विम्याचे संरक्षक कवच पुरविणे... यांसारखी विविध उपयुक्त कामे राज्यसंस्थाच पार पाडत असते. श्रेष्ठ दर्जाच्या अनुकूलता राज्यकर्त्यांना उपलब्ध असल्याने या कामांचे निर्वहन करण्याचे उत्तरदायित्व त्यांच्या खांद्यावर पडलेले आहे. पोलाद तसेच कोळसा खाणींचे क्षेत्र, कापूस आणि तंबाखूच्या लागवडीबाबतचे प्रयोग, चहा, कॉफी तसेच सिंकोनाच्या मळ्यांचा विकास... यांसारख्या दिशेने भारतातील राज्यसंस्थेने आजवर बरेच काही केलेले आहे हे खरेच. परंतु, याच साऱ्या क्षेत्रांमध्ये फ्रान्स, जर्मनीसह अन्य देशांमध्ये जेवढे काही साध्य केले गेलेले दिसते त्याच्या तुलनेत भारतातील प्रयत्न काहीच नाहीत, हे म्हटल्याखेरीज राहवत नाही. देशी उद्योगांना चालना देण्याच्या दृष्टीने आयात जिनसावर शुल्क आकारणीचे पाऊल सरकारला राजकीय हेतूंमुळे उचलावयाचे नसले तरी, नवनवीन उद्योगोपक्रमांची पायाभरणी करण्याचे काम मात्र सरकार अधिक पद्धतशीरपणे हाती घेऊ शकते. पतपुरवठा आणि आपल्याजवळील संघटनात्मक बळ यांच्या मुक्त उपयोजनाद्वारे उद्योगांच्या स्थापनेस पाठबळ व मार्गदर्शन पुरविणे अथवा सहकारी तत्त्वावरील खासगी उपक्रमांना अनुदान देणे आणि रेल्वे कंपन्यांना किमान व्याजपरताव्याची हमी देणे यांत तत्त्वश: काहीच फरक नाही.''

आर्थिक इतिहासाचे विख्यात अभ्यासक अलेक्झांडर गर्शन्क्रॉन यांचे १९७९ साली प्रकाशित झालेले 'इकॉनॉमिक बॅकवर्डनेस इन् हिस्टॉरिकल पर्स्पेक्टिव्ह' हे विलक्षण विचारप्रवर्तक पुस्तक अनेक वर्षांपूर्वी वाचत असताना रानडे आणि गर्शन्क्रॉन यांच्या भूमिकेतील ढोबळ साधर्म्य ध्यानात येऊन मी स्तिमितच झालो होतो. अर्थात, रानडे आणि गर्शन्क्रॉन यांच्या अभ्यासविषयांत फरक निश्चितच होता. औद्योगिक क्रांतीचे प्रणेते असणारे ब्रिटन आणि त्याच्या तुलनेत त्या काळात मागास असलेल्या युरोपचा औद्योगिक विकास हा गर्शन्क्रॉन यांच्या अध्ययनाचा प्रांत होता. हा अभ्यासही गर्शन्क्रॉन तो सारा घटनाक्रम उलटून गेल्यानंतर सुमारे १०० वर्षांनी करत होते. तर, तुलनेने मागास आणि परकीय सत्तेच्या राजकीय आधिपत्याखाली असलेल्या भारतासारख्या देशाचे ब्रिटनसारख्या प्रगत राष्ट्राशी

आर्थिक संबंध प्रस्थापित होतात त्या वेळी भारताच्या औद्योगिक विकासासाठी कोणत्या प्रकारची भूमिका असावयास हवी, यांबाबतचे विश्लेषण रानडे त्याच काळात करत होते, हे इथे आवर्जून ध्यानात घ्यावयास हवे. उभा युरोपही त्याच वेळी विकासाच्या मार्गावर वाटचाल करत होता, ही बाबही लक्षात ठेवणे अगत्याचे ठरते. फ्रान्स, जर्मनी, रशिया आणि अन्य युरोपीय देशांच्या विकासानुभवाचे विश्लेषण केल्यानंतर गर्शन्‌क्रॉन लिहितात, ''ब्रिटनने पूर्वीच अंगीकारलेल्या पंथाने वाटचाल करण्यास जर्मनीने १९ व्या शतकाच्या मध्यापासून प्रारंभ केला तो थेट त्या शतकाच्या अंतापर्यंत. परंतु, अशा प्रकारचे साधारणीकरण स्वीकारण्यापूर्वी अंमळ सावधगिरीच बाळगावयास हवी. कारण, या प्रतिपादनात जे अर्धसत्य सामावलेले आहे त्यामुळे सत्याच्या उर्वरित अर्ध्यांशावर आवरण घातले जाते. मागास देशाची विकासप्रक्रिया त्या देशाच्या मागासलेपणापायीच प्रगत देशाच्या विकासप्रक्रियेपेक्षा मूलभूतरीत्या वेगळी असू शकते, हे ते उरलेले अर्धसत्य.''

गर्शन्‌क्रॉन याच्या निरीक्षणानुसार, ''परकीय यंत्रसामुग्रीच्या आणि तंत्रज्ञानाच्या आयातीच्या शक्यता आणि त्यांद्वारे कालांतराने प्रशस्त बनणाऱ्या वेगवान औद्योगिकीकरणाच्या संधींपायी विकसित अर्थव्यवस्था आणि मागास अर्थव्यवस्थांमधील आर्थिक क्षमता व वास्तव यांच्यातील दरी वाढत्या प्रमाणात रुंदावतच गेली.'' ''जमिनीशी जोडलेली नाळ कापली गेलेली असल्यामुळे कारखान्यांमध्ये जिचा उपयोग सुलभपणे करता येणे शक्य आहे अशा स्थिर, भरवशाच्या आणि शिस्तबद्ध औद्योगिक श्रमशक्तीचा'' मागास अर्थव्यवस्थांमध्ये अभावच आढळून येतो. १९व्या शतकाच्या मध्यास युरोपमध्ये अशा प्रकारची श्रमशक्ती उपलब्धच नव्हती (भारतामध्ये अशा श्रमशक्तीचा अधिक दीर्घकाळापासून अभावच असल्याचे गर्शन्‌क्रॉन नोंदवितात).

अत्याधुनिक स्वरूपाची आयात यंत्रसामुग्री आणि विशाल आकाराची यंत्रे तंत्रज्ञान यांचा उत्पादनप्रक्रियेत उपयोग अपरिहार्य ठरल्यामुळे अशी यंत्रसामुग्री निर्माण करणारी कारखानदारीही त्यातूनच उदयास आली. या पर्यायात तज्ज्ञ, प्रशिक्षित मनुष्यबळाची आवश्यकता किमान होती. साहजिकच, लोखंडाच्या व पोलादाच्या अत्याधुनिक कारखान्यांची उभारणी जर्मनी आणि युरोपात घडून आली. रशियातही अंतिमत: हेच घडले. त्या देशांतील कापडनिर्मितीचा उद्योग मात्र पिछाडीवर पडला. हे सारे बघितले की, भारतातील राज्यसंस्थेकडून रानडे ज्या भूमिकेची अपेक्षा करीत होते तिचेच आपल्याला या ठिकाणी नेमके स्मरण होते.

या संदर्भात गर्शन्‌क्रॉन यांनी केलेले विवेचन उदबोधक ठरते. ते लिहितात, ''औद्योगिकीकरणाची चळवळ अर्थव्यवहारांच्या विविध आघाड्यांवर एक-

समयावच्छेदेकरून व्यापक स्वरूपात आकार धारण करू लागली तरच औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेस प्रारंभ होणे शक्य बनते. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत अंतर्भूत असलेल्या विविध घटकांची परस्परपूरकता आणि या प्रक्रियेची समग्रता यांची ती सहज परिणती असते. कोळशाच्या खाणींचा विकास समांतर पद्धतीने घडून आल्याखेरीज रेल्वेमार्गांची निर्मिती हाती घेणे शक्यच होत नसते. देशाच्या अंतर्गत बसलेले एखादे शहर बंदराशी जोडावयाचे असेल तर निम्म्याशिम्म्या अंतरापर्यंतच रेल्वेमार्ग तयार होऊन भागणार नाही. अर्थव्यवस्थेच्या काही क्षेत्रांत झालेल्या औद्योगिक विकासामुळे अन्य दिशांनी होऊ घातलेल्या औद्योगिक विकासविस्तारास हातभार लागतो. तर या नवदिशांनी विस्तारलेल्या औद्योगिकी-करणाद्वारे पूर्वीच कार्यरत बनलेल्या उद्योगांच्या पुढील विस्तारास चालना मिळते. औद्योगिकीकरणाचा एकंदरीने होणारा हा विस्तार अशा परस्परपोषक परिव्यय-ऱ्हासक अनुकूलतांवर अवलंबून असतो. युरोपचा १९ व्या शतकातील आर्थिक इतिहास पाहिला तर एक बाब मनावर ठसते. औद्योगिकीकरणापूर्वीची युरोपची स्थिती आणि औद्योगिक विकासाची दिसू लागलेली संभाव्य गोमटी फळे यांच्यातील ताण पुरेसा तीव्र बनल्यानंतरच औद्योगिक प्रगती साकारणाऱ्या शक्ती कार्यरत बनल्या. औद्योगिक विकास-विस्तारातल्या मार्गावरील सर्व अडथळे दूर झाले. विकास-प्रक्रियेतील परस्परपूरकता, विकासप्रक्रियेची समग्रता, परिव्ययऱ्हासक अनुकूलता यांसारख्या आर्थिक संकल्पना - शब्दसंहतींशी रानड्यांचा परिचय नसला तरी भारताच्या विकासासाठी रानडे ज्या भूमिकेचा पुरस्कार करत होते तिची दिशा नेमकी हीच होती, हे सहज ध्यानात येते.

औद्योगिकीकरणाच्या या प्रक्रियेस आवश्यक आणि साहाय्यभूत ठरणाऱ्या अन्य दोन संस्थात्मक बाबींचा विचारही इथे करणे अगत्याचे ठरते. वित्तपुरवठा ही त्यांतील पहिली तर, राज्यसंस्थेची भूमिका ही झाली त्यांतील दुसरी बाब. औद्योगिकीकरणास पूरक ठरणाऱ्या ज्या वित्तसंस्थांचा विकास प्रथम फ्रान्स, नंतर जर्मनी आणि पुढे मध्य युरोपात घडून आला त्या संस्थांचे स्वरूप ब्रिटनमधील बँकांपेक्षा मूलभूतरीत्या वेगळेच होते. 'क्रेडिट मोबिलर' या फ्रान्समधील तर, जर्मनीतील 'पेराए र बँके'चा निर्देश या संदर्भात करता येईल. उद्योगांना आवश्यकता भासणारे दीर्घ मुदतीचे अर्थसाहाय्य पुरविण्याबरोबरच उद्योगांच्या संघटनात्मक रचनेतही या संस्थांनी भाग घेतला. तुलनेने अधिकच मागास असलेल्या झारशाहीतील रशियात तर तेथील अशा संस्थांनी उद्योगांचे संघटन घडवून आणण्याबरोबरच उद्योगांच्या निर्मिती

स्थापनेसाठी निधी उभारण्याचेही कार्य निभावून नेले. या संदर्भात गर्शन्क्रॉन लिहितात, ''रेल्वेमार्गांच्या उभारणीचे जे काम सरकारने हाती घेतले होते त्यात १८ व्या शतकाच्या मध्यापासून अभूतपूर्व वाढ घडून आली आणि त्यातून औद्योगिक विकास विस्ताराची जणू लाटच प्रसवली. रेल्वेमार्गाची उभारणी हा सरकारने आखलेल्या वेगवान औद्योगिकीकरणाच्या धोरणाचा मुख्य शक्तिस्रोत बनला. रेल्वेमार्गांच्या उभारणीसाठी आवश्यक असणाऱ्या नानाविध जिनसांची निर्मिती व पुरवठ्यासाठी देशी उत्पादकांना प्राधान्य देणे, पुरवठादारांना आकर्षक वाटेल असे बाजारमूल्य अदा करणे, नाना प्रकारची अनुदाने, वित्तपुरवठ्याच्या सुविधा, नवीन उद्योगांच्या उभारणीमध्ये गुंतवणुकदारांनी केलेल्या भांडवली गुंतवणुकीवर किमान परताव्याची हमी... अशा अनेकानेक उपायांद्वारे आर्थिक - औद्योगिक वाढीचा वेग शतक उलटून जाईपर्यंत सातत्याने वाढता ठेवण्यास सरकारला यश आले. या औद्योगिकीकरणासाठी भांडवलाचा पुरवठा अव्याहत राखण्याच्या दृष्टीने 'सरकार' नामक संस्थेची निकड होतीच. उत्पन्नाचा विनियोग उपभोगाकडून गुंतवणुकीकडे वळविण्यासाठी सरकारने उपयोजिलेली उचित आणि पूरक अशी करविषयक धोरणे या बाबतीत उपयुक्त ठरली.''

एका अतिशय मागास अर्थव्यवस्थेबाबत आपण लेखन-चिंतन करीत आहोत, याचे रानडे यांना पुरेपूर भान होते. त्या काळातील सर्वाधिक प्रगत आणि सामर्थ्यवान अर्थव्यवस्थेच्या राजकीय अधिसत्तेचा अंमल त्या मागास अर्थव्यवस्थेवर होता. भारतीय अर्थव्यवस्थेच्या आर्थिक-औद्योगिक विकासामध्ये सरकारने अधिक व्यापक भूमिका बजावावयास हवी, अशी त्यांची इच्छा होती. मात्र, तत्कालीन परिस्थितीच्या चौकटीत, किमानपक्षी, शेती आणि उद्योगांना वित्तपुरवठा करण्याबाबत बँकांनी प्राधान्य द्यावे यांसाठी सरकारने आपल्या व्यापक प्रशासकीय यंत्रणेचा आणि सत्तेचा वापर करून उचित अशी सुरक्षा चौकट बँकांना पुरविली पाहिजे, अशा रानडे यांची सूचना होती. शासनयंत्रणा हीच तत्कालीन भारतातील सर्वांत शक्तिशाली आणि सर्वांत मोठी भांडवलदार होती, हे रानडे यांना उमजलेले होते.

भारतीय अर्थव्यवस्था तसेच भारतीय समाजाबाबतचे रानडे यांचे आकलन आणि यूरोपातील प्रचलित घडामोडींसंदर्भातील त्यांचे वाचन यांचे अधिष्ठान लाभलेले रानडे यांचे हे सारे विवचन - विश्लेषण खचितच त्यांचा वेगळा ठसा उमटवणारे असे आहे. विशेषत:, १९ व्या शतकात युरोपमध्ये घडून आलेल्या आर्थिक विकासाच्या पार्श्वपटावर तर ते अधिकच लक्षणीय वाटते.

'सार्वजनिक सभेचे त्रैमासिक' या रानड्यांनीच १८७०च्या दशकात सुरू केलेल्या नियतकालिकाचा निर्देश समारोपाकडे वळण्याआधी केलाच पाहिजे. हे त्रैमासिक खरोखरच अनोखे होते. या त्रैमासिकात प्रकाशित झालेल्या अनेक लेखांचे संदर्भ न्यायमूर्ती चपळगावकरांनी प्रस्तुत ग्रंथात दिलेले आढळतील. दख्खन प्रांतातील जागोजागच्या दुष्काळाचे या त्रैमासिकात प्रकाशित झालेले अहवाल, माझ्या मते, खरोखरच अद्वितीय म्हणावयास हवेत. रानड्यांच्या मार्गदर्शनाखाली हे अहवाल तयार होत असत. या कामी रानडे यांना सक्रिय सहकार्य लाभले ते त्यांचे सहकारी गणेश व्यंकटेश जोशी यांचे. हे अहवाल म्हणजे अनुभवनिष्ठ अशा निकोप आर्थिक शोधन– संशोधनाचा भारतातील प्रारंभ होय, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

एक समाज म्हणून, एक देश म्हणून ज्या काही आर्थिक तसेच सामाजिक बाबी या तीन लोकोत्तर तेजोराशींना भारताच्या दृष्टीने जिव्हाळ्याच्या, महत्त्वाच्या वाटत होत्या त्या व्यवहारात उतरणे हे परकीय सत्तेच्या अंमलाखाली शक्य नाही, याची त्यांनाही जाण होती हे न्यायमूर्ती चपळगावकरांनी प्रस्तुत ग्रंथात दाखवून दिले आहेच. परंतु म्हणून, अशा बाबींची सार्वजनिक चिकित्सा करून त्यांबाबतच्या सुधारणांचा पुरस्कार करण्यापासून मात्र तिघेही मागे सरले नाहीत. 'खाईन तर तुपाशी, नाही तर उपाशी', अशी भूमिका या तिघांचीही कधीच नव्हती. त्या बाबतीत हे तिघेही सुज्ञ उदारमतवादी होते. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात ओडिशामध्ये होऊन गेलेल्या पंडित गोपबंधू दास या विख्यात राष्ट्रवादी धुरीणाचे या संदर्भात मला स्मरण होते. 'रडा, हट्ट जरूर करा, मात्र पदरात जे काही पडेल ते मुठीत घट्ट धरून ठेवा, अजिबात सोडू नका,' असे गोपबंधूंचे आवर्जून सांगणे असे. या तिघांचीही भूमिका, एका अर्थाने, अशीच होती. भारतासारख्या एका पारंपरिक, कर्मकांडबद्ध, अविकसित अर्थव्यवस्थेचे, समाजाचे रूपांतरण लोकशाहीप्रधान मानवतापूर्ण राजकीय आणि सामाजिक व्यवस्थेमध्ये घडवून आणण्यासाठी बहुआयामी प्रयत्नांची निकड आहे, हे या तिघांनाही पुरते उमगलेले होते. केवळ राजकीय स्वातंत्र्य आणि सत्तेसाठी झगडणे पुरेसे ठरणार नव्हते. सामाजिक जीवनाच्या अन्य क्षेत्रांत परिवर्तन घडवून आणण्यासाठी, आजच्या परिभाषेत आपण ज्यांना 'नागरी समाज संस्था' (सिव्हिक सोसायटी ऑर्गनायझेशन्स) असे संबोधतो, अशा संस्थांनी त्यांच्या त्यांच्या कार्यक्षेत्रात सक्रिय बनणे अगत्याचे होते. अशा प्रकारच्या संस्थांची निर्मिती करण्याबरोबरच अस्तित्वात असलेल्या संस्था कार्यरत ठेवण्यासाठी या तिघांनीही प्रयत्नांची पराकाष्ठा केली. १९व्या शतकात या देशामध्ये साकारलेल्या सामाजिक आणि बौद्धिक मंथनादरम्यान

या तीन उत्तुंग लोकाग्रणींनी आणि त्यांच्या अन्य सहचरांनी समाजजीवनाच्या विविध क्षेत्रांत जो संघर्ष केला, जे संघटन उभे केले, ज्या ज्या गोष्टींचा पुरस्कार केला त्याच्यामुळेच भारतीय समाजाला त्याचे आजचे रूप-स्वरूप प्राप्त झालेले आहे, असे म्हणणे अयथार्थ ठरणार नाही. काही काही सामाजिक बाबींसदर्भात अलीकडच्या काळात, प्रतिगामित्वाच्या काही खुणा दृष्टोत्पत्तीस येत असल्याबाबतचे जे निर्देश न्यायमूर्ती चपळगावकर यांनी प्रस्तुत ग्रंथाच्या अखेरीस नमूद केलेले आहेत त्यांचे अस्तित्व मान्य करूनही असे म्हटल्याखेरीज राहवत नाही. या लोकोत्तर व्यक्तिमत्त्वांनी त्यांच्या काळात प्रवर्तित केलेल्या विविध उपक्रमांना तत्कालीन समाजमानसाने प्रतिसाद दिला. तेव्हाचे समाजमानस आजच्याइतके प्रगल्भ आणि प्रागतिकही नव्हते. तरीही या लोकाग्रणींनी केलेले वैचारिक आवाहन या वेळच्या समाजपुरुषाला भावले. मग आमच्या आजच्या समाजजीवनात मात्र प्रतिगामी प्रवृत्तींची पावले का उमटलेली दिसतात, अनेकानेक सामाजिक बाबतींत प्रागतिक विचारसरणीचा अंगीकार करण्याऐवजी आमचा प्रवास उलट्या दिशेनेच का चालू होतो, यांबाबत सर्वच विवेकशील नागरिकांनी अंतर्मुख होऊन विचार करण्याची आज गरज भासते. एक समाज म्हणून सर्वसमावेशक प्रगतीच्या पथावरून आपल्याला मार्गक्रमण करावयाचे असेल तर असा विचार करण्यावाचून आपल्याला अन्य पर्याय नाही.

# पुरवणी

# मध्यम उत्पन्नाच्या सापळ्यात अडकलेली भारतीय अर्थव्यवस्था

■ **डॉ. रूपा रेगे–नित्सुरे**

भारताच्या आर्थिक परिस्थितीबाबतचा सध्याचा मूड अतिशय सकारात्मक व आशादायी आहे. त्यामागे काही ठोस कारणे देखील आहेत. 'कोविडो'त्तर काळात ७%–अधिक या गतीने (व सातत्याने) झालेली आर्थिक वाढ, रिझर्व्ह बँकेने यशस्वीपणे काबूत ठेवलेली महागाई, पायाभूत सुविधांवरील भांडवली खर्च वाढवूनही केंद्रीय सरकारने नियंत्रणात ठेवलेली राजकोषीय तूट, कमी झालेले विदेशी ऋण व सुदृढ विदेशी चलन निधी (foreign exchange reserves), कंपन्या व बँकांचे सुधारलेले ताळेबंद – अशी अनेक कारणे देता येतील. आजमितीला चेन्नई, बंगरूळू इत्यादी शहरांतून जोमाने वाढणारी नविनतम उत्पादनांची (Startup) परिसंस्था (Ecosystem) ही जागतिक पातळीवरील उत्पादन–व्यवस्थेचा भाग बनत चालली आहे. भारताच्या 'जिडीपी'मध्ये सर्वाधिक हिस्सा असलेले सेवाक्षेत्र आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने बटवडा (delivery), पोच (reach) व स्पर्धात्मकता यांत झपाट्याने सुधारणा घडवून आणत आहे. गेल्या एक–दोन दशकांत आपला देश मुख्यत्वे माहिती–तंत्रज्ञान व त्यांच्याशी संबंधित इतर सेवांची निर्यात करत होता. पण गेल्या काही वर्षांत इतर व्यावसायिक सेवांची– जसे की उद्योग–विकास, रिसर्च व डेव्हलपमेंट (R&D), व्यावसायिक व्यवस्थापन, लेखाशास्त्र सेवा, कायदेविषयक सेवा – अशा अनेक सेवांची निर्यात करून उत्तमपैकी विदेशी चलन मिळवत आहे. आपल्या देशाने कमाविलेल्या आर्थिक व वित्तीय स्थैर्यामुळे तसेच देशी म्युचुअल फंडांमधील सातत्याने वाढणाऱ्या गुंतवणुकीमुळे भारतातील भांडवली बाजारदेखील, इतर उदयोन्मुख देशांमधील भांडवली बाजारांपेक्षा अधिक चांगला परतावा देत आहेत. साहजिकच या पार्श्वभूमीवर, भारताच्या आर्थिक प्रगतीसबंधीच्या अपेक्षा वाढू लागल्या आहेत. भारताच्या पंतप्रधानांचा असा मानस आहे की २०४७

सालापर्यंत भारताला विकसित देशांच्या मांदियाळीत नेऊन बसवायचे. त्याकरता भारताचा जिडीपी सध्याच्या ३.४ लाख कोटींपासून, ३० लाख कोटींएव्हढा २०४७ सालापर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. यासाठी भारताचे वार्षिक दरडोई उत्पन्न पाच पटीने (सध्याच्या २,६०० रुपयांपासून १०,२०५ रुपयांपर्यंत) वाढवावे लागेल. तसेच आर्थिक वाढीचा दर प्रतिवर्ष ९% एव्हढा पुढील २५ वर्षे ठेवावा लागेल.

मात्र जागतिक बँकेच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार (World Development Report 2024), भारतीय अर्थव्यवस्था ''मध्यम उत्पन्नाच्या सापळ्यात'' अडकली गेली आहे. जागतिक बँकेने ''मध्यम उत्पन्ना''ची व्याप्ती वार्षिक दरडोई उत्पन्न '१,१३६ ते १३,८४५' अशी निश्चित केली आहे. भारताचे सध्याचे वार्षिक दरडोई उत्पन्न २,६०० रुपये एव्हढे असल्यामुळे भारत खरंतर ''मध्यम उत्पन्न'' गटातही खालच्या पातळीवर आहे. अर्थात जागतिक बँकेने हे भाकीत फक्त भारतापुरते केले नसून, मध्यम उत्पन्न असलेल्या सर्वच देशांसाठी (एकूण १०८ देश) केले आहे.

जागतिक बँकेच्या विश्लेषणानुसार, 'मध्यम उत्पन्न' असलेल्या देशांना दीर्घ काळासाठी आर्थिक वाढीचे उच्च दर टिकवून ठेवता येत नाहीत. आर्थिक वाढीचे उच्च दर गाठण्यासाठी हे देश मोठ्या प्रमाणात 'गुंतवणूक' वाढवितात पण ते पुरेसे नसते. एका टप्प्यानंतर 'उत्पादनक्षमता' पण झपाट्याने वाढावी लागते व त्याकरता आधुनिक तंत्रज्ञानाची गरज असते. बहुतेक वेळा हे आधुनिक तंत्रज्ञान इतर विकसित देशांकडून आयात केले जाते वा क्वचितप्रसंगी देशांतर्गत नवप्रवर्तनाद्वारे (innovation) निर्माण केले जाते. पण ही प्रक्रिया 'गुंतवणूक' वाढविण्याइतकी सहज नसते. गुंतवणूक वाढविल्यामुळे एखादा ''कमी उत्पन्ना''चा देश एकवेळ ''मध्यम उत्पन्ना''चा देश बनू शकेल पण ''उच्च उत्पन्ना''चा देश बनण्यासाठी, नुसती गुंतवणूक वाढविणे पुरेसे नाही.

जागतिक बँकेच्या अहवालानुसार, या शतकातील पहिल्या वीस वर्षांत ''मध्यम उत्पन्न'' असलेल्या देशांच्या आर्थिक वाढीचा वार्षिक सरासरी दर हा ५% वरून ३.५% वर घसरलेला आहे. आणि आतातर या देशांपुढे कितीतरी नवीन आव्हाने उभी ठाकली आहेत जशी की भूराजनीतीचे ताणतणाव (geopolitical tensions), जागतिक अर्थव्यवस्थेचे विखंडन (fragmentation of the world economy), 'कोव्हिड' महामारीनंतर वाढलेल्या ऋणाचा बोजा तसेच हवामान बदलामुळे निर्माण झालेले नवीन धोके- इत्यादी.

तसंही बघायला गेलं तर सातत्याने २५ वर्षांकरता ७% हून अधिक अशा वार्षिक दराने फार कमी देशांची आर्थिक वाढ झालेली आहे. मायकल स्पेन्स यांच्या अभ्यासानुसार जगातील फक्त १३ देश हे साधू शकले व त्यापैकी जवळजवळ अर्धे

देश हे लहान देश होते. तसंच ज्या अर्थव्यवस्था अशा पद्धतीने वाढल्या व विकसित झाल्या त्यांना दुसऱ्या महायुद्धानंतरचे अधिक खुले व आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी अनुकूल असे वातावरण लाभले होते. जागतिक बँकेच्या अहवालानुसार सध्याच्या जागतिक परिस्थितीत कुठल्याही देशाला असा विकास साधणे निव्वळ अशक्य आहे. दक्षिण कोरियासारख्या देशाला जे २५ वर्षांत साधले (म्हणजे 'मध्यम'पासून 'उच्च उत्पन्न' गटात दाखल होणे), ते आता कुठल्याही मध्यम उत्पन्न गटातील देशाला ५० वर्षांतही जमणे कठीण आहे.

थोडक्यात भारताची देशांतर्गत परिस्थिती कितीही सुधारली, आवश्यक त्या आर्थिक सुधारणा घडवून आणण्यात (समजा) जरी आपण यशस्वी झालो तरीही येणाऱ्या २५ वर्षांत भारताचे ''मध्यम उत्पन्ना''पासून ते ''उच्च उत्पन्ना''पर्यंतचे अवस्थांतर निव्वळ अशक्य आहे, असे जागतिक बँकेचा अहवाल सांगतो.

हे झाले बहिस्थ: (external) क्षेत्रातून येणाऱ्या आव्हानांबद्दल. पण प्रश्न असा आहे की आपली जी देशांतर्गत आर्थिक धोरणे आहेत त्यांची दिशा व आवाका तरी योग्य व पुरेसा आहे का? आपल्या आर्थिक धोरणांत, येणाऱ्या २५ वर्षांमध्ये भारताला विकसित बनविण्याचे सामर्थ्य आहे का?

जागतिक बँकेच्या सल्ल्याप्रमाणे मध्यम उत्पन्नाच्या सापळ्यातून बाहेर येण्याकरता, भारतासारख्या देशाने पहिल्या टप्प्यात अर्थव्यवस्थेतील गुंतवणूक वाढविली पाहिजे, मग या गुंतवणूकीतून जास्तीत जास्त परतावा मिळविण्यासाठी आवश्यक असे तंत्रज्ञान परदेशातून आयात करून ते योग्य प्रकारे रुजविले पाहिजे व तिसऱ्या टप्प्यात, 'वाढविलेली गुंतवणूक', 'परदेशातून आयात केलेले तंत्रज्ञान' व 'देशात निर्माण झालेले नवप्रवर्तन' (innovation) या तीन महत्त्वाच्या बाबींत योग्य तो समन्वय साधला पाहिजे.

सर्वप्रथम आपण भारताचे ऋण किती आहे ते बघू. आजमितीला भारताच्या एकूण ऋणाचा 'जिडीपी'मधील हिस्सा ८३-८४% एवढा वाढलेला आहे. त्यामुळे सरकारी उत्पन्नाचा खूप मोठा भाग या ऋणावरील व्याज फेडण्यात खर्ची पडतो. साहजिकच तुलनेने कमी वित्त सरकारपाशी गुंतवणूक करण्यासाठी शिल्लक रहाते. पैसे उभारण्यासाठी सरकारला सतत कर वाढवावे लागतात. ऋण व्यवस्थापनासाठी अजून कर्जे काढावी लागतात. यामुळे व्याजाचे दर उंचावलेले राहतात. कर व व्याजाच्या बोज्यामुळे, खाजगी क्षेत्राकडून केली जाणारी गुंतवणूकदेखील मंदावत जाते. याचा दुष्परिणाम रोजगार निर्मितीवर तसेच मागणीवर होतो. पर्यायाने गेली अनेक वर्षे भारताचे वार्षिक दरडोई उत्पन्न रुपये १००० ते ३६०० या श्रेणीत अडकून पडले आहे. त्यात भारतात

इतकी पराकोटीची विषमता आहे की या देशाच्या अर्थव्यवस्थेची वाढ ही प्रामुख्याने एक कोटी लोकांनी केलेल्या मागणीवर (भारताची एकूण लोकसंख्या १४२ कोटी असताना) आधारित आहे, असे अनुभवजन्य संशोधन दाखवून देते.

जे देश मध्यम उत्पन्नाच्या सापळ्यातून बाहेर पडू शकले, त्यांनी तंत्रज्ञानाचा प्रसार तसेच भांडवली खर्चाची उत्पादनक्षमता वाढविणे याकडे विशेष लक्ष पुरविले. त्यासाठी 'संशोधन व विकास' (Research Development; R&D) यांवर भर दिला. भारत मात्र याबाबतीत चांगलाच मागे पडलेला दिसतो. जागतिक बँकेच्या सांख्यिकीनुसार, भारताचा 'संशोधन व विकास' यांवरील खर्च 'जिडीपी'च्या तुलनेत फक्त ०.६५% एवढा आहे; तर, तैवानचा ३.६%, दक्षिण कोरियाचा ४.८% व चीनचा २.४% एवढा आहे. अगदी ब्राझिलसारख्या देशासाठी पण हे गुणोत्तर १.२% एवढे आहे. त्यात भारतामध्ये 'संशोधन व विकास' यांवर मुख्यत्वे केंद्रीय सरकारच खर्च करत असते आणि तेही अत्यंत मर्यादित क्षेत्रांवर– जसे की संरक्षण व सुरक्षा, अंतरिक्षाचा अभ्यास, आण्विक अभ्यास, कृषी क्षेत्र व अकादमीक संस्था– इत्यादी. भारतातील राज्य सरकारे तसेच खाजगी क्षेत्र 'संशोधन व विकासा'च्या बाबतीत कमालीची उदासीन राहिली आहेत. भारतातील अनेक वर्षे चालू असलेले 'आयात पर्यायना'चे (import substitution) धोरण व त्यामुळे कमी झालेली स्पर्धात्मकता हे यामागचे प्रमुख कारण असावे. ज्या कंपन्यांना जागतिक बाजारपेठेत टिकाव धरायचा आहे, जागतिक पुरवठा साखळीचा (global supply chain) भाग बनायचे आहे त्या आपसूक 'संशोधन व विकासा'वर खर्च करण्याकरता उत्सुक असतात, जसे अनेक जपानी किंवा कोरियन कंपन्यांनी केले. भारताच्या माहिती–तंत्रज्ञानाच्या क्षेत्राने जरी जागतिक अर्थव्यवस्थेत आपला ठसा उमटविला असला तरीही हे क्षेत्र प्रामुख्याने 'व्यवसाय सेवा' वर्गात (business service segment) मोडते, जिथे 'संशोधन व विकासा' वरील खर्चाचे विशेष फायदे नसतात.

थोडक्यात काय तर भारतीय उद्योगक्षेत्रात नांदणाऱ्या अल्पजन मक्तेदारीमुळे (oligopoly) तसेच आयात पर्यायन किंवा आत्मनिर्भरतेसारख्या धोरणांमुळे भारतीय उद्योगांना 'संशोधन व विकासा'वर खर्च करण्याची पुरेशी प्रेरणा मिळत नाही, हे स्पष्टपणे दिसून आले आहे.

भारतातील दुसरी महत्त्वाची समस्या ही की आपण उत्तम दर्जाची रोजगार–निर्मिती करण्यात कमी पडलो आहोत. याचा विपरीत परिणाम अनेक उद्योग व सेवा यांच्या उत्पादनक्षमतेवर तर झाला आहेच पण यामुळे देशातील आर्थिक असमानता पण प्रचंड वाढलेली आहे. ज्या पूर्व आशियाई देशांनी झपाट्याने आर्थिक प्रगती

साधली त्यांच्या आर्थिक सुधारणांचा मुख्य भर हा ‘सार्वत्रिक शिक्षण’ (universal education) व ‘प्राथमिक आरोग्यसेवा’ (primary health care) यांवर राहिलेला होता. त्यांच्या आर्थिक प्रगतीचे ‘मॉडेल’ हे ‘उत्पादक कल्याणकारी भांडवलशाही’ (productivist welfare capitalism) या नावाने ओळखले गेले. या ‘मॉडेल’मध्ये सार्वत्रिक शिक्षण व आरोग्यसेवा पुरविण्यात सरकारी क्षेत्राने महत्त्वाची भूमिका बजावली. या मॉडेलच्या आखणीमध्ये, शिक्षण व आरोग्य ही क्षेत्रे वगळता इतर प्रकारचे अर्थसाहाय्य वा अनुदाने तुलनेने कमी होती. या पूर्व आशियाई देशांनी आपल्या देशाच्या जनसांख्यिकीला लक्षात घेऊन हे ‘मॉडेल’ स्वीकारले होते. कारण त्या काळात या देशांमध्ये तरुण लोकांचे प्रमाण अधिक होते व आर्थिक प्रगतीसाठी सुशिक्षित, प्रशिक्षित व निरोगी असे कर्मचारी निर्माण करण्यास त्यांनी प्राधान्य दिले. सर्वच पूर्व आशियाई देशांनी ‘शिक्षण व आरोग्य’ या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली व यात त्यांच्या सरकारी क्षेत्राचा सिंहाचा वाटा राहिला आहे.

भारताचे मात्र या महत्त्वाच्या क्षेत्रांकडे वर्षानुवर्षे दुर्लक्ष झाले आहे. अगदी गेल्या तीन वर्षांतील केंद्रीय अर्थसंकल्प घेतले तरी केंद्रीय सरकारने शिक्षणावर केलेल्या खर्चाचे ‘जिडीपी’मधील प्रमाण अवघे ०.३७% असल्याचे दिसून येते. तीच परिस्थिती आरोग्यक्षेत्रावर करण्यात येणाऱ्या खर्चाची. तिथे हे प्रमाण (गेल्या तीन वर्षांत) फक्त ०.२७% एव्हढे अल्प राहिले आहे.

अनेक पूर्व तसेच दक्षिण-पूर्व आशियाई देशांनी कृषीक्षेत्रातील अतिरिक्त (surplus) मजुरांसाठी वस्तुनिर्माण (manufacturing) क्षेत्रात तसेच निर्यात क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार-निर्मिती केली. भारताने मात्र सेवाक्षेत्रावर भर दिल्यामुळे म्हणावी तशी रोजगार निर्मिती होऊ शकली नाही. याचे कारण सेवाक्षेत्र हे ‘‘श्रमांच्या वापरात’’ (labour intensity), वस्तुनिर्माण क्षेत्राच्या बरेच मागे आहे. खरंतर एकूण लोकसंख्येत तरुणांचे प्रमाण अधिक असणे (२७% च्या आसपास) हे भारताच्या फायद्याचे आहे, पण आज बहुसंख्य भारतीय तरुण बेरोजगार आहेत ही भारताची शोकांतिका आहे. भारतामधील एकूण बेरोजगार लोकांत तरुणांचे प्रमाण ८३% एवढे जास्त आहे. त्यात भारतात अस्तित्वात असलेले ‘सामाजिक सुरक्षा कवच’ (social safety network) हे जलद गतीने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेस सुसंगत असे नाही. भारताच्या एकूण कामगारवर्गातील ९०% कामगार हे अनौपचारिक क्षेत्रातून येतात. त्यांच्यासाठी कुठलीही सामाजिक वा वित्तीय सुरक्षेची व्यवस्था नाही आणि त्यामुळेच कुठलेही अरिष्ट आले की त्यांच्यातील अनेकजण दारिद्र्यरेषेखाली फेकले जातात. ‘कोविड’ महामारीच्या काळात आपण हे बघितले आहेच.

सातत्याने वाढणाऱ्या बेरोजगारीमुळे व बळावलेल्या आर्थिक विषमतेमुळे, भारतातील घरगुती क्षेत्राच्या बचत दराने आजमितीला गेल्या ५० वर्षांतील नीचांक गाठलेला आहे व एकूणच तरुणांमध्ये कर्जे काढून खर्च करण्याचे प्रमाण मात्र वाढत चालले आहे.

चीनमध्ये आर्थिक मंदी सुरू झाली तेव्हा चीनमध्ये जाणारे परदेशी भांडवलाचे प्रवाह भारताकडे वळतील, अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या भारतामधील गुंतवणूक वाढवतील अशी आशा निर्माण झाली होती. पण कसचं काय! २०२३ च्या वर्षात भारतात येणारी परदेशी थेट गुंतवणूक (foreign direct investment) वाढण्याऐवजी ४३% नी कमी झाली. यामागची जी कारणे दिली आहेत त्यात हे उघडपणे म्हंटले आहे की चीनच्या तुलनेत भारतातील मनुष्यबळ स्वस्तात उपलब्ध असले तरीही शिक्षण व कौशल्ये यात ते यथातथाच असते. त्यातच चीनमधील रस्ते, बंदरे वगैरे पायाभूत सुविधा इतक्या उत्तम असतात की उत्पादन तसेच दळणवळणाच्या तिथल्या व्यवस्था अधिक फायदेशीर ठरतात. त्यात भारताने 'आत्मनिर्भरते''च्या अट्टहासापोटी, आंतरराष्ट्रीय व्यापारावर इतके निर्बंध घालून ठेवले आहेत की आपल्या देशातील अनेक उत्पादने त्यामुळे महागडी बनलेली आहेत. तसेच Transparency International's Corruption Perceptions Index Ranking नुसार भारतातील भ्रष्टाचाराचे प्रमाण चीनच्या तुलनेत किती तरी अधिक आहे. मग कसे येतील इथे परदेशी गुंतवणूकदार?

आर्थिक स्वातंत्र्याच्या निर्देशांकामध्येही भारताची गुणसंख्या अवघी ५२.९ इतकी असल्याने २०२४ या वर्षात भारताचा आर्थिक स्वातंत्र्यामधील क्रमांक एकूण जगात १२६ वा आहे. हा निर्देशांक अनेक गोष्टींवर आधारित असतो. उदाहरणार्थ, मालमत्ता अधिकार, सरकारी क्षेत्राचा सच्चेपणा, न्यायव्यवस्थेची परिणामकारकता, करांचे ओझे, वित्तीय क्षेत्राचे आरोग्य, उद्योगांना लाभलेले स्वातंत्र्य, व्यापाराचे स्वातंत्र्य, चलनविषयक स्वातंत्र्य, गुंतवणुकीचे स्वातंत्र्य - अशा अनेक बाबी या निर्देशांकात समाविष्ट असतात. ज्या देशांचे गुण आर्थिक स्वातंत्र्याच्या निर्देशांकात अधिक असतात, त्या देशांमध्ये आर्थिक वाढ, रोजगार निर्मिती तसेच उत्पन्न वितरण अधिक निरोगी पद्धतीने होताना दिसून आले आहे.

अजून एक महत्त्वाची बाब म्हणजे कृषी क्षेत्र. या क्षेत्रावर अजूनही दोन तृतीयांश भारतीय लोक अर्थार्जनाकरता अवलंबून आहेत. मात्र हे क्षेत्र अल्प उत्पादकता, आटत चाललेले पाण्याचे साठे, अपुरी व अकार्यक्षम सिंचनप्रणाली, खते व कीटकनाशकांच्या वापरातील असमतोल अशा अनेक समस्यांनी ग्रासलेले आहे.

त्यात हवामान बदलामुळे (जागतिक तापमानवाढीमुळे) ओले व सुके दुष्काळ, चक्रीवादळे, अति उष्णतेच्या रेंगाळणाऱ्या लाटांचे प्रमाण यांसारख्या घटितांचे प्राबल्य जबरदस्त वाढलेले आहे. याचा विपरीत परिणाम कृषी उत्पादने व किंमतींवर होतो आहे. त्यात अपुऱ्या पायाभूत सुविधांमुळे (रस्ते, कोठारे, शीतगृहे, वित्त, मार्केटिंग यांचे अपुरे प्रमाण, इत्यादी), कृषी क्षेत्रातील गुंतवणूक आटत चालली आहे. त्यात प्रत्येक नव्या पिढीमुळे होणारे भू-विखंडन (land fragmentation) आणि अल्प भूधारकांचे सतत वाढणारे प्रमाण यामुळे ह्या क्षेत्रातील स्पर्धात्मकता कमी झाली आहे. जवळपास एक दशकभरासाठी कुंठित झालेले ग्रामीण मजूरीचे दर आणि पेरणीचा हंगाम सोडता उर्वरित काळात वाढणारी बेरोजगारी, यांचा ग्रामीण भागांतील लोकांच्या उत्पन्नावर तसेच मागणीवर विपरीत परिणाम झालेला दिसून येतो आहे.

वरील विश्लेषण, भारताचा उच्च उत्पन्न गटात दाखल होण्याचा प्रवास किती बिकट असणार आहे यावर झोत टाकते. सर्वप्रथम आपल्याला आपली औद्योगिक व आंतरराष्ट्रीय व्यापार विषयक धोरणे अशा पद्धतीने आखावी व राबवावी लागतील की ज्यामुळे देशांतर्गत रोजगार व निर्यात वाढू शकतील. निर्यातीचा भरदेखील श्रमांचा जास्तीत जास्त वापर करणाऱ्या उत्पादन प्रक्रियांवर ठेवला गेला पाहिजे. आणि याकरता सरकारी क्षेत्राने खर्च करताना सर्वाधिक प्राधान्य 'सार्वजनिक शिक्षण व आरोग्य सेवे'स दिले पाहिजे. तसेच कृषी क्षेत्र व ग्रामीण क्षेत्रापुढची नवीन आव्हाने (हवामान बदल, जागतिक तापमान वाढ इत्यादी) लक्षात घेऊन कृषी क्षेत्र अधिक 'स्मार्ट' व लवचिक बनविण्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली पाहिजे. फक्त केंद्रीय सरकारच नव्हे तर राज्य सरकारे व खाजगी क्षेत्रांनीही ''संशोधन व विकासा'वरील गुंतवणूक मोठ्या प्रमाणात वाढवून, देशांतर्गत नवप्रवर्तनास (innovations) उत्तेजन दिले पाहिजे.

जोपर्यंत आपण आपली एकूण धोरणे, तसेच 'उद्योगवाढ, रोजगारवाढ, निर्यातवाढ आणि कृषी-उत्पादकता' यांच्या आड येणारी संस्थात्मक रचना, यांच्यात आवश्यक ते बदल घडवून आणत नाही तोपर्यंत आपला देश 'मध्यम उत्पन्ना'च्या निम्न पातळीवर अडकलेला रहाणार, यात काहीच शंका नाही. याबाबतीत, पूर्व आशियाई देशांकडून पुष्कळ काही शिकण्यासारखे आहे.

*(लेखिका स्वतंत्र अर्थतज्ज्ञ असून तीन दशकांहून अधिक काळ 'बँकिंग व फायनॅन्स' क्षेत्रात प्रमुख अर्थतज्ज्ञ म्हणून कार्यरत होत्या. तसेच त्या भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या नियामक परिषदेच्या सन्मान्य सदस्य देखील आहेतत.)*

# पुरवणी

# शिक्षण, शिक्षणव्यवहार आणि डॉ. आंबेडकर

■ अभय टिळक

'शिक्षण' या संकल्पनेची व्याख्या, शिक्षणाची प्रत्यक्ष प्रक्रिया, ती प्रक्रिया कार्यान्वित करणारी 'शाळा-महाविद्यालये-विद्यापीठे'नामक संस्थात्मक रचना, त्या संस्थात्मक संरचनेमध्ये सक्रिय असणारे व्यवस्थापकीय त्याचप्रमाणे अकादमिक घटक, शिक्षणामागील प्रेरणा, शिक्षणाची उद्दिष्टे आणि शिक्षण पदरात पाडून घेतलेल्या सुशितांकडून असणाऱ्या अपेक्षा... अशा विविध अंगांचा समावेश 'शिक्षणव्यवहार' या व्यापक संकल्पनेमध्ये होतो अथवा केला जातो. ज्ञानाबद्दल असीम आस्था व आदर असणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वैशिष्ट्य असे की, शिक्षणव्यवहाराशी संलग्न असणाऱ्या अशा विविध अंगांचा उहापोह बाबासाहेबांनी प्रसंगोपात्त उदंड केलेला दिसतो. त्या अर्थाने, बाबासाहेबांचा शिक्षणविचार हा खऱ्या अर्थाने सम्यक् होय, असे म्हणण्यात कोणताही प्रत्यवाय नाही आणि नसावाही.

रूढ अर्थाने बाबासाहेब शिक्षणतज्ज्ञ गणले जात नसले तरी, शिक्षणासंदर्भात त्यांनी प्रसंगोपात्त व्यक्त केलेले चिंतन विलक्षण मर्मग्राही आणि सूक्ष्म असे आहे. बाबासाहेबांच्या भाषणांचे जे तीन खंड महाराष्ट्र राज्य सरकारने प्रकाशित केलेले आहेत त्यांचे अंतरंग निरखले असता, शिक्षणव्यवहारासंदर्भात बाबासाहेबांनी निरनिराळ्या प्रसंगी व्यक्त केलेल्या विचारांचे अनेक प्रगल्भ कवडसे त्यांत ठायी ठायी विखुरलेले आपल्याला आढळतात. बाबासाहेबांनी सन १९२७ ते १९५५ अशा सुमारे तीन दशकांच्या कालावधीदरम्यान केलेल्या भाषणांमध्ये शिक्षण-व्यवहारविषयक त्यांच्या विचारधनाची पखरण झाल्याचे आपल्याला दिसते. स्वातंत्र्यपूर्व काळातील बाबासाहेबांच्या ज्या भाषणांमधून शिक्षणविषयक जे काही चिंतन प्रगटलेले आहे ती बहुतांश भाषणे मुख्यत: त्यांनी त्या काळी तथाकथित 'अस्पृश्य' समजल्या जाणाऱ्या समाजसमूहांतील विद्यार्थ्यांना उद्देशून केलेली दिसतात. साहजिकच,

शिक्षणाच्या क्षेत्रात तिथवर उपेक्षित राखल्या गेलेल्या समाजसमूहांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यावर त्यांच्या विवेचनाचा तिथे मुख्यत: भर दिसतो.

परंतु, स्वातंत्र्योत्तर काळातील त्यांच्या ज्या भाषणांमधून शिक्षणविषयक विचारांचे आविष्करण झालेले आहे त्यांचा आशय विलक्षण व्यापक आणि शिक्षणव्यवहार व शिक्षणाचे संस्कार लाभलेल्यांकडून बाबासाहेबांना असणाऱ्या आशा प्रतिबिंबित करणारा आहे. व्यक्तीला केवळ साक्षर बनविणे एवढाच व हाच काय तो शिक्षणाचा उद्देश होय अथवा असला पाहिजे, हे बाबासाहेबांना साफ अमान्य आहे. तसेच, केवळ पुस्तकी शिक्षण घेऊन पदव्या पदरात पाडून घेतल्याने सुशिक्षित मनुष्य समाजाचा जबाबदार नागरिक बनत नसतो, ही आपली ठाम धारणा बाबासाहेबांनी ठिकठिकाणी अतिशय तळमळीने मांडलेली आपल्याला पाहावयास मिळते. तसेच, केवळ शिक्षण – मग ते कितीही उच्च दर्जाचे व अव्वल असले तरीही – कोंदणाविना हिऱ्यासारखी त्याची अवस्था अथवा स्थिती असते, हे बाबासाहेब परोपरीने सुचवितात. सुशिक्षित व्यक्तींना आणि अशा सुशिक्षितांच्या समाजाला जर शीलाची चाड नसेल तर तसे शीलहीन शिक्षण समाजधारणेच्या दृष्टीने केवळ कुचकामी ठरते, ही भावना बाबासाहेब अनेक ठिकाणी पोटतिडिकेने मुखर करतात. बाबासाहेबांनी व्यक्त केलेल्या शिक्षणव्यवहारविषयक विचारांची प्रस्तुती, त्यांचमुळे, आजही लोपलेली नाही. उच्च शिक्षणाचा प्रसार आज आपल्या समाजात चौफेर झालेला आहे. परंतु, शिक्षणाच्या जोडीनेच ज्या अन्य मूल्यसंचयाचे शिंपण–जागरण घडत राहणे बाबासाहेबांना अपेक्षित होते, त्यांबद्दल दिसणारे चित्र मात्र अजिबातच संतोषजनक नाही. बाबासाहेबांच्या शिक्षणविषयक विचारविश्वातील संबंधित काही पैलूंचे स्मरण, अशा टप्प्यावर आवर्जून करणे, म्हणूनच अनाठायी ठरू नये.

माणसाच्या जीवनात विद्येचे महत्त्व किती आहे, या संदर्भातील बाबासाहेबांची धारणा पाहण्यासारखी आहे. बाबासाहेबांच्या प्रतिपादनानुसार शिक्षण हे विद्यार्जनाचे साधन होय. शिक्षणासंदर्भात बाबासाहेबांची जी विचारसरणी आहे तिचे आगळेपण आपल्याला जाणवायला लागते ते अगदी प्रारंभापासूनच. या संदर्भात बाबासाहेब संदर्भ देतात भगवान बुद्धांचा. बाबासाहेबांनीच औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे स्थापन केलेल्या मिलिंद महाविद्यालयात तारीख १२ डिसेंबर १९५५ या दिवशी केलेल्या भाषणामध्ये बाबासाहेब विद्यार्जनासंदर्भातील भगवान बुद्धांची अपूर्व अशी भूमिका विशद करीत विद्यार्जनाचे महत्त्व अधोरेखित करतात. विद्यार्जनाच्या क्षेत्रातील पारंपरिक विषमता आणि अधिकारभेद संपूर्णत: मोडीत काढत बुद्धांनी शिक्षणाचा

अधिकार सर्व समाजघटकांना बहाल केला हे विदित करत असताना त्या सभेदरम्यान बाबासाहेबांनी कथन केलेली संबंधित कथा मोठी उद्बोधक आहे. ***''विद्या ही अन्नासारखी सर्व मनुष्यास आवश्यक आहे. प्रत्येकाला तिचा लाभ झाला पाहिजे. हा उदार विचार पहिल्यांदा उद्घोषित केला असेल तर तो भगवान बुद्धांनीच... एकदा भगवंतास लोहित नावाच्या ब्राह्मणाने प्रश्न विचारला की तू सगळ्यांना विद्या का शिकवतोस. यावर भगवंताने त्याला सांगितले की, ज्याप्रमाणे मनुष्यप्राण्याला अन्नाची जरूरी आहे, त्याचप्रमाणे सर्वांना विद्येची जरूरी आहे. ही विचारसरणी प्रथम बुद्धानेच या भूतलावर सुरू केली''***, हे बाबासाहेबांचे कथन विलक्षण सूक्ष्म आणि अ-पूर्व होय.

शरीराचे सर्वांगीण पोषण होण्याच्या दृष्टीने औरसचौरस अशा सकस अन्नाची गरज असते; तर, मानवी मन आणि बुद्धीची प्रगल्भ वाढ होण्यासाठी दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षणाची गरज असते, हा बाबासाहेबांच्या शिक्षणसंलग्न चिंतनाचा चिरंतन अंत:स्तर असल्याचे आपल्याला सतत जाणवत राहते. प्रसंगवशात अगदी बालपणीच सकस अन्नाच्या अभावापायी कुपोषणाशी पाला पडला की शरीराच्या उत्तरायुष्यातील क्षमतेची व रोगप्रतिकारकशक्तीची आबाळ संबंधित व्यक्तीच्या बहुआयामी कार्यक्षमतेची कायमस्वरूपी हानी घडवून आणत असते. अगदी त्याच न्यायाने, मुळात शालेय स्तरावरच निकृष्ट शिक्षण मिळाले तर संबंधितांच्या बौद्धिक क्षमतांची पायाभरणी सशक्तपणे होण्याच्या सर्व संभाव्यता पार निकालातच निघतात. म्हणून, शालेय स्तरावरील शिक्षणप्रक्रिया सकसच असली पाहिजे, यांवर बाबासाहेबांचा विशेष कटाक्ष दिसतो. त्या दृष्टीने शालेय स्तरावरील शिक्षकगणांची जबाबदार किती तरी अधिक पटीने मोठी व तितकीच संवेदनशील बनते, ही बाबासाहेबांच्या ठायी असणारी सखोल-सघन जाणीव 'बहिष्कृत भारत'च्या तारीख ३ जून १९२७ रोजीच्या अंकात प्रकाशित झालेल्या त्यांच्या 'आजकालचे प्रश्न' या शीर्षकाच्या लेखात ठसठशीतपणे व्यक्त झालेली दिसते. बाबासाहेबांच्या त्या लेखाला संदर्भ लाभलेला आहे तो मुंबई इलाख्याच्या शिक्षण खात्याच्या १९२४-२५ या वर्षीच्या अहवालाचा.

**ज्ञान, शिक्षण आणि पदवी**

शिक्षण खात्याच्या त्या अहवालातील एका आकडेवारीबाबत बाबासाहेबांनी लेखात उहापोह केलेला आपल्याला आढळतो. काळाच्या हिशेबाने या गोष्टीला आजमितीस बरोबर १०० वर्षे पूर्ण होत आहेत. १९२४-२५ या वर्षामध्ये मुंबईतील ट्रेनिंग कॉलेजमध्ये प्रवेश घेतलेल्यांची जातवार आकडेवारी अहवालात सादर करण्यात

आलेली होती. त्या काळी तथाकथित 'अस्पृश्य' गणल्या जाणाऱ्या समाजसमूहांतील ज्या उमेदवारांना ट्रेनिंग कॉलेजमध्ये प्रवेश देण्यात आलेला होता त्यांचे तिथे प्रवेश मिळालेल्या एकंदर उमेदवारांतील प्रमाण, 'अस्पृश्य' गणल्या जाणाऱ्या समाजघटकांच्या मुंबई इलाख्यातील एकूण लोकसंख्येमध्ये तेव्हा असणाऱ्या प्रमाणापेक्षा अतिशयच कमी असल्याचे वास्तव ती आकडेवारी दर्शवित होती. तर, लोकसंख्येमध्ये अल्प प्रमाण असणाऱ्या ब्राह्मण उमदेवारांचे प्रमाण तिथे खूपच मोठे होते. विषमतेचे प्राबल्य असलेल्या तत्कालीन समाजव्यवहारांत, वर्णव्यवस्थेतील श्रेष्ठांचे प्राबल्य असणारी शिक्षकांसाठीची प्रशिक्षणव्यवस्था उतरंडीमध्ये निम्न स्तरांवर ठेवलेल्या समाजघटकांतील शैक्षणिक प्रगतीबाबत व अध्यापनविषयक कौशल्यांबाबत कितपत संवेदनशील व दक्ष राहील, या भावनेने बेचैन झालेल्या बाबासाहेबांनी त्या आकडेवारीबाबत टिप्पणी करतेवेळी व्यक्त केलेली चिंता आज पुऱ्या एक शतकानंतरही, एका वेगळ्या अंगाने व निराळ्या संदर्भात, अ-प्रस्तुत ठरत नाही. ***''शिक्षक वर्ग हा राष्ट्रांतील सारथी वर्ग आहे. यास्तव शिक्षक कोण असावा यासारखा समाजहितांच्या दृष्टीनें दुसरा महत्वाचा प्रश्न नाही... शाळेमध्ये नुसत्या बाराखड्या शिकवावयाच्या असत्या तर ती गोष्ट निराळी; पण शाळेत मुलांची मने सुसंस्कृत करून त्यांना समाजहितास योग्य असें वळण लावावयाचें असते. शाळा म्हणजे उत्तम नागरिक तयार करण्याचें कारखाने आहेत. अर्थात, अशा कारखान्याचा फोरमन जितका शहाणा असेल तितका उत्तम माल कारखान्यांतून बाहेर पडणार आहे''***, हे बाबासाहेबांनी त्यांवेळी नोंदवून ठेवलेले कमालीचे मार्मिक निरीक्षण, आजचे सामाजिक वास्तव बदललेले असले तरी, एकंदर प्रचलीत शिक्षणव्यवहाराचा विचार करता, अ-प्रस्तुत ठरते अथवा ठरेल, असे म्हणण्याचे धाडस कोणी तरी करू शकेल का! (?)

शाळा-महाविद्यालयांमधून प्रदान केल्या जाणाऱ्या शिक्षणाचा वास्तवातील नेमका अर्थ काय आणि पदवी या संकल्पनेचा तत्वश: आशय काय ठरतो, हे बाबासाहेबांच्या लेखी सततच्या चिंतनाचे विषय असावेत, असे त्यांच्या या संदर्भातील चिंतनावरून सतत जाणवत राहते. त्या काळात अस्पृश्य गणल्या जाणाऱ्या समाजघटकांतील विद्यार्थ्यांचे एक संमेलन पुण्यातील डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या हॉलमध्ये रविवार तारीख ११ सप्टेंबर १९३८ रोजी भरविण्यात आले होते. त्या वेळी तिथे जमलेल्या विद्यार्थ्यांना संबोधित करतेवेळी बाबासाहेबांनी व्यक्त केलेले विचार 'ज्ञान' आणि 'पदवी' या दोहोंबाबतच्या आपल्या रूढ धारणांचा उथळपणा उघड करणारे असेच आहेत. ***''दीर्घोद्योग व कष्ट करण्यानेच यशप्राप्ती होते. नुसत्या पदव्या मिळविण्याने***

***काही होणार नाही. कारण पदव्या म्हणजे ज्ञान नसून शिक्षकाच्या मदतीशिवाय ज्ञानार्जन करण्यास जमविलेली साधन सामग्री होय. विश्वविद्यालयाच्या पदव्या व बुद्धिमत्ता यांचा काही संबंध नाही''***, हे बाबासाहेबांनी त्या संमेलनातील विद्यार्थ्यांना केलेले संबोधन चिरंतन शाबीत व्हावे असेच आहे.

अन्न ही जशी प्रत्येकाची मूलभूत गरज आहे तशीच व तितकीच विद्येचीही माणसाला गरज असते व असली पाहिजे, हे आवर्जून सांगत असतानाच, विद्यार्जन कशासाठी करावयाचे याचेही दिग्दर्शन बाबासाहेब एके ठिकाणी करतात. मुंबई येथील सेन्ट झेवियर्स महाविद्यालयात १९४७ साली बाबासाहेबांनी केलेल्या भाषणातील काही अंश या संदर्भात कमालीचा मननीय ठरतो. 'नवयुग' या प्रकाशनाने १३ एप्रिल १९४७ या दिवशी प्रकाशित केलेल्या 'आंबेडकर विशेषांका'मध्ये बाबासाहेबांच्या त्या दिवशीच्या भाषणाचे जे शब्दांकन प्रकाशित करण्यात आले ते मुळातूनच वाचले पाहिजे. विद्या संपादन कशासाठी करावयाची या संदर्भात विवेचन करताना बाबासाहेब म्हणतात, ***''विद्यार्जन याला एक मोठा अर्थ असतो. आपली प्राचीन गुरुकुले एकांतात विद्या शिकवीत असत. रानावनातून ही विद्यापीठे प्रस्थापित झाली होती त्याचे मुख्य कारण असे की, त्यांना (विद्यार्थ्यांना) विद्येच्या अभ्यासाने नवी दृष्टी यावी, या दृष्टीतून त्यांनी खऱ्या जीवनमूल्यांचा शोध व बोध घ्यावा''.*** विद्यार्जनाची बाबासाहेबांना अपेक्षित असलेली ती फलश्रुती आजच्या आपल्या प्रचलीत शिक्षणव्यवहाराद्वारे साकारलेली दिसते का, हा खरा प्रश्नच आहे. शिक्षणाची परिणती जीवनधारणा करणाऱ्या मूल्यांमध्ये घडून येणे बाबासाहेबांना अपेक्षित आहे अथवा होते, एवढेच नाही. शब्दांच्या माध्यमातून मूल्यांचे ज्ञान एक वेळ घडेलही परंतु त्या मूल्यांच्या आचरणाचे काय, हा प्रश्न पुढे उरतोच.

**मुख्य भर मूल्याचरणावर**

मुंबईतीलच एल्फिन्स्टन महाविद्यालयात, सोमवार, तारीख १५ डिसेंबर १९५२ रोजी केलेल्या भाषणादरम्यान बाबासाहेब नेमका भर देतात तो मूल्यांच्या आचरणावरच. महाविद्यालयीन शिक्षण व उच्च शिक्षणाचा लाभ घेणारे विद्यार्थी यांबाबत असणाऱ्या आपल्या अपेक्षा व्यक्त करताना बाबासाहेब म्हणतात, ***''मानवी जीवनातील वैचारिक आणि नैतिक मूल्ये कधीच स्थिर राहिली नाहीत. ती कालमानाप्रमाणे प्रत्यही बदलत राहतात. नुसती बदलतातच नव्हे तर ती प्रगत होत जातात. भारतीय विद्यार्थ्यांनीही या नव्या नव्या निर्माण होणाऱ्या जीवनमूल्यांची दखल घेतली पाहिजे आणि आपणही ती आचरणात आणण्यास सिद्ध राहिले पाहिजे. हे नवे तत्वज्ञान आपल्या विद्यादायी***

***संस्था आपल्या शिक्षणक्रमात घालतात की नाही याकडेही पाहिले पाहिजे''.*** शाळा-महाविद्यालयांमधून प्रदान केल्या जाणाऱ्या शिक्षणाद्वारे जीवनदायी मूल्यांचे संक्रमण-संस्करण होते अथवा नाही हे तपासण्याबाबतचा बाबासाहेबांचा सुमारे पाऊण शतकापूर्वी अभिव्यक्त झालेला तो साक्षेप आजही कालबाह्य झालेला नाही.

शाळा-महाविद्यालये-विद्यापीठे यांसारख्या शिक्षणसंस्थांमध्ये प्रवेश घेऊन तिथून प्रदान केले जाणारे शिक्षण पदरात पाडून घेण्याइतपत अथवा घेण्यापर्यंतच सीमित राहणारी क्रियाशीलता बाबासाहेबांना विद्यार्थीवर्गाकडून अजिबातच अपेक्षित नाही. आपल्या बुद्धिविकासाला पूरक ठरणारे शिक्षण प्रचलीत शिक्षणव्यवहारातील संस्थात्मक यंत्रणेकडून प्रदान केले जाते अथवा नाही, हे बघण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांनीच दक्षपणे पार पाडली पाहिजे, अशी आपली भूमिका बाबासाहेबांनी मुंबईतील एल्फिन्स्टन महाविद्यालयात १३ डिसेंबर १९५२ रोजी केलेल्या भाषणात स्पष्टपणे मांडलेली दिसते. ***''आजचे विद्यार्थी ज्या विद्यापीठाचे शिक्षण घेतात त्याच्या कारभाराकडे मुळीच लक्ष घालीत नाहीत. विद्यार्थ्यांनी काय शिकावं हे विद्यापीठ ठरवित असले तरी आपल्या बौद्धिक विकासाला आपण शिकतो ते खरोखरच पोषक व आवश्यक आहे की नाही, हेही प्रत्येक विद्यार्थ्याने पाहिले पाहिजे. त्यांच्या भावी जीवनाची उभारणी याच ठिकाणी होत असते. तो राष्ट्राचा आदर्श नागरिक होणार की, त्याचे जीवित विफल होणार हेही शिक्षणक्रमच ठरविणार असल्यामुळे विद्यापीठाच्या प्रत्येक हालचालीवर विद्यार्थ्यांचे कटाक्षाने लक्ष असले पाहिजे. पण आजचे विद्यार्थी त्या दृष्टीने अगदी बेपर्वा असतात'',*** हे बाबासाहेबांचे १९५२ सालातील निरीक्षण आजचे विद्यार्थी आणि त्यांच्या संघटना यांना तितकेच लागू पडत नाही का?

**प्राध्यापकांकडून अपेक्षा**

उत्तम नागरिक घडवणे हा शिक्षणाचा आद्य हेतू असेल तर शिक्षणव्यवहाराचे वहन करणाऱ्या शाळा-महाविद्यालयादी संस्थात्मक रचनेद्वारे ज्ञानदानाचे कार्य प्रत्यक्ष पार पाडणाऱ्या अध्यापक-प्राध्यापकादी शिक्षकवर्गाच्या ठायी तशी दृष्टी आणि संबंधित जबाबदारीची जाणीव सदैव जागृत असणे अनिवार्य ठरते. परंतु, नेमक्या याच अतिशय कळीच्या गणल्या जाणाऱ्या बाबतीत तत्कालीन संस्थात्मक शिक्षणव्यवहारातील प्राध्यापकचमू कमी पडतो असे बाबासाहेबांचे केवळ निरीक्षणच नव्हे तर सखोल शल्य होते. अध्यापन करणे ही केवळ नोकरी नसून ती वृत्ती असली पाहिजे, यांवर बाबासाहेबांचा कटाक्ष सतत राहिलेला दिसतो. या संदर्भातील आपले सघन असमाधान बाबासाहेब, ***''हिंदी विद्यालयातील शिक्षक मोठ्या कष्टाने, केवळ***

***अंगिकारले आहे म्हणून विद्यादान करीत असतो. स्वयंप्रेरणेने हे विद्यादान होत नाही. शिक्षकाला लागणारी अंत:स्फूर्ती, विद्यादानाची हौस आणि त्यासाठी करावा लागणारा अव्याहत व्यासंग या सर्वांचीच त्यांच्याकडे वानवा असते. किंबहुना अध्यापक पेशाला जे नोकरीचे हिडीस स्वरूप आले आहे आणि तास भरून काढण्यासाठी त्याला शिकवावे लागत असल्यामुळेच अध्यापक वर्गामध्ये हे शैथिल्य निर्माण झाले असावे! व त्यामुळे अध्यापकही विद्यार्थ्यांना विचारप्रवर्तक ज्ञान पाजण्यास असमर्थ झाले आहेत'',*** अशा रोखठोक शब्दकळेद्वारे व्यक्त करतात. मुंबई येथील एल्फिन्स्टन महाविद्यालयात १५ डिसेंबर १९५२ या दिवशी केलेल्या व्याख्यानात बाबासाहेबांनी त्यांच्या मनीमानसी वसणारे ते अतीव असमाधान व्यक्त केले.

विहिरीमधून पाण्याचा अखंड उपसा एकीकडून चालू असतानाच तिच्या मुळाशी जर पाण्याचे जिवंत झरे नसतील तर एके दिवशी तशी विहीर कोरडीठाक पडणे अटळ असते. अध्यापनालादेखील तोच न्याय लागू पडतो. अध्ययन आणि अध्यापन या दोन्ही बाबी परस्परांच्या हातात हात घालून समांतर गतिमान राहिल्या पाहिजेत या संदर्भातील पूर्वापारचा कटाक्ष त्याच वास्तवाकडे निर्देश करतो. विद्यार्थ्यांना सतत ताजे व सकस ज्ञान पाजायचे तर अध्यापकांच्या ठायीदेखील निरंतर ज्ञानार्जनाची आस्था काठोकाठ असावयास हवी, हे ओघानेच येते. या संदर्भात, बाबासाहेबांनी अध्यापकवर्गाकडून व्यक्त केलेली अपेक्षा खरोखरच अ-पूर्व व अ-साधारण अशीच आहे. ***''प्रोफेसरांनी अध्ययनाच्या कामी स्वत:ला इतके वाहून घ्यावे की आपल्या घराकडे बघायला त्यांना मुळी सवडच मिळता कामा नये....प्रोफेसर लोकांनी भलती कामे अंगावर घेऊन आपल्या जबाबदाऱ्यांचे क्षेत्र उगाच वाढवीत जावे ही गोष्ट मला मान्य नाही. अध्यापन व अध्ययन यामध्ये संशोधनही आलेच. या तीन गोष्टींखेरीज प्रोफेसरांनी दुसरे कोणतेही काम करता कामा नये'',*** ही बाबसाहेबांची समस्त प्राध्यापक वर्गाकडून असणारी अपेक्षा, अध्यापनाच्या पेशाबाबतच्या निखळ बांधिलकीची त्यांना अपेक्षित असणारी परिसीमाच निर्देशित करते.

शिक्षण चालू असताना शाळा-महाविद्यालये-विद्यापीठे यांच्याशी येणारा आपला संबंध पदवी प्राप्त करून घेतल्यानंतर जवळपास संपूनच जातो. परंतु, या टप्प्यावर केवळ इतकेच घडते असे नाही. तर, यापेक्षाही एक अतिशय सूक्ष्म आणि तितकेच गंभीर वास्तवही तिथे साकारते. पदवी पदरात पडली, महाविद्यालयाशी असलेला संबंध त्यांमुळे आता संपुष्टात आला म्हणजे विद्यार्जनाशीदेखील आपला तिथवर जुळलेला सांधा आता संपला, असा प्रगाढ गैरसमज बहुतेक सगळ्यांच्याच मनात

स्थिरावतो. सहज जाणवली नाही तरी, बाबासाहेबांच्या लेखी ही मोठी धोकादायक बाब शाबीत होते. मनुष्याच्या जीवनात यासारखी दुसरी खेदकारक गोष्ट अन्य कोणतीही नाही, अशी बाबासाहेबांची दृढ धारणा आहे. त्या काळात तथाकथित 'अस्पृश्य' गणल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे मुंबई येथे १२ डिसेंबर १९३८ रोजी जे संमेलन भरलेले होते त्यांत बोलताना बाबासाहेब नेमके तेच कटू वास्तव अधोरेखित करतात.

**शिक्षण, पदवी आणि विद्येची गोडी**

मुंबईतील त्या संमेलनाला जमलेल्या विद्यार्थ्यांशी या अतिशय नाजूक बाबीसंदर्भात बोताना बाबासाहेबांनी तथाकथित 'सुशिक्षित' वर्गालादेखील मात्रेचे चार वळसे दिलेले दिसतात. ***''मला खेद वाटतो की शिकलेल्या मनुष्यास पदवी मिळाली आणि त्याला नोकरी लागली की त्याचा विद्यार्जनाचा मार्ग साफ तुटतो. विद्येचे महत्त्व खुंटले जाते. मी प्रवास करीत असता मजजवळ नेहमी चार पुस्तके व वर्तमानपत्रे असतात. परंतु प्रवासात जी शिकलेली माणसे दिसतात त्यांच्या हातात पुस्तके, वर्तमानपत्रे यांच्याऐवजी सिगारेटच्या पेट्या मात्र दिसतात. मनुष्य बी. ए. झाला म्हणजे त्याला अधिक शिक्षणाची गरज नाही काय? बी. ए. किंवा एम. ए. झाला म्हणजे त्याने सर्व ज्ञान संपादन केले, ही भावना चुकीची आहे. अगस्ती मुनीने ज्या प्रमाणे समुद्र प्राशन केला त्या प्रमाणे शिकून एखादी पदवी मिळाली म्हणजे आपण सर्व विद्या हस्तगत केली असे शिकलेल्या लोकांना वाटते!... म्हणून विद्येचा व्यासंग नेहमी केला पाहिजे. ज्या प्रमाणे माणूस एकदा दारू प्यावयास लागल्यावर तो ती जन्मभर पीत राहतो त्याचप्रमाणे विद्यार्जनाच्याबाबतीत झाले पाहिजे. विद्येची खरी गोडी कोणाला लागली? परिक्षेनंतर जो आपली पुस्तके नळबाजारात विकतो त्याला? बायकोपेक्षा, पोरापेक्षा ज्याचे विद्येवर जास्त प्रेम आहे त्यालाच विद्येची गोडी लागली असे मी म्हणेन'',*** हे बाबासाहेबांचे उद्गार आजही अप्रस्तुत आणि अम्लान ठरत नाहीत.

निरंतर शिक्षणाचे, विद्यार्जनाचे मोल सतत प्रकर्षाने अधोरेखित करणारे बाबासाहेब, शिक्षणाद्वारे सुशिक्षितांच्या जीवनदृष्टीमध्ये कशा प्रकारचे परिवर्तन घडून येणे आवश्यक आहे, यांबाबतही सतत चिंतन-मनन करत असल्याचे प्रसंगोपात्त त्यांनी केलेल्या वक्तव्यांद्वारे जाणवते. शिक्षणाच्या संस्काराद्वारे व्यक्तीची वृत्ती उदार व दृष्टी व्यापक होण्याऐवजी सुशिक्षित माणसे आत्मकेंद्री, आत्ममग्न बनतात याचे बाबासाहेबांना केवळ आश्चर्यच वाटते असे नाही तर त्यांना त्यांबद्दल रागही येतो. अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यांच्या संमेलनादरम्यान उपस्थितांना संबोधित करतेवेळी

बाबासाहेबांनी हा विलक्षण कळीचा मुद्दा उपस्थित केला. शिक्षणाच्या तशा अवांछनीय परिणामाबद्दल आपला रोष बाबासाहेब तिथे स्पष्ट शब्दांत व्यक्त करतात.

तत्कालीन सुशिक्षितांमध्ये आढळून येणाऱ्या या दोषावर बोट ठेवत असतानाच, बाबासाहेब, तिथे जमलेल्या विद्यार्थ्यांना सावधगिरीचा एक इषाराही देतात. ***''शिकलेल्या माणसात काही दोष असतात – ते दोष व ते अवगुण तुमच्या अंगात शिरणार नाहीत याची खबरदारी घ्या. पहिली गोष्ट (म्हणजे) शिक्षण पुरे झाल्यावर मनुष्य स्वार्थी बनतो. मनुष्य स्वार्थी असणे हे स्वाभाविकच आहे. परंतु शिकलेला मनुष्य स्वत:चे हित पाहतो, समाजाचे पाहत नाही. तो आपल्या बायका–पोरांची व स्वत:च्या हिताचीच काळजी घेतो... आपले कर्तव्य कोणते, याची भावना जागृत होत नाही हा एक शिकलेल्या माणसाचा दोष आहे''***, या बाबासाहेबांनी सुशिक्षितांमधील अधोरेखित केलेल्या दोषाचा प्रादुर्भाव आजही ओसरलेला दिसत नाही.

शिक्षणसंपादनाद्वारे आपला चरितार्थ उत्तम चालावा ही अपेक्षा प्रत्येकाने बाळगणे स्वाभाविक आहे. बाबासाहेबांची त्यांबद्दल तक्रार दिसत नाही. परंतु, स्वार्थसाधन करत असताना आपल्यापैकी बहुतेकांना परार्थाचा विसर पडतो ही त्यांची सल आहे. स्वार्थ आणि परार्थ यांचे समधात संतुलन माणसाने त्याच्या जीवनात साध्य करावे, असा सांगावा बाबासाहेब सुशिक्षितांना देतात तो कबिरांच्या एका दोह्याद्वारे. रावळी कँप येथील महिला मंडळाचे निमंत्रण स्वीकारून त्या प्रसंगी ३ जून १९५३ रोजी केलेल्या उद्‌बोधनादरम्यान, ***''कबीर कहे कुच उद्दम कीजे। आप खाये, और औरनको दीजे।। या कबिराच्या दोह्याप्रमाणे उद्योग करा, आपण खा व दुसऱ्यांनाही द्या. स्वार्थ व परार्थ दोन्ही साधा. घर प्रथम सांभाळा. मात्र समाजकार्यालाही मदत करा''***, अशा शब्दांत बाबासाहेब स्व–परहिताचे रक्षण करणारी संतुलित जीवनदृष्टी आयुष्यामध्ये अंगिकारण्याबाबत आवाहन करतात. शिक्षणाद्वारे अशी सम्यक् जीवनदृष्टी समाजात निर्माण व्हावी व वर्धिष्णू राहावी, ही आपली अपेक्षा बाबासाहेब अनेक परींनी व्यक्त करताना दिसतात.

स्वहितसाधन करत असतानाच रचनात्मक स्वरूपाच्या सामाजिक कार्यांद्वारे समाजहिताचेही संवर्धन–संगोपन करणे हे खरे व सम्यक् विद्यार्जन होय, असे विलक्षण आशयगर्भ प्रतिपादन करत, शिक्षण आणि शिक्षणाद्वारे जिचा विकास सुशिक्षितांच्या ठायी अपेक्षित आहे अशी व्यापक जीवनदृष्टी या दोहोंदरम्यानचा सांधा बाबासाहेब पुढे सिद्ध करतात १९५४ साली.

**अपुरे विद्यार्जन**

शेड्यूल्ड कास्ट ट्रस्ट फंड या संस्थेच्यावतीने हैदराबाद येथे स्थापन करण्यात आलेल्या वसतिगृहाला बाबासाहेबांनी भेट दिली १४ नोव्हेंबर १९५४ या दिवशी. तिथे उपस्थित असलेल्यांना संबोधित करतेवेळी 'पुरे विद्यार्जन' आणि 'अपुरे विद्यार्जन' या दोहोंतील सूक्ष्म परंतु मूलभूत फरक बाबासाहेब स्पष्ट करतात. ***''अपुरे विद्यार्जन करून काही उपयोगाचे नाही. परीक्षा कोणीही पास होतो. नुसत्या परीक्षा पास होऊन पदव्या मिळविण्यात काही अर्थ नाही. विद्यार्थ्यांनी रचनात्मक कार्य करून दाखविले पाहिजे''***, ही बाबासाहेबांची तळमळ शिक्षणाच्या उपयोजित अंगाकडे स्वच्छ निर्देश करणारी अशीच आहे.

सुशिक्षित विद्यार्थ्यांनी विद्यार्जनानंतर रचनात्मक कार्याला प्रवृत्त व्हावे, या, बाबासाहेबांच्या अपेक्षावजा आवाहनाची रुजवण तत्कालीन परिस्थितीच्या अवलोकनाद्वारे त्यांना सलणाऱ्या एका दु:सह बाबीमध्ये घडून आलेली असावी. मुदलातच शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प असणाऱ्या तत्कालीन तथाकथित 'अस्पृश्य' समजल्या जाणाऱ्या समाजघटकांतील जे काही मूठभर होतकरू शिक्षण संपादन करून सक्षम बनतात ते, मग, स्वत:च्या बांधवांचे हितरक्षण करण्यास कटिबद्ध होण्याऐवजी आत्मकेंद्री बनतात, हा बाबासाहेबांचा सल त्यांनी ठायी ठायी स्पष्ट शब्दांत व्यक्त केलेला आढळतो. मनमाड येथे १२ फेब्रुवारी १९३८ रोजी आयोजित करण्यात आलेल्या मुंबई इलाखा अस्पृश्य युवक परिषदेच्या व्यासपीठावरून बोलत असताना मनातील तीच भावना, बाबासाहेब, ***''आपल्या शिक्षणाचा उपयोग आपल्याच दीनदुबळ्या जनतेच्या उद्धारार्थ न करिता जर शिकून आपली नोकरी भली आहे, आपली बायकामुले भली या भावनेने आजचे शिकलेले तरूण वागणार असले तर त्यांचा समाजाला काय उपयोग?''***, अशा कळकळीच्या शब्दांत मुखर करतात.

समाजातील सुशिक्षित घटक आत्मकेंद्री बनून आपल्याच मर्यादित विश्वात मग्न होऊन राहतात, याबद्दल बाबासाहेबांना वाटणाऱ्या खेदाला आणखी एक पदरदेखील आहे. आत्मकेंद्री जीवन जगणारे सुशिक्षित, प्रसंगी, लुच्चेपणाही करतात असेही बाबासाहेबांचे असलेले अनुभवसिद्ध निरीक्षण त्यांचे काही उद्‌गार प्रगट करतात.

या दोन्ही अनुचित बाबींसंदर्भात आपल्या मनात दाटलेले अतीव असमाधान बाबासाहेब, ***''मनुष्य विद्वान झाला की, तो समाजाला उपयुक्त होतोच असे नाही. विद्वान मनुष्य लुच्चा, लबाड, उसण्या, लटपट्या आणखी वाटेल त्या दुर्गुणांचा असतो''***, अशा विषादपूर्ण परंतु जळजळीत शब्दांत व्यक्त करतात. निव्वळ शिक्षण

उपयोगी नाही, त्याला आणखी काही अतिशय मूलभूत नीतीमूल्यांची जोड असलीच पाहिजे, या भूमिकेवर बाबासाहेब, त्यांच्या अशा सगळ्या अनुभवाधारित निरीक्षणांती स्थिर झाले असावेत, असे मानण्यास त्यांच्या विचारविश्वात आपल्याला उदंड आधार अनेक ठिकाणी उपलब्ध होतात. ***''शिक्षणाचे महत्व आहे यात शंका नाही. मात्र शिक्षणाबरोबरच माणसाचे शीलही सुधारले पाहिजे. शीलाशिवाय शिक्षणाची किंमत केवळ शून्य आहे... शील हे धर्माचे मोठे अंग आहे. शिकलेली माणसे केवळ पोटभरू असून भागणार नाही. ज्यांना स्वार्थापलिकडे काही दिसत नाही; ज्यांना थोडाही परार्थ करता येत नाही ती माणसे नुसती शिकली म्हणून काय झाले ? त्यांचा दुसऱ्याला उपयोग तो काय? 'तव्याचा जाय बुरसा, मग तो सहजच आरसा'. शिक्षणाचा उपयोग असा झाला पाहिजे'',*** हे बाबासाहेबांनी रावळी कॅम्प येथे ३ जून १९५३ रोजी व्यक्त केलेले मनोगत या दृष्टीने कमालीचे बोलके आहे. ***''शिक्षण घेतलेल्या माणसाच्या अंगी शील व सौजन्य नसेल तर तो हिंस्त्र पशुपेक्षाही क्रूर व भीतीप्रद समजण्यात यावा... शिक्षणापेक्षा शील फार महत्त्वाचे आहे... शिक्षणापेक्षा शीलाला अधिक महत्त्व द्या'',*** हे मनमाड येथे १२ फेब्रुवारी १९३८ रोजी आयोजित करण्यात आलेल्या मुंबई इलाखा अस्पृश्य युवक परिषदेला संबोधित करतेवेळी बाबासाहेबांनी केलेले प्रतिपादन केवळ अमूल्य असेच होय.

बाबासाहेबांच्या शिक्षणविषयक चिंतनातील सर्वाधिक समृद्ध, संपन्न आणि प्रगल्भ अंश सांगायचा झाला तर तो हाच. केवळ उच्च व दर्जेदार शिक्षणाने मनुष्यजीवनाला अर्थवत्ता प्राप्त होते, असे बाबासाहेब मुळीच मानत नाहीत. औपचारिक शिक्षणाला मूल्यांचे अस्तर जोडले जाण्यानेच शीलवर्धन घडत राहते, यांबाबत बाबासाहेब ठाम दिसतात. शिक्षण आणि शील यांतूनच खऱ्या मनुष्यपणाची रूजवण-उगवण होते, या निष्ठेपायीच बाबासाहेबांनी अनंत ठिकाणी शीलवर्धनावर भर दिलेला आढळतो.

**विद्या आणि चार परिमिता**

डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या पुणे येथील सभागृहात अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यांच्या रविवार तारीख ११ सप्टेंबर १९३८ या दिवशी आयोजित करण्यात आलेल्या ११व्या संमेलनाला उद्‌बोधित करतेवेळी बाबासाहेबांनी हा मुद्दा अतिशय सविस्तर मांडलेला दिसतो. ***''विद्येबरोबरच आमच्यात शील पाहिजे. शीलाशिवाय विद्या फुकाची आहे. कारण विद्या एक शस्त्र आहे. एखाद्याजवळ विद्येचे शस्त्र असेल व तो शीलवान असेल तर त्यायोगे तो एकाचे संरक्षण करील, तर तोच इसम शीलवान नसेल तर विद्येच्या शस्त्राने दुसऱ्याचा घात करील. विद्या ही तरवारीसारखी***

***आहे परंतु तिचे महत्व तिला धारण करणाऱ्यावर अवलंबून राहील. कारण अडाणी मनुष्य कोणास फसवू शकत नाही. फसवावे कसे हेच त्याला उमगत नाही. परंतु शिकल्या-सवरलेल्या लोकांच्या ठिकाणी कोणास कसे फसवावे व त्या फसविण्यासाठी लागणारा युक्तिवाद असल्याने खऱ्याचे खोटे व खोट्याचे खरे ते भासवू शकतात'',*** हे बाबासाहेबांचे विवेचन कमालीचे स्वच्छ व थेट आहे. बाबासाहेबांच्या पुढ्यात त्या वेळी अनंत उदाहरणे होती ती खेडोपाडीचे शिकले-सवरलेले ब्राह्मण, वाणी यांसारखे समाजघटक सर्वसामान्य अशिक्षितांची जी व ज्या प्रकारे नागवण सररास करत असत, त्यांचे. आज सामाजिक किंवा व्यावसायिक संदर्भ बदललेले असले तरी, अशिक्षितांच्या अज्ञानाचा गैरफायदा उठविण्याच्या मुळातील वृत्ती फारशा पालटलेल्या दिसत नाहीत. शील आणि शिक्षण यांची बाबासाहेबांना अपेक्षित असणारी घट्ट सांगड आजदेखील दुर्मीळच दिसेल.

शीलाचे अस्तर न लाभलेले शिक्षण सर्व स्तरांवरील नाशास कारणभूत ठरते, असे बाबासाहेब त्याच भाषणादरम्यान पुढे आग्रहाने प्रतिपादन करतात. ***''लबाडी करण्यास चातुर्य व बुद्धी लागते. परंतु चातुर्य व बुद्धी हिला सदाचाराची अर्थात शीलाची जोड मिळाली तर तो (बुद्धिवान मनुष्य) लबाडी अगर फसवाफसवी करू शकणार नाही आणि म्हणून शिकल्यासवरलेल्या लोकात शीलाची अत्यंत जरूरी आहे. शीलाशिवाय जर शिकले सवरलेले लोक निपजू लागले तर त्यांच्या शिक्षणातच समाजाचा व राष्ट्राचा नाश आहे. तेव्हा शीलाची शिक्षणापेक्षा किती अधिक किंमत आहे हे तुमच्या ध्यानी आले असेलच आणि म्हणून प्रत्येक इसमात प्रथम शील असले पाहिजे'',*** हे बाबासाहेबांचे विवेचन कमालीचे मर्मग्राही आहे.

शिक्षण आणि सदाचार यांची सांगड बसण्यासाठी शिक्षणाला कोणत्या गुणसमुच्चयाची जोड लाभावयास हवी याचेही विवेचन बाबासाहेब करतात ते भगवान बुद्धांनी प्रतिपादन केलेल्या चार परमितांचा निर्देश करत. बाबासाहेबांनीच औरंगाबाद येथे स्थापन केलेल्या मिलिंद महाविद्यालयातील बोधि मंडळाच्या विद्यमाने १२ डिसेंबर १९५५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या सभेला उद्बोधित करताना बाबासाहेब त्या चार परमितांचे विवरण मांडतात. ***''विद्या ही एक प्रकारची तलवार आहे. ही दुधारी असते. तिने दुष्टांचा संहारही करता येतो व दुष्टांपासून आपले रक्षणही करता येते... माझ्या मते केवळ विद्याच पवित्र असू शकत नाही. विद्येबरोबर भगवान बुद्धानी सांगितलेली प्रज्ञा म्हणजे शहाणपण, शील म्हणजे सदाचरणानं संपन्न असं आचरण, करूणा म्हणजे सर्व मानवजातीसंबंधी प्रेमभाव आणि मैत्री म्हणजे सर्व***

***प्राणिमात्रांविषयीची आत्मियता, या चार पारमिता असल्या पाहिजेत. तरच विद्वत्तेचा काही उपयोग आहे. विद्येबरोबरच मानवाजवळ जर करूणा नसली तर तो कसाई आहे, असं मी समजतो. करूणा म्हणजे माणसामाणसावरचं प्रेम! ह्याच्यापुढेही मनुष्य गेला पाहिजे व त्याने मैत्री संपादन केली पाहिजे. ही विचारसरणी जर कोणी मांडली असेल तर ती भगवान बुद्धानीच होय'',*** या बाबासाहेबकृत विवरणाची प्रस्तुतता केवळ सार्वकालिक आणि सार्वत्रिकच नव्हे तर चिरंतन आहे.

आज प्राथमिक शिक्षणाचा प्रसार सार्वत्रिक झालेला आहे. उच्च शिक्षणाची गंगादेखील पार खेड्यापाड्यापर्यंत झिरपलेली दिसते. असे असूनही आमच्या सामाजिक जीवनाला इतकी अवनत अवकळा यावी याचा विस्मय वाटल्याखेरीज राहात नाही. ज्या चार परमितांची जोड शिक्षणाला असणे बाबासाहेबांना अपेक्षित होते त्यांचीच आपल्या व्यक्तिगत जीवनामध्ये आपण घाऊक हेळसांड करत असल्यामुळे तर आपल्या सार्वजनिक जीवनाची अपरिमित हानी होत नसेल ना, हा विचार बाबासाहेबांचे शिक्षणव्यवहारविषयक विचारधन चाळल्यानंतर कोणाच्याही मनात उद्‌भवावा!

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथलयाचाही लाभ घेता येईल.

## 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलाकडे व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## अर्थबोधपत्रिका मासिक
## वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त २००/– रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त ३५०/– रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त ५००/– रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ८००/– रुपये** |

**The Bank details for NEFT are as under :**

- Bank Name : **Vidya Sahakari Bank S.B. Road, Pune 411016.**
- Account Name : **Indian School of Political Economy**
- Bank Account No. : **200403130004208**
- NEFT/RTGS No. : **SVCB0003004**
- IFSC Code : **SVCB0003004**